इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – ८३ ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

गुरूवार,ता.२३ जुलै २०२६ | आषाढ शुक्ल ९ विशाखा | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

## आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीचा उच्चांक

**नवी दिल्ली,ता.२२–**

**पश्चिम आशियातील वाढत्या भू–राजकीय तणावामुळे आणि आखाती देशांतून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये पुन्हा मोठी वाढ झाली आहे.**

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने ब्रेंट क्रूडने दोन महिन्यांतील सर्वोच्च पातळी गाठली असून त्याचा भाव ९५.३८ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचला आहे. त्याचवेळी वेस्ट टेक्सास इंटरमिजिएट (डब्ल्यूटीआय) क्रूडनेही ८८.६१ डॉलर प्रति बॅरलपर्यंत झेप घेतली आहे. ब्रेंट क्रूडने बुधवारी ९१.४६ डॉलर प्रति बॅरल या पातळीवर व्यवहार सुरू केला. त्यानंतर खरेदीचा जोर वाढल्याने त्याची किंमत ९५.३८ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली.



## युध्दनौका 'मालवण' नौदलात दाखल

■ नवी दिल्ली,ता.२२–

**भारतीय नौदलाने कर्नाटकातील कारवार नौदल तळावर 'आयएनएस मालवण'चा आपल्या ताफ्यात समावेश केला आहे.**

माहे श्रेणीतील ही दुसरी पाणबुडीविरोधी युद्धनौका कोचीन शिपयार्ड (पान २ वर)




## तीन कोटींहून अधिक करदात्यांकडून आयकर रिटर्न दाखल

■ नवी दिल्ली,ता.२२–

**मूल्यांकन वर्ष २०२६–२७ साठी आतापर्यंत ३ कोटींहून अधिक आयकर रिटर्न (आयटीआर) दाखल करण्यात आले आहेत, ज्यापैकी केवळ २१ जुलै रोजीच १५ लाखांहून अधिक रिटर्न दाखल करण्यात आले आहेत.**

आयकर विभागाने बुधवारी सांगितले की, (पान २ वर)



## राधानगरी धरण ८३ टक्के भरले

■ शिरगाव,ता.२२ (प्रतिनिधी)–

**राधानगरी धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायमआहे. त्यामुळे धरणाच्या पाणी साठ्यात झपाट्याने वाढ होत आहे.**

बुधवारी सांयकाळी चार वाजता धरण (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | ६३.९६ |
| राधानगरी | ८.३६ | ०७.०१ |
| तुळशी | ३.४७ | ०२.३० |
| वारणा | ३४.४० | २४.९६ |
| काळम्मावाडी | २५.३९ | ११.६९ |
| कासारी | २.७७ | १.८८ |
| कडवी | २.५२ | १.८० |
| कुंभी | २.७२ | १.७३ |
| पाटगाव | ३.७२ | २.१३ |
| चिकोत्रा | १.५२ | ०.६९ |
| चित्री | १.८९ | १.४८ |
| जंगमहट्टी | १.२२ | ०.९३ |
| घटप्रभा | १.५६ | १.५६ |
| जांबरे | ०.८२ | ०.८२ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.०० |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४५५०० रु. | २२९००० रु. |

अंडी ७४० रुपये शेकडा

### हास्यतुषार –सुरेंद्र दास



ज्यांच्यावरून तुम्ही तुमचा जीव ओवाळून टाकता ते नेते, क्रिकेटपटू, अभिनेते तुमचा आंदोलनात जीव धोक्यात आहे तरी ते तुमच्याकडे फिरकले सुद्धा नाहीत!

# मोदींचा माफीनामा; प्रधानांचा राजीनामा हवा

## राहुल गांधी यांची केंद्र सरकारवर टीका

■ नवी दिल्ली,ता.२२–



**कॉकरोच जनता पार्टीच्या दिल्लीतील आंदोलनाला काँग्रेस, शिवसेना (ठाकरे पक्ष) सह विविध विरोधी पक्षांकडून मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे. या संदर्भात पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांनी राजीनामा द्यावा, अशा मागण्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली आहेत. सोबतच पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जवर मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे.**

राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी विद्यार्थ्यांसोबत अमानुषपणे वागणूक देण्यात आली आहे. माझ्यासोबत जो व्यवहार झाला, त्याची मला पर्वा नाही. आणखी पाचवेळा जरी माझ्यासोबत असाच व्यवहार झाला तरी मला त्याचे काहीही वाटणार नाही. परंतु विद्यार्थ्यांचा मुद्दा महत्त्वाचा आहे, असे म्हणत आमचा लढा चालूच राहील, असे संकेत (पान २ वर)

**राहुल गांधी यांनी आरोप केला की, गेल्या १० वर्षांत १५२ परीक्षांचे पेपर फुटले आहेत. म्हणजे सरासरी दर महिन्याला एक पेपर फुटला आहे. सरकारला याची काहीच चिंता नाही. यामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात आहे.**

# मोदी–पवार यांची भेट

## शेतकरी प्रश्नांवर पत्र सादर,खास.सुप्रिया सुळेही उपस्थित,राजकीय चर्चांना उधाण

■ नवी दिल्ली,ता.२२–

**गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून भारतीय जनता पक्षासोबत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होण्याच्या चर्चांना वेग आला असतानाच बुधवारी दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी संसद भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्यांच्यासोबत खासदार सुप्रिया सुळे यादेखील उपस्थित होत्या. त्यामुळे या भेटीबाबत विविध राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे.**

सध्या पेपरफुटीच्या मुद्यावरून दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. आंदोलना दरम्यान आंदोलकांवर दिल्ली पोलीसांनी केलेल्या लाठीमारामुळे केंद्र सरकारवर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी शरद पवार यांनी जंतरमंतर येथे जाऊन आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली होती.त्यांनी (पान २ वर)



**शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रातील शेती आणि जलव्यवस्थापनाशी संबंधित विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर पत्रही दिले. या पत्रामध्ये शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, चौकशी प्रक्रियेला गती द्यावी आणि शेतकऱ्यांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.**

# दिल्ली पोलीसांना नोटीस

## अतिबळाच्या वापरासंदर्भात चार आठवड्यात उत्तर दाखल करण्याचे निर्देश

■ नवी दिल्ली,ता.२२–

**कॉक्रोच जनता पार्टीच्या बॅनरखाली सोमवारी संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चावर पोलीसांकडून कथितपणे अतिबळाचा वापर केल्याचा आरोप करणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली.**

**न्यायालयाने आदेश दिला की, आंदोलनाशी संबंधित सर्व कागदपत्रे, व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि इतर डिजिटल पुरावे निश्चित प्रक्रियेनुसार सुरक्षित ठेवण्यात यावेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ आठवड्यानंतर होणार आहे.**



याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि दिल्ली पोलीसांना नोटीस बजावली आहे. तसेच ४ आठवड्यांच्या आत याप्रकरणी उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील एन. हरिहरन यांनी आरोप केला की, जंतर–मंतर येथे शांततेत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी आणि इतर आंदोलकांवर (पान २ वर)

# कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या चार कर्मचाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल

■ कोल्हापूर,ता.२२ (प्रतिनिधी)–

**मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी नियुक्ती करूनही निवडणूक कामकाजावर हजर न राहिल्या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या चार कर्मचाऱ्यांविरुध्द शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**निवडणूक कामावर गैरहजर; एसआयआर मोहिमेतील आदेशाचे उल्लंघन;लोकप्रतिनिधित्व अधिनियमांतर्गत कारवाई**

लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील तरतुदीनुसार ही कारवाई करण्यात आली असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक राजेंद्र विष्णू माळी यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

या प्रकरणी संजय रणदिवे (वरिष्ठ सहाय्यक, माध्यमिक शिक्षण विभाग), सुशांत धोडीराम सूर्यवंशी (कनिष्ठ सहाय्यक, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग), सुनिल मिसाळ (शिपाई, माध्यमिक शिक्षण विभाग) आणि राजू रामचंद्र वडर (शिपाई, प्राथमिक शिक्षण विभाग) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

शाहुपूरी पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या १४ मे २०२६ रोजीच्या आदेशानुसार या चारही कर्मचाऱ्यांची २७६ कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमासाठी (पान २ वर)

### जंतर–मंतर लाठीचार्ज प्रकरण

# तात्काळ सुनावणीस सुप्रीम कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली,ता.२२–



**दिल्लीतील कॉकरोच जनता पार्टीच्या मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नकार दिला.**

सरन्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर अधिवक्ता नरेंद्र (पान २ वर)

# शिवसेना बंडखोर खासदारांना नोटीस

## उबाठाची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ नवी दिल्ली,ता.२२(प्रतिनिधी)–

**बंडखोर ६ खासदार शिवसेना पक्षासोबत कसे संलग्न झाले, त्याला कायद्याचा कोणता आधार आहे. हे आम्हाला समजले पाहिजे. या कारणास्तव शिवसेना (ठाकरे) पक्षाने त्या खासदाराविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर लोकसभा सचिवालय आणि खासदारांना आम्ही दोन आठवड्यात त्यांचे म्हणणे काय हे समजून घेण्यासाठी नोटीस पाठवू असे सर्वोच्च न्यायालयाने आम्हाला कळवले आहे, असे खासदार अरविंद सावंत यांनी म्हटले.**

ओमराजे निबांळकर, संजय जाधव, नागेश पाटील– आष्टीकर (मराठवाडा), संजय देशमुख (विदर्भ), भाऊसाहेब वाकचौरे (पश्चिम महाराष्ट्र) आणि मुंबईतील संजय दीना पाटील यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षातून एकनाथ शिंदे यांच्या पक्षात अलीकडेच प्रवेश केलेला आहे. याला शिवसेना (ठाकरे) पक्षाने सर्वोच्च न्यायालयात (पान २ वर)

# रिक्षाचालकाचा निर्घृण खून

## कंदलगावातील घटना, दोरीने गळा आवळून दगडाने चेहरा ठेचला

■ कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)–



**कंदलगाव (ता.करवीर) येथील शेतात रिक्षाचालकाचा दोरीने गळा आवळून, डोक्यात धारदार हत्याराने वार करत दगडाने चेहरा ठेचून निर्घृण खून करण्यात आल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. महादेव धाऊ बोडके (वय ४५, रा.बोंद्रे नगर, मुळगाव, निवडे,गगनबावडा) असे मृताचे नाव आहे.**

खुनाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, स्थानिक गुन्हे शाखा आणि गोकुळ शिरगाव पोलिसांची दोन स्वतंत्र पथके मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत.

माहिती अशा की, महादेव बोडके हे रिक्षा चालक होते. मंगळवारी दुपारच्या सुमारास ते रिक्षा घेऊन घरातून बाहेर पडले होते. मात्र रात्री उशिरापर्यंत ते घरी परतले नाहीत. त्यांच्याशी मोबाईलवर संपर्क होत नसल्याने पत्नी मंगल बोडके यांनी करवीर पोलीस ठाण्यात जाऊन पती बेपत्ता झाल्याची नोंद केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या मोबाईल लोकेशनच्या आधारे शोधमोहीम सुरू केली.बुधवारी सकाळी महादेव यांच्या मोबाईलचे लोकेशन कंदलगाव परिसरात दिसत असल्याने पोलीस आणि नातेवाईक तेथे पोहोचले. कंदलगाव रस्त्यापासून सुमारे ५० मीटर अंतरावर संजय शिरगावे यांच्या शेतातील बांधावर एका व्यक्तीचा (पान २ वर)

# जादा परताव्याचे आमिषाने वीस लाखाची फसवणूक

■ सांगली,ता.२२(प्रतिनिधी)–

**कमी कालवधीत जादा परताव्याचे आमिष देवून मिरज तालुक्यातील कर्नाळ येथील एका शेतकऱ्याला सुमारे २० लाख रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बजरंग दत्तात्रय पाटील (रा.कर्नाळ) यांनी गणेश पाटणकर (रा.नावरसवाडी) याच्या विरोधात विश्रामबाग पोलीसात फिर्याद दिली आहे.**




कर्नाळ येथील बजरंग पाटील यांच्याशी संशयित गणेश मच्छिंद्र पाटणकर (वय ४०, रा. नावरसवाडी, ता. मिरज) याने ओळख वाढवली. त्यांचा विश्वास संपादन केल्यानंतर गणेश याने फिर्यादी बजरंग यांना (पान २ वर)

# युपीतून आणलेल्या पिस्तुलातून साखरेवर गोळीबार

## धरणगुत्तीच्या युवकासह उत्तर प्रदेशच्या एकास अटक

■ कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**सराईत गुंड सूरज साखरे याच्यावर झालेल्या जीवघेण्या गोळीबारासाठी वापरण्यात आलेले गावठी पिस्तूल हे उत्तर प्रदेशातून आणण्यात आले असल्याचे तपासात समोर आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने पिस्तूल पुरवठा करणाऱ्या यश अनिल खैरे (वय ३४, रा.धरणगुत्ती, ता.शिरोळ) आणि दीपक विश्वकर्मा (वय ३७, मूळ रा. उत्तर प्रदेश, सध्या जयसिंगपूर) यांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने दोघांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.**



यश खैरे



दिपक विश्वकर्मा

सूरज हणमंत साखरे याच्यावर १६ जुलै रोजी दुपारी नवीन वाशी नाका परिसरातील शरयू प्लाझासमोर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी गोळीबार केला होता. या घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत यापूर्वी रफीक उर्फ देवा पीरसाहेब मुल्ला, शहाबाज राजू मुल्ला आणि हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप असलेल्या राकेश कारंडे यांना अटक केली होती.त्यांच्या चौकशीतूनच पिस्तूल पुरवठ्याचा महत्त्वाचा धागा पोलिसांच्या हाती लागला.

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, सूरज साखरेला संपविण्यासाठी राकेश कारंडे गावठी पिस्तूल मिळवण्याच्या प्रयत्नात होता. त्यावेळी धरणगुत्ती येथून फर्निचर व्यवसाय करणाऱ्या यश खैरेच्या माध्यमातून त्याच्याकडे काम करणारा कामगार दीपक विश्वकर्माशी ओळख झाली. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशात गेलेल्या दीपक विश्वकर्माने तेथून सुमारे गावठी पिस्तूल खरेदी केले होते. ते कोल्हापुरात आणून स्व:ता जवळ लपवून ठेवले होते. ते राकेश कारंडे याने एक लाख रुपयांना खरेदी केले. कट रचल्यानंतर त्याने हेच पिस्तूल रफीक आणि शहाबाज मुल्ला याना दिले. पुढे याच शस्त्रातून सूरज साखरेवर गोळीबार करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात आतापर्यंत (पान २ वर)



# मोदींचा माफीनामा;प्रधानांचा राजीनामा हवा-राहुल गांधी

(पान १ वरून )

त्यांनी दिले. पत्रकार परिषदेत विद्यार्थ्यांच्या वतीने एकूण तीन मागण्या केल्या आहेत. यात सर्वात पहिली मागणी म्हणजे केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा झालाच पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची, विद्यार्थ्यांची माफी मागितली पाहिजे, अशी दुसरी मागणी देखील त्यांनी केली. विद्यार्थ्यांवर अन्याय झाला, अत्याचार झाला हे मान्य करून मोदींनी मोठ्या मनाने माफी मागावी, असे राहुल गांधी म्हणाले. तसेच ज्यांनी विद्यार्थ्यांसोबत मारहाण केलेली आहे, त्यांना या प्रकरणात जबाबदार धरले पाहिजे, अशी तिसरी मागणी राहुल गांधींनी केली.राहुल गांधींनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर अपयश आणि भ्रष्टाचाराचा आरोप केला. ते या पदावर पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. परीक्षेचे पेपर एकापाठोपाठ फुटत आहेत आणि ते शिक्षण व्यवस्था चालवण्यास असमर्थ आहेत. ज्यांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण केली आहे. त्यांना या प्रकरणात जबाबदार धरले पाहिजे, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. मुलांनी आत्महत्या केल्या आहेत. आपले विद्यार्थी प्रचंड तणावातून जात आहेत आणि ऐनवेळी त्यांना सांगितले जाते की पेपर फुटला आहे. विद्यार्थ्यांनी काय चुकीचे केले आहे. सुरक्षा दल त्यांच्यावर हल्ला करत आहेत. ते शांततेने आपल्या मागण्या मांडत आहेत. ते विचारत आहेत की या देशाचे त्यांच्यावर काय देणे आहे. त्यांची फक्त एवढीच मागणी आहे की, देशातील विद्यार्थ्यांना एक निष्पक्ष आणि न्याय शिक्षण व्यवस्था मिळावी.

राहुल गांधी यांनी असेही सांगितले की, शिक्षण पूर्ण झाल्यावर तुम्ही डॉक्टर, वकील बनता किंवा एखादे कौशल्य शिकता. पण मग अचानक तुम्हाला सांगितले जाते की तुमच्यासाठी जी दारे उघडायला हवी होती ती बंद झाली आहेत. उत्पादन क्षेत्र पूर्णपणे बंद झाले आहे. तुमच्या आजूबाजूला पाहा तुम्हाला सर्वत्र फक्त चिनी उत्पादनेच दिसतील. उद्योजकता बंद झाली आहे. फक्त दोन-तीन मोठ्या कंपन्यांनाच बँकांकडून निधी मिळते. ज्या युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे, त्यांना कोणतीही संधी मिळत नाही. कार्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्याही नाहीशा होत आहेत. एआय आणि आयटी क्षेत्रात कर्मचारी कपात सुरू आहे. सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण सुरू आहे. युवकांसाठी सरकारी नोकरी हाच एकमेव पर्याय उरला आहे. त्यांनी सरकारवर आरोप केला की, तुम्ही युवकांना एकच दार देता, बाकीचे दारं बंद करता.मग त्या एका व्यवस्थेमध्ये फेरफार करून ती आवाक्याबाहेरची बनवता. मग तुम्ही अपेक्षा करता की त्यांनी नोकरी सोडू नये.

## पवार-मोदी यांची भेट

(पान १ वरून)

आंदोलनाला पाठिंबा देत विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होऊ नये, अशी भूमिका मांडली होती.त्यामुळे दुसऱ्याच दिवशी त्यांनी पंतप्रधान मोदी यांची घेतलेली भेट विशेष महत्त्वाची मानली जात आहे. या भेटीत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याबाबत चर्चा झाली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

याशिवाय सिंचन आणि पाणी प्रकल्पांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी तृतीय पक्षामार्फत लेखापरीक्षण करावे, रखडलेले प्रकल्प लवकर पूर्ण करावेत आणि भ्रष्टाचारावर नियंत्रण आणावे, अशीही सूचना करण्यात आली आहे. किमान आधारभूत किंमत केवळ जाहीर न करता प्रत्येक शेतकऱ्याला त्याचा कायदेशीर अधिकार मिळावा, अशी मागणीही पत्रातून करण्यात आली आहे. तसेच पीक विमा योजनेतील त्रुटी दूर करून नुकसानभरपाई थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, बनावट आणि निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी तसेच दर्जेदार बियाण्यांचा पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणीही शरद पवार यांनी पंतप्रधानांकडे केली आहे. या भेटीमुळे आगामी काळातील राजकीय घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आयकर रिटर्न दाखल

मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आधीच ३ कोटींहून अधिक आयटीआर दाखल करण्यात आले आहेत, तर केवळ मंगळवार, २१ जुलै रोजीच १५ लाखांहून अधिक आयटीआर दाखल करण्यात आले. अंतिम मुदतीच्या वेळी होणाऱ्या गर्दीची वाट पाहू नका. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आपला आयटीआर-१ आणि आयटीआर-२, ३१ जुलै २०२६ पूर्वी http://incometax.gov.in वर दाखल करा.उल्लेखनीय म्हणजे, ३१ जुलैची अंतिम मुदत ही आयटीआर-१ आणि आयटीआर-२ दाखल करणाऱ्यांसाठी आहे. सामान्यतः जर तुमचे वार्षिक उत्पन्न आयकर सवलतीच्या मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर आयटीआर दाखल करणे आवश्यक आहे.

## कर्मचाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल

नियुक्ती करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांना संबंधित कामकाजावर उपस्थित राहणे बंधनकारक होते. मात्र, २५ जून पासून २१ जुलै २०२६ या कालावधीत संबंधित कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत.शासकीय आदेशाचे पालन न करणे आणि निवडणुकीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या कामात विनाकारण गैरहजर राहिल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत शाहूपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी संबंधित चौघांविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० चे कलम ३२ तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १३४ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. निवडणूक प्रक्रियेत शासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात असल्याने अशा प्रकारच्या निष्काळजीपणावर प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शाहूपुरी पोलिस ठाण्याचे पोलीस हवलदार नितीन रेडेकर करीत आहेत.

## राधानगरी धरण ८३ टक्के भरले

८३.८१ टक्के भरले. सध्या धरणात ७.०१ टीएमसी जलसाठा झाला आहे. बुधवारी सायंकाळी चार वाजेपर्यंतच्या धरण परिक्षेत्रात ७६ मि.मी.पावसाची नोंद झाली तर जून पासूनआज पर्यंत २१.९६ मि.मी. पाऊस नोंदवला गेला आहे. दरम्यान धरणाच्या वीज निमिर्ती केंद्रातून बुधवारी सांयकाळी ७ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यत टप्प्याटप्प्याने १४०० क्यूसेक भोगावती नदीत पाण्याचा विसर्ग करण्यात सुरु करण्यात येणार आहे तरी नदी काठच्या लोकांनी दक्षात घ्यावी असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे .

## वीस लाखाची फसवणूक

कमी कालावधीत जादा परतावा देण्याचे आमिष दाखविले. त्याला बळी पडून बजरंग पाटील यांनी संशयित गणेश याला धनादेशाव्दारे दि.१८ ऑक्टोबर २०२४ रोजी १५ लाख आणि सांगलीतील मार्केट यार्ड परिसरात असणाऱ्या अन्वित ट्रेडिंग कंपनी येथे दि.२० ऑक्टोबर २०२४ रोजी रोख ५ लाख रुपये दिले. तत्पूर्वी झालेल्या भेटीत संशयित गणेश याने, दोन महिन्यात जादा परतावा आणि २० लाख रुपये न दिल्यास त्या मोबदल्यात २० लाख रुपये किंमतीचा सोयाबीन शेतमाल देतो, असे सांगितले होते.यामुळे फिर्यादी बजरंग यांनी विश्वासाने पैसे दिले. मात्र फिर्यादी बजरंग यांना सांगितलेली रक्कम किंवा त्या रकमेचे सोयाबीन संशयित गणेश पाटणकर याने दिले नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर बजरंग पाटील यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि गणेश पाटणकर याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## रिक्षाचालकाचा निर्घृण खून

मृतदेह पडल्याची माहिती मिळाली. गोकुळ शिरगाव पोलिसांनी तेथे जाऊन मृतदेहाची पाहणी केली असता तो महादेव बोडके यांचाच असल्याचे समजले.घटनास्थळी पाहणी करताना मृताच्या गळ्यालादोरी बांधलेली होती. तसेच डोक्यावर धारदार हत्याराचे वार आणि दगडाने मारहाण केल्याच्या गंभीर जखमा आढळून आल्या. त्यामुळे आधी गळा आवळून त्यानंतर डोक्यावर वार करत दगडाने चेहरा ठेचून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.रिक्षाचालक महादेव बोडके यांचा खून नेमका कोणी, कोणत्या कारणासाठी आणि कुठे केला, त्यांना घटनास्थळी कोणी बोलावून नेले का, याचा तपास पोलीस करत आहेत. आर्थिक व्यवहार, जुने वाद, वैयक्तिक वैर इतर कोणते कारण या मागे आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. महादेव बोडके हे घरातून बाहेर पडल्यानंतर कोणाला भेटले, कोणकोणाशी त्यांचे मोबाईलवर संभाषण झाले, त्यांच्या रिक्षाचा मार्ग कोणता होता, याचा तपास करण्यासाठी पोलिसांनी मोबाईल कॉल डिटेल्स, लोकेशन आणि शहरातील विविध सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

## बंडखोर खासदारांना नोटीस

आव्हान दिले आहे. यावर आज सुनावणी झाली. ही सुनावणी न्यायाधिश आराध्य आणि नरसिंहमन यांच्या पिठापुढे झाली. आमच्याकडून वकील म्हणून देवदत्त कामत यांनी युक्तिवाद केला. सर्वोच्च न्यायालयाने २ आठवड्याची मुदत देणारी नोटीस पाठवू असे स्पष्ट केले असे सावंत यांनी कळवले.

कायद्यात संलग्नता शब्द नाही. मग हा शब्द कोठून आणला. खासदारांचा समूह एखाद्या पक्षात विलीन होऊ शकतो. ते करता येते. हा अधिकार लोकसभा सभापतीला आहे असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले नाही. आज आम्हाला एक आशेचा किरण वाटतो. आता पुढे काय होते ते पाहू असे सावंत म्हणाले.आमदार अपात्र यावर पुढील सुनावणी ३१ जुलै २०२६ रोजी आहे असे सावंत म्हणाले.

# गुन्हे मागे घेण्यासह तीन अटी मान्य केल्यास उपोषण मागे घेऊ

## वांगचुक यांचे केंद्र सरकारला पत्र

■ नवी दिल्ली,ता.२२-

**नीट पेपरफुटीची जबाबदारी स्विकारून शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. पेपर फुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना पर्याप्त नुकसान भरपाई द्यावी आणि आंदोलनात सहभागी झालेल्या कोणत्याही युवकांवर खटले दाखल न करता त्यांना संरक्षण द्यावे, या प्रमुख तीन मागण्यांची दखल घेतल्यास आपण उपोषण सोडू, असे पत्र सोनम वांगचुक यांनी केंद्र सरकारला लिहिले आहे.**

सोनम वांगचुक यांनी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सरकारने नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना पर्याप्त नुकसान भरपाई द्यावी आणि शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत संसदेत अर्थपूर्ण चर्चा व्हावी. तसेच, २० जुलै रोजी झालेल्या 'चलो संसद' मार्चमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संयमाने शांततापूर्ण आंदोलन केले. पोलिसांकडून झालेल्या अतिरेकी कारवाई असूनही विद्यार्थ्यांनी लोकशाही मार्गाने आपली मागणी मांडली. या आंदोलनात सहभागी झालेल्या कोणत्याही युवकांवर खटले किंवा दडपशाही न करता त्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी सोनम वांगचुक यांनी केली आहे.

**६५ खासदारांनी केली विनंती**

वांगचुक यांच्या म्हणण्यानुसार, विविध राजकीय पक्षातील सुमारे ६५ खासदारांनी त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली आहे. सरकारने आंदोलक विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची शिक्षा किंवा खटला न भरल्याचे स्पष्ट आश्वासन दिले तरच ते उपोषण संपवतील, असे वांगचुक यांनी स्पष्ट केले आहे. अन्यथा उपोषण कायम ठेवण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे. त्यामुळे, आता सरकार काय भूमिका घेते, सरकार त्यांच्या मागण्या मान्य करते का? याकडे आता लक्ष लागले आहे.

# मिरज पं.स.सभापती-उपसभापती निवड ४ ऑगस्टला

■ मिरज,ता.२२(प्रतिनिधी)-

**मिरज पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीपदासाठी नव्याने निवड प्रक्रिया राबविण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, ही निवड ४ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे.**

यापूर्वी १० मार्च २०२६ रोजी झालेली सभापती व उपसभापती पदाची निवड विभागीय आयुक्तांनी रद्द केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने नव्या निवड कार्यक्रमाबाबतचे आदेश मिरज प्रांताधिकारी कार्यालयाला पाठविले आहेत. या निवड प्रक्रियेसाठी मिरजच्या प्रांताधिकाऱ्यांची अध्यासी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार मिरज पंचायत समिती कार्यालयात विशेष सभा घेण्यात येणार असून, त्यामध्ये सभापती व उपसभापती पदाची निवड प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. नामनिर्देशनपत्र स्वीकारणे, अर्जांची छानननी, उमेदवारी अर्ज मागे घेणे तसेच प्रत्यक्ष निवड प्रक्रिया अशी सर्व कार्यवाही ४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार आहे.

दरम्यान, नव्या निवडकार्यक्रमावर शिवसेनेचे नेते मोहन वनखंडे यांनी आक्षेप नोंदविला आहे. विभागीय आयुक्तांच्या निर्णयाविरोधात शासनाकडे अपील करण्यासाठी ३० दिवसांची मुदत उपलब्ध असताना, त्यापूर्वीच निवड कार्यक्रम जाहीर केल्याने या प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोप त्यांनी केला. निवडीसंदर्भात आपण कायदेशीर मार्गाने पुढील लढा देणार असून न्याय मिळेल, असा विश्वासही वनखंडे यांनी व्यक्त केला.

# युपीतून आणलेल्या पिस्तुलातून गोळीबार

(पान १ वरून )

सात आरोपींना अटक करण्यात आली असून, गोळीबारामागील मुख्य सूत्रधाराचा शोध अद्याप सुरू आहे. तसेच दीपक विश्वकर्माने यापूर्वीही कोल्हापूर किंवा परिसरात इतर कोणाला बेकायदेशीर शस्त्रांचा पुरवठा केला आहे का, तसेच उत्तर प्रदेशातून शस्त्रांची तस्करी करणारे आणखी कोणते जाळे कार्यरत आहे का, याचाही तपास एलसीबीकडून सुरू आहे.गोळीबारात जखमी झालेल्या सूरज साखरे यांची प्रकृती सुधारत असून, त्यांच्यावर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# दिल्ली पोलीसांना न्यायालयाची नोटीस

(पान १ वरून )

पोलीसांनी गरजेपेक्षा जास्त बळाचा वापर केला. त्यांनी दावा केला की पोलीस कारवाईदरम्यान युवकांवर लाठी, पेलेट आणि इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर केल्याचे आरोप समोर आले आहेत. याचिकाकर्त्यांनी न्यायालयाकडे आंदोलनाशी संबंधित सर्व नोंदी, सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ सुरक्षित ठेवण्याची मागणी केली. तसेच या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र यंत्रणा किंवा विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची मागणी करण्यात आली.

ज्येष्ठ वकील विकास सिंह यांनी दावा केला की, १९ जुलैपर्यंत आंदोलन शांततेत सुरू होते आणि त्यानंतर पोलिसांच्या कारवाईमुळे परिस्थिती बिघडली. त्यांनी आरोप केला की काही व्हिडिओमध्ये गणवेश नसलेले काही लोक आंदोलकांवर हल्ला करताना दिसत आहेत.

दिल्ली पोलीसांच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) एस. व्ही. राजू यांनी सांगितले की, याचिकांमधील आरोप सोशल मीडिया अहवालांवर आधारित आहेत.हे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण नव्हते आणि पोलिसांच्या वाहनांचे नुकसान तसेच दगडफेकीचे पुरावे उपलब्ध आहेत. हिंसक परिस्थिती निर्माण झाल्यास कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना कारवाई करावी लागते, असे त्यांनी सांगितले.कोणाकडे गुन्ह्याशी संबंधित ठोस पुरावे असल्यास त्यांनी दंडाधिकाऱ्यांकडे जाऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी करावी. त्यांनी या याचिकांच्या ग्राह्यतेवरही प्रश्न उपस्थित केला आणि सांगितले की प्रत्यक्ष जखमी झालेले लोक न्यायालयात आलेले नाहीत.सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने म्हटले की, जनहिताशी संबंधित प्रकरणांमध्ये प्रत्येक प्रभावित व्यक्तीने वैयक्तिकरित्या न्यायालयात उपस्थित राहणे आवश्यक नाही. न्यायालयाने बेकायदेशीर जमावाला हाताळण्यासाठी पोलिसांनी अवलंबायच्या निश्चित प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित केले.

# चांदोली धरण क्षेत्रात मुसळधार

## धरणाच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ

■ चांदोली,ता.२२ (वार्ताहर)-

**चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने धरणातील पाणी साठ्यात झपाट्याने वाढ होत आहे.बुधवारी सकाळी सहा वाजेपर्यंत धरणात २४.५२ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे.**

चांदोली धरण परीसरात बुधवारी सकाळी सहा वाजेपर्यंत चोवीस तासात ४० मिलीमीटर इतका पाऊस झाला आहे तसेच आजअखेर परिसरात १ हजार ९१ मिलीमीटर एकूण पावसाची नोंद येथील पर्जन्यमापन केंद्रावर झाली आहे.या पावसामुळे ओढे,नाले तुडुंब भरुन वहात आहेत. डोंगरमाथ्यावरुन अनेक धबधबे प्रवाहीत झाले आहेत.त्यामुळे पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांची पाऊले चांदोली परीसराकडे वळली आहेत.

चांदोली धरण परिसरातील दमदार पावसाने पाणलोट क्षेत्रातून चांदोली धरणात ७४८८ क्युसेक्स पाण्याची आवक होत असल्यामुळे चांदोली धरणाची पाणी पातळीत ही वाढत असून चांदोली धरणाची पाणी पातळी ६१५.८०मीटरवर पोहचली असून सध्या धरणात ६९४.५३ द.ल.घ.मी इतका एकुण पाणीसाठा झाला असून त्याची टक्केवारी ७१.२९ इतकी आहे.

परिसरात पावसाची संततधार सुरु असल्याने पाण्याअभावी ठप्प झालेली रोपलावणीची कामेही गतीने सुरु झाली आहेत तसेच पावसाचा जोर कायम राहिल्यास बंद असणारे वीज निर्मिती केंद्र सुरू होण्याची शक्यता आहे.

# तात्काळ सुनावणीस सुप्रीम कोर्टाचा नकार

(पान १ वरून )

मिश्रा यांनी या प्रकरणाचा उल्लेख करत लवकर सुनावणी घेण्याची मागणी केली.यावर सरन्यायमूर्ती म्हणाले की, आमचा आणि तुमचा वेळ वाया घालवू नका.सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, त्यांच्याकडे असे व्हिडिओ आहेत ज्यामध्ये पोलिसांची कथित दडपशाही दिसून येत आहे. यावर सरन्यायमूर्ती म्हणाले की, आम्हाला व्हिडिओमध्ये रस नाही.आमच्याकडे व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नाही.

याचिकेत आरोप करण्यात आला होता की, दिल्लीमध्ये केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आयोजित कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान पोलीसांनी विद्यार्थ्यांवर बळाचा वापर केला. या प्रकरणात न्यायालयाकडून तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली होती.

यावेळी वकीलांनी सांगितले की, विद्यार्थी नीट परीक्षा पारदर्शक आणि निष्पक्ष पध्दतीने घेण्यात यावी तसेच राष्ट्रीय चाचणी संस्थेमध्ये (एनटीए) सुधारणा करण्यात याव्यात, अशा महत्त्वाच्या मुद्यांवर आवाज उठवत आहेत. मात्र, अधिवक्त्यांचे म्हणणे मध्येच थांबवत सरन्यायमूर्ती सूर्यकांत यांनी खूप खूप धन्यवाद असे म्हटले.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची तातडीने यादी करण्याची मागणी मान्य केली नाही.

यापूर्वी दिल्ली उच्च न्यायालयानेही कॉक्रोच जनता पार्टीच्याच्या संसदेवरील मोर्चादरम्यान आंदोलकांवर दिल्ली पोलिसांनी कथितपणे केलेल्या अतिरिक्त बळाच्या वापराविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर तातडीची सुनावणी घेण्यास नकार दिला होता.

हायकोर्टाने स्पष्ट केले होते की, या प्रकरणाची सुनावणी बुधवारी ठरलेल्या वेळापत्रकानुसार होईल. तातडीच्या सुनावणीच्या मागणीवर न्यायालयाला या प्रकरणात ओढू नका असे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले होते.

# दुचाकीच्या धडकेत वृद्ध जखमी

मिरज,ता.२२(प्रतिनिधी)-

**मिरज तालुक्यातील एरंडोली ते लिंगनूर रस्त्यावर दुचाकीने धडक दिल्याने** सदाशिव नानासो पाटील (वय ७०) हे **गंभीर जखमी झाले. याबाबत रविंद्र पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार** सुरेश सुभाष पाटील (रा. एरंडोली) या दुचाकी चालकाविरुद्ध मिरज ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# युध्दनौका 'मालवण' नौदलात दाखल

(पान १ वरून )

लिमिटेडमध्ये ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्रीचा वापर करून 'आत्मनिर्भर भारत' अंतर्गत तयार करण्यात आली आहे. यामुळे नौदलाची सागरी सुरक्षा आणि पाणबुडीविरोधी क्षमता आणखी बळकट होणार आहे. आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत युध्दनौका निर्मितीमध्ये देशाची वाढती क्षमता दर्शवणारे हे महत्त्वाचे उदाहरण आहे.

ही युध्दनौका विशेषतः उथळ किनारी भागांमध्ये शत्रूच्या पाणबुड्या,अंडरवॉटर ड्रोन आणि सागरी घुसखोरांचा शोध घेऊन त्यांचा नायनाट करण्यासाठी डिझाईन करण्यात आली आहे. या युध्दनौकेत अत्याधुनिक सोनार प्रणाली, लाईटवेट टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेट लाँचर बसविण्यात आले आहेत. सुमारे ८० मीटर लांबी आणि ११०० टन विस्थापन क्षमता असलेली ही युध्दनौका वॉटर-जेट प्रोपल्शन प्रणालीने सुसज्ज असून, उथळ पाण्यातही तिला उच्च गतिशीलता आणि सुमारे २५ नॉट्स (४६ किमी/तास) इतका कमाल वेग प्राप्त होतो. या युध्दनौकेला महाराष्ट्रातील ऐतिहासिक किनारी शहर 'मालवण'चे नाव देण्यात आले असून, तिच्या प्रतिक चिन्हात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने 'वाघ नख' (वाघाच्या पंज्याचे नख) समाविष्ट करण्यात आले आहे.

भारतीय नौदलाच्या ताकदीला नवी धार देणारी आयएनएस मालवण ही तिच्या ८० टक्के स्वदेशी तंत्रज्ञान, अत्याधुनिक वॉटर-जेट प्रणोदन प्रणाली आणि घातक टॉर्पेडो क्षमतेमुळे चर्चेत आहे. समुद्रात शत्रूंवर नजर ठेवणे आणि अचूक हल्ला करण्यास सक्षम असलेली ही युध्दनौका भारतीय संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचे मोठे उदाहरण मानली जात आहे. तिच्या मारक क्षमतेमुळे तिला समुद्रातील 'सायलेंट किलर' असेही म्हटले जात आहे. माहे श्रेणीतील या युध्दनौका किनारी आणि उथळ सागरी भागांमध्ये प्रभावी कार्यवाहीसाठी तयार करण्यात आल्या आहेत. ही अत्याधुनिक युद्धनौका उथळ सागरी भागांमध्ये शत्रूच्या पाणबुड्यांचा शोध घेणे, त्यांचा पाठलाग करणे आणि आवश्यकतेनुसार त्यांचा नायनाट करण्यासाठी विशेषतः तयार करण्यात आली आहे.

या समारंभाला हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी पश्चिमी नौदल कमांडचे प्रमुख व्हाईस ॲडमिरल संजय वात्सायन, कोचीन शिपयार्ड लिमिटेडचे प्रतिनिधी, नौदलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.


## ॥ दुःखद निधन ॥



**श्री. गजानन रघुनाथ म्हेतर**

आमचे बंधू श्री. गजानन रघुनाथ म्हेतर यांचे
बुधवार, दि. २२/७/२०२६ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले.

✻ अंत्ययात्रा ✻

आज गुरूवार, दि. २३/७/२०२६ रोजी सकाळी ८ वा. राहते घर, म्हेतर गल्ली, नवीन शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथून पंचगंगा नदीघाटकडे निघणार आहे.

- दत्तात्रय रघुनाथ म्हेतर
- अनिल रघुनाथ म्हेतर
- सुर्यकांत रघुनाथ म्हेतर
- चंद्रकांत बापूसो म्हेतर
- प्रमोद महादेव म्हेतर
- सुनिल बापूसो म्हेतर
- राहुल बापुसो म्हेतर
- अतुल मुरलीधर म्हेतर

**समस्त म्हेतर परिवार, इचलकरंजी**

# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर कारखान्यास सर्वोत्कृष्ठ पुरस्कार जाहीर

इचलकरंजी,ता.२२ –

**हुपरी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर साखर कारखान्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी दिलेले मोलाचे योगदान, उच्च दर्जाच्या साखरेच्या उत्पादनातील उत्कृष्ट कामगिरी तसेच उत्पादन व कार्यपद्धतीतील उल्लेखनीय कार्यक्षमता यांची दखल घेऊन दि शुगर टेक्नॉलॉजिस्टस् असोसिएशन ऑफ इंडिया नवी दिल्ली या संस्थेने सर्वोत्कृष्ठ पुरस्कार जाहीर केला आहे.**



१९ ऑगस्ट रोजी गोवा येथे संस्थेच्या ८४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर कारखान्यास मिळालेला हा पुरस्कार देशातील साखर उद्योगाच्या तांत्रिक प्रगतीस आणि कार्यक्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी महत्वपूर्ण टप्पा ठरेल, असा विश्वास कारखान्याचे चेअरमन कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी व्यक्त केला. कारखान्यास मिळालेल्या पुरस्काराबद्दल कारखान्यास ऊस पुरवठा करणारे सभासद-शेतकरी, संचालक, ऊस तोडणी मजूर-वाहतूकदार तसेच कारखान्यात काम करणारे सर्व अधिकारी, कर्मचारी कामगार यांचा मोलाचा वाटा आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ संचालक प्रकाश आवाडे आणि संचालक आमदार राहूल आवाडे यांनी केले.

# फसवणूकप्रकरणी दोघांवर गुन्हा

इचलकरंजी,ता.२२–

**फसवणूक करुन मिळवलेल्या रकमेची विल्हेवाट लावण्यासाठी म्युल बँक खाते काढल्याप्रकरणी शहापूर पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप आण्णासो सातपुते (वय ३९ रा. शहापूर) व विक्रम जुवेकर (रा. बेळगाव) अशी त्यांची नांवे आहेत. या प्रकरणी पोलिस अंमलदार गणेश दिलीप लोहार यांनी फिर्याद दिली आहे.**

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, सायबर गुन्हा अंतर्गत संदीप सातपुते व विक्रम जुवेकर यांनी संगनमताने युएसडीटी डॉलर ट्रेडींगमधून जादा परताव्याचे आमिष दाखवत फसवणूक केली आहे.फसवणुकीतून मिळविलेल्या पैशांची विल्हेवाट लावण्यासह अन्य बँक खात्यात रक्कम वळविण्यासाठी या दोघांनी म्युल बँक खाते सुरु केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांना प्राप्त माहितीवरुन सरकार पक्षातर्फे या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोउनि दरेकर करत आहेत.

# डीकेटीईच्या तीन विद्यार्थ्यांची १२ लाख पॅकेजवर निवड

इचलकरंजी, ता.२२ –

**येथील डीकेटीई संस्थेतील टेक्स्टाईल विभागातील तीन विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ट्रायडेंट ग्रुप या नामांकित कंपनीमध्ये १२ लाख इतक्या आकर्षक पॅकेजवर निवड झाली आहे.**



ट्रायडेंट ग्रुप ही सुमारे १ अब्ज अमेरिकन डॉलर्स उलाढाल असलेली भारतातील अग्रगण्य होम टेक्सटाईल कंपनी असून, तिची उत्पादने ७५ हून अधिक देशांमध्ये निर्यात केली जातात. ही कंपनी टेरी टॉवेल व शिटींग फॅब्रिक उत्पादन करते. उच्च दर्जाचे उत्पादन, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक बाजारपेठेतील भक्कम उपस्थितीमुळे ट्रायडेंट ग्रुपला वस्त्रोद्योग क्षेत्रात ब्रँड नावाने ओळखले जाते.

या कंपनीने डीकेटीईस भेट दिली व २८ विद्यार्थ्यांना ऑनलाईन टेस्टसाठी शॉर्टलिस्ट केले होते.यामधून १० विद्यार्थ्यांची सायकोमेट्रीक टेस्टसाठी निवड केली. त्यानंतर टेक्नीकल व एचआरनी मुलाखात घेवून तीन विद्यार्थ्यांची ट्रायडेंट ग्रुपने १२ लाख पॅकेजवर सुमिरन पांडे, श्रीकांत धुळे व श्रुती गौड यांची निवड केली.याचबरोबर तृतीय वर्ष टेक्स्टाईल विभागातील शुभम आलासे व सुखदा गणोकर या दोन विद्यार्थ्यांची ५० हजार इतक्या विद्यावेतनावर २ महिन्यासाठी समर इंटरनशिपसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व विश्वस्त यांचे प्रोत्साहन तर प्रा.डॉ.एल.एस. आडमुठे, डॉ. यु. जे. पाटील, प्रा.एस.बी. अकिवाटे याचे मार्गदर्शन लाभले.

# सोने पॉलिशच्या बहाण्याने नागरिकांना गंडा

## खोतवाडी येथील घटना : पाच जणांच्या टोळीचा प्रताप

तारदाळ,ता.२२( वार्ताहर)–

**खोतवाडी (ता. हातकणंगले) येथील लाटकर गल्ली परिसरात जुन्या सोन्याचे दागिने नवीनसारखे पॉलिश करून देतो असे सांगून पाच जणांच्या टोळीने नागरिकांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पाच जणांनी स्वतःला सोन्याचे दागिने पॉलिश करणारे कारागीर असल्याचे सांगत घराघरांत जाऊन संपर्क साधला. त्यांनी कमी खर्चात दागिने चमकदार करून देण्याचे आमिष दाखवले. काही नागरिकांनी विश्वास ठेवून आपले चांदी सोन्याचे दागिने त्यांच्या ताब्यात दिले. सदरचे दागिने घेऊन त्या व्यक्तींनी पळ काढला.ही बाब लक्षात आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी गर्दी केली. काही संशयित घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती असून, या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू असून संशयितांचा शोध घेण्यात येत आहे. दरम्यान,अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, घरात येऊन सोने-चांदी पॉलिश करून देण्याचा दावा करणाऱ्यांपासून सावध राहावे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी,असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# खंडणीची मागणी करत दहशत माजवत तोडफोड

## जवाहरनगरमधील घटना ; १२ जणांविरूध्द गुन्हा

इचलकरंजी,ता.२२–

**वहिफणी व्यवसायाच्या स्पर्धेतून १० ते १२ जणांच्या जमावाने हातात कोयता, तलवार घेत दहशत माजवत तोडफोड करण्यासह दरमहा ५० हजार रुपयांची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना मंगळवारी रात्री जवाहरनगर परिसरात घडली. या प्रकरणी लता मारुती माने (वय ५० रा. संतोषीमाता मंदिर, जवाहरनगर) यांनी फिर्यादी दिली असून अभिषेक हिराप्पा तेरणे, दक्ष वडर व ठोंब्या कोळेकर व अनोळखी १० अशा बाराजणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.**

> विविध गुन्ह्यांतून जामीनावर सुटलेले अनेक सराईत छोट्या मोठ्या व्यवसायिकांना धमकी देत खंडणी मागणीच्या घटनेत वाढ होत चालली असून पोलिस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष्य घालून कडक कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.



दहशत माजवून तोडफोड केल्यानंतर पंचनामा करताना शिवाजीनगरचे पोलिस कर्मचारी. (छाया. – मयूर चिंदे)

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, फिर्यादी लता माने यांच्या मुलाचा वहिफणी व्यवसाय असून त्यातूनच तेरणे, वडर, कोळेकर यांच्यासह १० ते १२ जणांनी मंगळवारी रात्रीच्या सुमारास कोयते आणि तलवार घेऊन माने यांच्या घरासमोर येऊन गोंधळ घातला. घरासमोरील सिंटेक्स टाकीवर तलवारीने तसेच घराच्या दारावर कोयता मारुन नुकसान केले.

त्याचबरोबर सागर माने याच्याकडून वहिफणी धंदा जोडून दे अन्यथा दरमहा ५० हजार द्यावेत अशी मागणी करत जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमुद केले आहे.

# ५० हजाराची खंडणीची मागणी करत धमकी

## मोकातील सराईत गुन्हेगारावर गुन्हा

इचलकरंजी,ता.२२ –

**जवाहरनगर परिसरात केबलचा व्यवसाय करायचा असेल तर दरमहा ५० हजार रुपयांची मागणी करत शिवीगाळ व धक्काबुक्कीप्रकरणी मोकातील सराईत गुन्हेगार अभिषेक ईराप्पा तेरणे (रा.दत्तनगर कबनूर) याच्यावर शिवाजीनगर पोलिसात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी आकाश रमेश मेतके (वय २७ रा. जवाहरनगर) याने फिर्याद दिली आहे.**

आकाश मेतके याचा केबल नेटवर्कचा व्यवसाय आहे. मंगळवारी दुपारच्या सुमारास तो केबल कामाच्या निमित्ताने स्वामी अपार्टमेंट परिसरात गेला होता. त्यावेळी तेथे आलेल्या अभिषेक तेरणे याने मेतके याला शिवीगाळ करत तुला जवाहरनगर परिसरात केबला व्यवसाय करायचा असेल तर मला प्रत्येक महिन्याला ५० हजार रुपये द्यायचे, पैसे न दिल्यास जिवंत सोडणार नाही, मी आत्ताच मोक्यातून सुटलो आहे, अशी धमकी देत अंगावर धावून जात शिवीगाळ केली. त्यावेळी मेतके हा कोणताही वाद न करता तेथून निघून गेला. त्याने दिलेल्या फिर्यादीवरुन तेरणे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे तेरणे याने केबल व्यावसायिक आणि वहिफणी एजंटास एकाच दिवशी धमकी देत प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केली. असे असताना पोलिसांकडून एका गुन्ह्याची माहिती देण्यात आली. तर दुसऱ्या गुन्ह्याची माहिती प्रसारमाध्यमांनी सांगितल्यानंतर सायंकाळी उशीरा देण्यात आली. त्यामुळे यामागे नेमके गौडबंगाल काय ? अशी चर्चा रंगली होती.

# पैशाच्या कारणावरुन डॉक्टरला मारहाण

सांगली, ता. २२ (प्रतिनिधी)–

**वाहन दुरुस्तीचे पैसे देण्याच्या कारणावरुन झालेल्या वादावादीतून डॉक्टरांना लाथा बुक्क्यांनी आणि काठीने मारहाण केली. त्याचबरोबर त्यांच्या डोक्यात खुर्ची घालण्यात आल्याची घटना सोमवारी रात्री १० च्या सुमारास मिरज तालुक्यातील दुधगाव येथे घडली. या घटनेत डॉ. इम्तियाज गौसमोहीद्दीन शिकलगार (वय ३८, रा. दुधगाव) हे गंभीर जखमी झाले.**

डॉ. शिकलगार यांचा दुधगाव येथे दवाखाना आहे. संशयित गणेश उल्हास माळी, प्रमोद मिणचेकर, किरण माळी आणि उल्हास माळी (सर्व रा. दुधगाव) हे चौघे इम्तियाज यांच्या दवाखान्यात आले. त्यांनी वाहन दुरुस्तीच्या मुद्दयावर इम्तियाज यांच्याशी वाद घातला. तसेच दवाखान्यातील खुर्ची उचलून त्यांच्या डोक्यात घातली. प्रमोद मिणचेकर याने दवाखान्याबाहेर पडलेली काठी आणून इम्तियाज यांना मारहाण केली. यामध्ये त्या काठीचा फटका पिंकु कुदळे याच्या चेहऱ्यावर बसल्याने तो जखमी झाला. सर्व संशयितांनी इम्तियाज यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दवाखान्याच्या काचा आणि टेबलची तोडफोड केली. जाताना इम्तियाज यांना, तू बाहेर भेट तुला बघून घेतो अशी धमकी दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत सांगली ग्रामीण पोलीसात नोंद झाली आहे.

# जुने जन्म-मृत्यू दाखले मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन ; महानगरपालिकेला अधिकार द्या

इचलकरंजी, ता.२२ –

**जुने जन्म व मृत्यू दाखले उपलब्ध नसलेल्या प्रकरणांमध्ये नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन अशा नोंदींचे डिजिटायझेशन व प्रमाणपत्र वितरणाचे अधिकार इचलकरंजी महानगरपालिकेकडेच देण्यात यावेत, तसेच यासंदर्भात स्पष्ट कार्यपद्धती जाहीर करावी, अशी मागणी महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते उदयसिंग पाटील, जि. प.सदस्य कुमार कांबळे, नगरसेवक शिवाजी पाटील आणि रतन वाझे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक (जन्म-मृत्यू), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**



जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन देताना उदयसिंग पाटील शेजारी कुमार कांबळे, शिवाजी पाटील, रतन वाझे.

निवेदनात, राज्य शासनाच्या निर्देशानुसार जुन्या जन्म व मृत्यू नोंदींचे डिजिटायझेशन पोर्टलवर सुरू आहे. मात्र, अनेक नागरिकांकडे पूर्वीचे जन्म अथवा मृत्यू दाखले उपलब्ध नसल्याने संबंधित नोंदी पोर्टलवर अपलोड करून मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. अनेकांनी पूर्वी दाखले काढलेले नसून काहींचे दाखले कालांतराने हरवले आहेत. मात्र, संबंधित जन्म किंवा मृत्यूची मूळ नोंद नोंदवहीमध्ये स्पष्टपणे उपलब्ध असूनही केवळ जुना दाखला नसल्यामुळे प्रमाणपत्र देण्यास विलंब होत आहे.

यामुळे नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत असून स्थानिक स्वराज्य संस्थांवरही तक्रारींचा भडीमार होत आहे. त्यामुळे ज्या प्रकरणांमध्ये मूळ जन्म अथवा मृत्यू नोंद उपलब्ध आहे, अशा प्रकरणांमध्ये कोणती कार्यपद्धती अवलंबावी, कोणती कागदपत्रे ग्राह्य धरावीत आणि पोर्टलवरील नोंदणी कशा प्रकारे पूर्ण करावी, याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना तातडीने देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून शासनाच्या नियमानुसार आवश्यक कार्यवाही व मार्गदर्शन करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# गाळेधारकांचे महानगरपालिकेसमोर उपोषण

इचलकरंजी,ता.२२–

**येथील शिवतीर्थ परिसरातील फेरीवाले गाळेधारकांचे संरक्षण आणि पुनर्वसन करावे यासह विविध मागण्यांसाठी छोटे व्यापारी फेरीवाले संघटनेच्या वतीने महानगरपालिकेसमोर लाक्षणिक उपोषण करण्यात आले. मागण्या मान्य न केल्यास गुरुवारपासून बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला.**



महानगरपालिकेसमोर उपोषणास बसलेले गाळेधारक. (छाया.– मयूर चिंदे)

श्री शिवतीर्थ परिसरातील जागा महानगरपालिकेच्या वतीने ई बसस्थानक करण्यासाठी निश्चित केली आहे. सध्या महानगरपालिकेच्या या जागेवर खाद्यपदार्थ, फेरीवाले गाळेधारक आणि मुद्रांक विक्रेत्यांचे गाळे आहेत. ई- बस प्रकल्पाच्या नावाखाली पुनर्वसित करण्यात आलेले हे दुकानगाळे कोणतीही पर्यायी जागा उपलब्ध करून न देता हटविण्याचा प्रयत्न सुरू आहे. फेरीवाल्यांचा ई- बस प्रकल्पाला विरोध नाही.

महापौरांनी एकत्र बसून योग्य तो पर्याय काढू आणि फेरीवाल्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन दिले होते. परंतु आश्वासनानंतरही सर्व गाळेधारकांना नोटीसा बजावून सात दिवसांत दुकान गाळे हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या अन्यायकारक निर्णयाच्या निषेधार्थ तसेच पुनर्वसनाशिवाय दुकान गाळे हटविण्याच्या कारवाईला विरोध करण्यासाठी आणि फेरीवाल्यांच्या न्याय्य हक्कांसाठी हे उपोषण करण्यात आले. या आंदोलनात फेरीवाले, दुकान गाळेधारक सहभागी झाले होते.

# सायबर फसवणुकीची रक्कम काढणाऱ्या सहा खातेदारांवर गुन्हे

सांगली, ता. २२(प्रतिनिधी)–

**वेगवेगळ्या सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यात संबंधित बँकांच्या खात्यावर जमा झालेली रक्कम परस्पर धनादेश आणि एटीएमद्वारे काढणाऱ्यांविरुध्द राज्यभरात गुन्हे दाखल केले जात आहेत. सांगली जिल्ह्यातील सहा खातेधारकांनी वेगवेगळ्या गुन्ह्यातील ३१ लाख ५८ हजार रुपये काढल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार आटपाडी, कवठेमहांकाळ, विश्रामबाग आणि सायबर पोलिस ठाण्याकडून सहा अनोळखी बँक खातेदारांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित खातेदारांचा शोध घेऊन त्यांच्यावर अटकेची कारवाई केली जाणार आहे.**

वेगवेगळी आमिष दाखवून पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडले जाते, अशा फसवणुकीच्या गुन्ह्यातील रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केली जाते. देशभरातून सायबर गुन्हेगारांची टोळी नेटवर्क चालविते. फसवणुकीचे गुन्हे गृहमंत्रालयाच्या पोर्टलवर नोंदविले जातात. या पोर्टलवर गुन्हे दाखल झाल्यानंतर पैसे कोठे हस्तांतर झाले याचा शोध घेतला जातो. त्यामधून रक्कम स्वीकारणाऱ्या संशयित लाभार्थींची माहिती संकलित केली जाते. ज्या खात्यामध्ये फसवणुकीची रक्कम गेल्यानंतर त्यांनी खात्यातून धनादेश, एटीएमद्वारे पैसे काढले अशा खातेदारांची माहिती महाराष्ट्र सायबर विभागाकडून प्रत्येक जिल्ह्यातील सायबर ठाण्यांकडे पाठविली आहे. त्यानुसार फसवणुकीची रक्कम हडपणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. देशभरातील ४१ जणांची ४ कोटी १२ लाख ३० हजारांची फसवणूक केल्यानंतर त्यातील २४ लाख ४९ हजार ८३३ रुपये जिल्ह्यातील एका खातेदाराच्या खात्यावर जमा झाल्याचे समजले. तीन तक्रारदारांची १२ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी ३ लाख ८० हजार ५०० रुपये जमा झालेल्या संशयित खातेदारांविरुद्ध पोलिस कर्मचारी गुंडवाडे यांनी फिर्याद दिली.

# वार्षिक सभेत दोघांना मारहाण; १२ जणांवर गुन्हा

मिरज,ता. २२ (प्रतिनिधी)–

**येथील मशिदीच्या ट्रस्टच्या वार्षिक सभेत गोंधळ झाला.१२ जणांकडून दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. रात्री साडेदहा ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान शहरातील कमानवेस मशिदीमधील ट्रस्टच्या वार्षिक सभेमध्ये ही घटना घडली.**

जुबेर शौकत बेडगे (वय ४१, रा. कमान वेस, मिरज) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यांना व त्यांचे भाऊ मोजिम यांना मारहाण करण्यात आली आहे. पोलिसांनी यासीन दस्तगीर मलिदवाले, इम्तियाज दस्तगीर मलिदवाले, मेहबूब मलिदवाले, आफताब शेख, एजाज शेख, राहील पठाण, जुनेद पठाण, साजिद डबीर मलिदवाले, आफताब पठाण, अरमान उगारे, फिरोज उगारे, मतीन शेख (सर्व रा. कमानवेस) याच्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जुबेर बेडगे हे कमानवेस येथील मशिदीचे ट्रस्टचे वार्षिक सभा सुरू असताना अध्यक्षांना जमाखर्चाचा हिशोब देत होते. यावेळी तू खोटी माहिती का देत आहेस असे म्हणून यासीन मलीदवाले, इम्तियाज मलिकवाले या दोघांनी अंगावर धावून येऊन बेडगे यांना मारहाण केली. बेडगे यांचे भाऊ मोजिम यांनाही अंगावर धावून येऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# शिरोळ तालुक्यात दमदार पाऊस

बुबनाळ, ता.२२ (वार्ताहर)–

शिरोळ तालूक्यातील गौरवाडसह औरवाड,आलास,बुबनाळ, कवठेगुलंद,शेडशाळ,गणेशवाडी परिसरात बुधवारी दमदार पाऊस बरसला.

गेल्या शनिवारपासून येथे सांयकाळच्यावेळी पावसाची नुसतीच भुरभुर सुरु होती. मात्र बुधवारी सकाळपासुन पावसाच्या हलक्या सरी बरसत होत्या.दुपारी तीन नतंर पावसाने दमदार सुरुवात केली. तो रात्री उशिरापर्यंत सुरु होता.दमदार पावसामुळे ऊसासह सोयाबीन, भुईमुग,भात,उडीद पिकांना संजीवनी मिळाली आहे. तर गौरवाडसह सात गावातील शेतकरीवर्ग आपल्या शेतशिवारात आडसाली ऊसपिक लावणीसाठी व्यस्त झाला आहे.तसेच मोठ्या ऊसाला पावसाळी खतांची मात्रा देण्यासाठी शेतकरीवर्गाची लगबग सुरु झाली आहे.

# अंबाबाई मंदिर संवर्धनातील त्रुटींची चौकशी, दोषींवर कारवाई करणार

## जिल्हाधिकारी : पुरातत्त्व विभागावर प्रश्नांचा भडिमार

कोल्हापूर, ता. २२ (प्रतिनिधी)–

**करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील सुरू असलेल्या संवर्धनाच्या कामात त्रुटी असल्याच्या तक्रारींची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आढावा बैठक झाली.**



संवर्धनाच्या कामाच्या दर्जा, कार्यपद्धती, धार्मिक परंपरा, तांत्रिक निकष आणि पारदर्शकतेबाबत अभ्यासक, नागरिक व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी पुरातत्त्व विभागाला प्रश्नांच्या भडिमाराने धारेवर धरले. बैठकीनंतर काही कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांविरोधात निषेध व्यक्त केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

जिल्हाधिकारी डॉ. राठोड म्हणाले, संवर्धनाच्या कामाबाबत प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीची वस्तुनिष्ठ चौकशी केली जाईल. कामात निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी मांडलेल्या सूचनांचाही विचार करून आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

आम. राजेश क्षीरसागर यांनी, मंदिराच्या संवर्धनाच्या कामात कोणतीही हयगय सहन केली जाणार नसल्याचे सांगितले. दिलीप देसाई यांनी, ग्राइंडर आणि ब्रेकरचा वापर नियमबाह्य असल्याचा आक्षेप घेत मंदिर परिसरातील हौद आणि कारंज्यांचे अवशेष कुठे आहेत, असा सवाल केला. ॲड. प्रसन्न मालेकर यांनी,संवर्धन करताना धार्मिक परंपरांचा विचार होणे आवश्यक असल्याचे सांगितले.वसंतराव मुळीक यांनी, इतक्या मोठ्या कामाचे कार्यवृत्त न ठेवणे गंभीर बाब असल्याचे सांगितले. इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी पुरातत्त्व विभाग, देवस्थान समिती आणि काम करणाऱ्या संस्थेचा समावेश असलेली स्वतंत्र देखरेख समिती स्थापन करण्याची मागणी केली.

विजय देवणे यांनी पुरातत्त्व विभागाचे अधिकारी विलास वाहने आणि तेजस गर्ग यांना जबाबदार धरून त्यांना तातडीने हटविण्याची मागणी केली. बैठकीस उपमहापौर अक्षय जरग, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, देवस्थान समितीच्या सचिव वर्षा साळुंखे,यांच्यासह ॲड. बाबा इंदुलकर,बंडा साळोखे, बाबा पार्टे, आर. के. पोवार, प्रवीण पाटील, गजानन तोडकर , अनिरुद्ध कोल्हापुरे,हर्षल सुर्वे,किशोर घाटगे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अभ्यासक व नागरिक उपस्थित होते.

**बैठकीनंतर गोंधळ; चप्पल दाखवून निषेध**

बैठक संपल्यानंतर काही कार्यकर्त्यांनी व्यासपीठावर धाव घेत पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने यांना विशाळगडाच्या मुद्द्यावर जाब विचारला. यावेळी काहींनी त्यांना चप्पल दाखवून निषेध व्यक्त केला. काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली आणि संबंधित अधिकाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढले.

महासत्ता

**सुविचार :-** आयुष्यात काहीतरी करुन दाखवायचे असेल तर टीकाकारांकडे दुर्लक्ष करायला शिका.

गुरुवार,ता.२३ जुलै २०२६

■ संपादकीय ■

# धोक्याची घंटा

दिल्लीत दाटलेला अश्रूधूर आणि जंतरमंतरवर घुमणारा असंतोषाचा आवाज या देशातील सर्वोच्च व्यवस्थेला एकाच वेळी आरसा दाखवणारा आणि इशारा देणारा आहे. नीट-यूजी परीक्षेच्या गोंधळावरून पेटलेला वणवा केवळ एका परीक्षेपुरता उरलेला नाही. हा लढा या देशातील, तरुण पिढीच्या भवितव्याचा, त्यांच्या स्वाभिमानाचा आणि व्यवस्थेने त्यांना पारदर्शी संधी नाकारण्याच्या मनोवृत्तीविरुद्धचा आहे. परंतु, जमिनीवरील वास्तवापासून फारकत घेतली असलेल्यांना आणि खुद्द न्यायपालिकेत बसलेल्या विद्वानांनाही तरुणाईच्या मनातील रोष न समजणे, त्यांच्या व्यथेला योग्य उत्तर न देणे आणि एवढेच नव्हे तर त्यांची चक्क 'झुरळ' म्हणून संभावना करणे हीच चूक आता मोठी शोकांतिका ठरू पाहते आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देण्यात आलेला 'चलो दिल्ली' चा नारा आजही तसाच आहे. तथापि, आता नारा देणारा कोणी एकमेव चेहरा नाही तर ती देशाची पुढची पिढी आणि भविष्य आहे. तरुणांनी 'चलो संसद' म्हणून आवाज बुलंद केला. राजधानी दिल्लीच्या गल्ल्यांमध्ये, रस्त्यांवर, मेट्रो स्टेशनबाहेर तासन्तास अडकून पडलेल्या रुग्णवाहिका आणि सामान्य नागरिक एका बाजूला होते, तर दुसऱ्या बाजूला हातावर लाठ्यांचे वळ आणि डोळ्यात भविष्याची भीती घेऊन लढणारे तरुण होते. उत्स्फूर्तपणे जेव्हा एखादे आंदोलन उभे राहते तेव्हा त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो. आपापल्या परीने या आंदोलनाचा लाभ घेण्याचा व्यवहारी प्रयत्न होतो. आंदोलनाच्या आडून कोणाला आपली खुर्ची घट्ट करायची असते, कोणाला आपले दुकान चमकवायचे असते तर कोणाला आपल्या पुढच्या खेळीसाठीचे भांडवल म्हणून या पायाभरणीचा उपयोग करायचा असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांच्या बैठकीत मुलांना भडकवू नका, त्यांना योग्य मार्ग दाखवा असा सबुरीचा सल्ला दिला. ऐकायला हे विधान खूप पालकत्वाचे आणि सहानुभूतीचे वाटते. पण प्रश्न असा आहे की, या तरुणांना भडकवले कोणी? त्यांना रस्त्यावर यायला भाग कोणी पाडले ? जेव्हा एकामागोमाग एक १५२ पेपर लीक होतात, आणि तरीही कोणीच कोणतीच जबाबदारी घेत नाही, तेव्हा तरुणांनी कोणता योग्य मार्ग निवडावा? संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीलाच दोन्ही सभागृहांचे कामकाज ठप्प झाले. विरोधक गोंधळ घालत आहेत, असा आरोप सत्ताधारी करत आहेत. पण, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी जेव्हा पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करतात, तेव्हा त्याला केवळ राजकारण म्हणून मोडीत काढता येणार नाही. ज्या परीक्षा पद्धतीवर देशाच्या गुणवत्तेचा पाया रचला जातो, तीच पद्धत जर कुजली असेल, तर त्यावर संसदेत चर्चा होणार नाही तर कुठे होणार ? केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि कॉकरोच जनता पार्टी यांच्यातील चर्चेच्या फेऱ्या आहेत. नड्डा म्हणतात बैठक सौहार्दपूर्ण झाली. त्यांनी दुसऱ्या दिवशी जखमी विद्यार्थ्यांची भेट घेतल्याचीही बातमी आहे. सरकारला हे अगोदर करावेसे का वाटले नाही ? इतके दिवस विद्यार्थी दिल्लीत होते. त्यांना वेड्यात काढण्याऐवजी अगोदरच त्यांच्याशी संवाद साधता आला नसता का ? तसे जर झाले असते तर प्रकरण या थराला गेलेच नसते. हा प्रश्न एवढ्या प्रतिष्ठेचा का केला गेला ? एवढा अहंकार काय कामाचा आणि ते करूनही काय साधले गेले? दिल्ली पोलिसांचा दावा आहे की ११८ पोलीस जखमी झाले. आंदोलकांचे म्हणणे आहे की त्यांच्यावर अमानुष अत्याचार झाले. हिंसेचे समर्थन कोणीच करू शकत नाही. दिल्लीच्या रस्त्यांवर पडलेले दगड आणि फुटलेल्या गाड्या हे चित्र नक्कीच भूषणावह नाही. पण, शांततेच्या मार्गाने उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचुक आणि इतरांना जेव्हा उचलून नेले जाते, तेव्हा असंतोषाचा भडका उडणे स्वाभाविक असते. अमित शहा यांच्या कक्षात बंद दाराआड बैठकांचे सत्र सुरू आहे, सत्ताधाऱ्यांचे चेहरे त्रस्त आहेत, कारण त्यांना स्पष्ट दिसत आहे की, हा केवळ विद्यार्थ्यांचा राग नाही, तर हा संपूर्ण देशातील पालकांचा आणि मध्यम वर्गाचा उद्रेक आहे. नीटमधील गडबडीनंतर अनेक तरूण-तरूणींनी आत्महत्या केली. तक्रार करण्यापेक्षा त्यांना मृत्यू जवळ करणे सोपे वाटले. जेव्हा एखादा तरुण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो, तेव्हा त्या एका मृतदेहासोबत संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने राख होतात. अशा मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची भरपाई मागणे ही कोणतीही अवाजवी मागणी नाही, ती व्यवस्थेने केलेल्या अन्यायाचा दाखला आहे. सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की, तरुणाईचा हा प्रवाह सळसळता असतो. त्याला योग्य वेळ आणि दिशा दिली नाही, तर तो विध्वंसाच्या मार्गाने जातो. आज दिल्ली, मुंबई, बेंगळुरूत आणि लखनौमध्ये जो आक्रोश दिसतो आहे, तो सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. तरुणांना झुरळ समजण्याचा प्रयत्न केला, तर तेच झुरळ व्यवस्थेची पाळेमुळे कुरतडून टाकतील हे वेगळे सांगायला नको.

# सिंधु पाणीवाटप करार आणि पाकचे रडगाणे

**पाकिस्तान ज्या प्रकारे १९६० मध्ये झालेल्या भारतासोबतच्या 'सिंधु नदी पाणीवाटप करारा'बाबत आंतरराष्ट्रीय व्यासपीठांचा गैरवापर करून भारताच्या भूमिकेविरुद्ध वातावरण तयार करण्याचा अपयशी प्रयत्न करत आहे, त्यावरून हेच सिद्ध होते की तो या कराराच्या विविध शर्तींमध्ये पर्यावरणीय आणि हवामानाच्या बदलांनुसार समकालीन समीक्षा करण्यास तयार नाही.**

तो असे गृहीत धरून चालला आहे की, ५६ वर्षांपूर्वी जसे हवामानाचे स्वरूप होते, तसेच ते आजसुद्धा कायम आहे. याशिवाय, पाकिस्तान ज्या प्रकारे दहशतवादाला आपल्या परराष्ट्र धोरणाचा भाग बनवून ठेवत आहे, विशेषतः भारताच्या विरोधात आपल्या हद्दीतून दहशतवादी पाठवून ज्या प्रकारच्या रक्तपाताच्या उद्योगात गुंतला आहे, त्यामुळे दोन्ही देशांमधील परस्पर संबंध कसे सुरळीत राहू शकतील? यामुळेच गेल्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या सुरुवातीस काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांनी २० भारतीय पर्यटकांची अत्यंत निर्घृण हत्या केली, तेव्हा भारत सरकारने जल करार स्थगित करण्याची घोषणा केली आणि स्पष्ट केले की जोपर्यंत पाकिस्तान सीमापारचा आतंकवाद बंद करणार नाही, तोपर्यंत त्याच्याशी कोणत्याही प्रकारची चर्चा केली जाणार नाही. सोबतच, भारत सरकारने हेसुद्धा स्पष्ट केले की आता वेळ आली आहे की सिंधु जल कराराच्या शर्तींची पुनर्रचना केली जावी. पहलगाममध्ये ज्या प्रकारे भारतीय पर्यटकांचा धर्म विचारून त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती, त्याने मानवताही सुन्न झाली होती. या भीषण हत्याकांडाचा एकसुरात तीव्र निषेध जम्मू-काश्मीरच्या मुस्लिम बहुसंख्य जनतेनेही केला होता आणि याच्या विरोधात स्वतःहून अनेक दिवस काश्मीर बंद ठेवण्यात आला होता. या कराराचा मुख्य पाया परस्पर विश्वास आणि सलोखा हा होता, जेणेकरून जल स्रोतांचा अभाव असलेल्या पाकिस्तानच्या लोकांना शेती व पिण्यासाठी पाणी उपलब्ध होऊ शकेल. त्या काळापर्यंत भारत आणि पाकिस्तान यांच्यात काश्मीर संघर्षाशिवाय दुसरे कोणतेही मोठे युद्ध झाले नव्हते, त्यामुळे त्यावेळची परिस्थिती पूर्णपणे भिन्न होती. परंतु त्यानंतर १९६५ आणि १९७१ मध्ये दोन्ही देशांमध्ये भीषण युद्धे झाली, ज्यामध्ये पाकिस्तानला



दारूण पराभवाला सामोरे जावे लागले, तरीसुद्धा आपण सिंधु जल करार चालूच ठेवला. त्यानंतर १९८९ पासून पाकिस्तानने भारतात आतंकवादी कारवाया वाढवल्या आणि भारताला हजार जखमा देण्याच्या धोरणावर चालण्यास सुरुवात केली, तसेच १९९९ मध्ये कारगिलसारखे कुकर्मसुद्धा केले. परंतु पाकिस्तान इथेच थांबला नाही; त्याने २००२ मध्ये भारतीय संसदेवरील हल्ल्यापासून ते २००८ मध्ये मुंबईतील अत्यंत नृशंस दहशतवादी हल्ल्यापर्यंत अनेक घातपात केले, ज्यामध्ये अनेक देशी-परदेशी नागरिक मारले गेले. पाकिस्तान तिथेही थांबला नाही, तर तो सातत्याने भारतात आतंकवादी कारवायांना अंजाम देत राहिला आणि निष्पाप नागरिकांचा बळी घेत राहिला. याच मालिकेत त्याने गेल्या वर्षी पहलगाममध्ये वीस भारतीय पर्यटकांची हत्या केली, ज्यामुळे सरकारच्या संयमाचा अंत झाला आणि त्याने हा जल करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. आता पाकिस्तान याच गोष्टीविरोधात सगळीकडे आरडाओरडा करत सुटला आहे. या कराराच्या शर्तींनुसार सिंधु नदीच्या खोऱ्यातील सहा प्रमुख नद्यांची विभागणी पूर्व आणि पश्चिम अशा दोन गटांत करण्यात आली. यामध्ये पूर्वकडील तीन नद्या ब्यास, रावी आणि सतलज यांच्या पाण्याचा अधिकार भारताला देण्यात आला, तर पश्चिमेकडील तीन नद्याह्र सिन्धु, चिनाब आणि झेलम यांच्या पाण्याचा अधिकार पाकिस्तानला देण्यात आला. अशा प्रकारे, भारताच्या वाट्याला या सर्व ६ नद्यांच्या एकूण पाणी क्षमतेपैकी केवळ २० टक्के पाणी आले, तर पाकिस्तानच्या वाट्याला ८० टक्के पाणी गेले. कराराच्या शर्तींनुसार, पाकिस्तानच्या वाट्याला गेलेल्या पश्चिमकडील तीन नद्यांच्या पाण्याचा वापर भारत आपल्या सिंचन साधनांसाठी मर्यादित स्वरूपातच करेल, परंतु सिंचनाव्यतिरिक्त इतर वापरासाठी यावर कोणतेही बंधन लागू असणार नाही; जसे की वीज निर्मिती, मत्स्यपालन आणि जलमार्ग नौवहन. याचा सरळ अर्थ असा होतो की,भारत पश्चिमेकडील तीन नद्यांचा अमर्याद वापर अशा उपक्रमांसाठी करू शकतो, ज्यामध्ये पाण्याचा जमिनीमध्ये अपव्यय होत नाही, उदा. जलविद्युत प्रकल्प. भारत सरकार याच शर्तीनुसार चिनाब नदीच्या विविध जलक्षेत्रांमध्ये ५००० मेगावॅट वीज निर्मितीचे प्रकल्प राबवत आहे, ज्यावरून पाकिस्तान नेहमीच आरडाओरडा करत असतो. यामुळेच भारत सरकारचे म्हणणे आहे की या कराराची योग्य पद्धतीने समीक्षा केली जावी आणि शर्तींचे पुनर्निर्धारण केले जावे. या करारामध्ये अधिक संतुलन आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे, जेणेकरून कोणत्याही प्रकारचा संभ्रम राहणार नाही. हा करार आता आपल्या जुन्या स्वरूपात कायम राहू शकत नाही, कारण जसे हवामानामध्ये बदल झाले आहेत, त्यांची दखल घेणे गरजेचे आहे. भविष्यातील कराराचे प्रारूप तयार करण्यासाठी नवीन संदर्भाने चर्चा करण्याची गरज आहे, जेणेकरून नव्या आव्हानांचा सामना केला जाऊ शकेल. परंतु यासाठी पहिली अट हीच आहे की पाकिस्तानने सीमापारचा आतंकवाद पूर्णपणे थांबवला पाहिजे. भारत चिनाब नदीवर सावलकोट येथे १८५६ मेगावॅटचा जलविद्युत प्रकल्प राबवत आहे, तर पाकलदुल येथे १००० मेगावॅट, रतले येथे ८५० मेगावॅट, किरू येथे ६२४ मेगावॅट आणि क्वार येथे ५४० मेगावॅटचे प्रकल्प समाविष्ट आहेत. परंतु पाकिस्तान भारताच्या या कायदेशीर अधिकारावरसुद्धा आक्षेप घेऊन बोंब ठोकत आहे. पण त्यांचा हा कांगावा यशस्वी होणार नाही हे जगजाहीर आहे.

दैनंदिनी

# पर्यावरणाबाबत गंभीर होणे काळाची गरज

## प्रदूषण,वृक्षतोड रोखण्यासाठी सामुहिक प्रयत्न व्हावेत



**पर्यावरणाचे महत्त्व अजूनही बहुतांश लोकांना माहित नाही. म्हणून बहुतांश लोक पर्यावरणाबाबत म्हणावे तेवढे गंभीर व जागरूक दिसत नाहीत. पर्यावरणाची जीवापाड काळजी घेत नाहीत. ज्यांना मानवी जीवनाशी निगडित पर्यावरणाचे किती महत्त्व आहे? हे कळते ते लोक पर्यावरणाबाबत नेहमी जागरूक, सतर्क व गंभीर राहतात. पर्यावरणाला धोका पोहोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतात. पर्यावरण प्रेमी बनून पर्यावरणाला जीवापाड जपतात. पर्यावरणाचे संरक्षण करतात आणि समाज बांधवांना, गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देतात.**

आता पर्यावरण म्हणजे काय? हा प्रश्न प्रत्येकाला पडलाच असेल. तर हवा,पाणी, जमीन, वनस्पती, प्राणी आणि मानव या सर्वांचा समावेश पर्यावरणात होतो. हवा, पाणी, वनस्पती आणि प्राणी यांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या बहुतांश गाड्या, औद्योगिक कारखाने, जीवाश्म इंधनांचे ज्वलन हे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात. देशात वायू प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा सुळसुळाट आणि औद्योगिक कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांना स्वच्छ व शुद्ध ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे. म्हणून याचा परिणाम थेट मानवी आरोग्यावर होत आहे. आणि मानवी जीवन धोक्यात येत आहे. वायु प्रदूषण ही समस्या देशात खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वायु प्रदूषण टाळायचे असेल आणि आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर आपल्याला पहिल्यांदा पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या सर्व वाहनांवर बंदी घालावी लागेल आणि सीएनजी, इथेनॉल आणि विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्राधान्य द्यावे लागेल. तसेच औद्योगिक कारखाने प्रदूषण मुक्त कसे चालवता येतील? यावर सुद्धा विचार मंथन व्हावे लागेल.

हल्ली देशात वृक्षतोड मोठ्या प्रमाणात केली जात आहे. मोठमोठी जंगले नष्ट करून लोक त्या ठिकाणी प्लॉटिंग पाडत आहेत. आणि मोठमोठे उद्योग धंदे आणि वसाहती बसवत आहेत. याचा परिणाम थेट मानवी जीवनावर होत आहे. वृक्षतोड केल्यामुळे पाऊस वेळेवर पडत नाही. पडला तरीही नुसते फवारेच, नाहीतर पडतच नाही. अशी विदारक परिस्थिती सध्या महाराष्ट्रात उद्भवली आहे. सध्या महाराष्ट्राच्या काही भागात मनाजोगा मुबलक पाऊस पडत आहे तर काही भागात अजून पावसाचा पत्ता नाही. जिकडे झाडे आहेत तिकडे मात्र पाऊस चांगला बरसत आहे. ही आनंदाची बाब आहे परंतु खेदाची बाब अशी की, बहुतांश लोकांना झाडांचे महत्त्व माहित नसल्यामुळे ते मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करत आहेत. पावसाचा आणि वृक्षांचा एकमेकांशी असणारा जवळचा संबंध जर लोकांना माहित असता तर लोकांनी वृक्षतोड कधीच केली नसती. त्यासाठी प्रशासनाने गावोगावी व खेडोपाडी जाऊन वृक्ष लागवड मोहीम राबवावी. वृक्षांचे महत्त्व लोकांना समजावून सांगावे. वृक्षतोड करणाऱ्यास कठोर शासन करायला हवे. एक माणूस एक झाड ही संकल्पना राबवावी. झाडे लावल्याशिवाय पाऊस पडणार नाही हे लक्षात घेऊन प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून व त्याचे संगोपन करून पर्यावरणाला अधिक मजबूत करूया.

मृग नक्षत्राला प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस पडलाच नाही. काही शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली तर काही शेतकऱ्यांनी अजूनही पेरणी केलीच नाही. पावसाळा हा ऋतू आता संपत येत आहे. तरीसुद्धा मराठवाडा अजूनही कोरडाठाक आहे. याला आपणच जबाबदार आहोत परंतु आपण निसर्गाला दोष देत आहोत. आपण मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केलीच नसती आणि पर्यावरणाला अबाधित ठेवले असते तर अशी दुष्काळजन्य परिस्थिती आपल्यावर आलीच नसती. आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. आता गरज आहे आपल्याला पर्यावरणाचे महत्त्व जाणून घेण्याची. आणि खूप खूप वृक्ष लागवड करून पावसाला निमंत्रण देण्याची. त्यासाठी आपल्याला पर्यावरणाबाबत गंभीर होणे काळाची गरज आहे. आपण पर्यावरणाबाबत गंभीर नसल्यामुळे आपल्यावर ही परिस्थिती ओढवली आहे. आपण जोपर्यंत पर्यावरणाबाबत गंभीर होणार नाही आणि पर्यावरणाची काळजी घेणार नाही तोपर्यंत आपल्या वाट्याला सुखाचे दिवस येणार नाहीत. जर आपल्याला मनाजोगा मुबलक पाऊस पडावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने पर्यावरणाचे संतुलन अबाधित ठेवणे काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने पर्यावरणाचे मोल वेळीच जाणून पर्यावरणाला अधिक मजबूत कसे बनवता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला गरज आहे ती पर्यावरणाबाबत गंभीर होण्याची आणि पर्यावरणाला अधिक सुंदर बनवण्याची.

■ चंद्रकांत कांबळे

# प्लास्टिकचा नायनाट करणे जरुरीचे

आजकाल कोणत्याही शहरात अगदी खेड्यात सुद्धा जागोजागी प्लास्टिकचे ढीग दिसतात. विशेषतः प्लास्टिक पुलाच्या शेजारी तर मोठ्या प्रमाणात साठलेले अनेक खेड्यात दिसून येते. भाजी किंवा किराणा घेताना तो जवळ जवळ सर्वच ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांतून दिला जातो. याशिवाय अलीकडे स्वयंपाक घरात प्लास्टिकचा वापर वाढलेला दिसून येतो. आता दैनंदिन व्यवहारात प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे.

भारतात प्लास्टिक कचऱ्याच्या बाबतीत गुजरात आघाडीवर आहे.प्लास्टिक कचऱ्याचा माती, नद्या, तसेच पाणी यावर गंभीर परिणाम होतो. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. प्लास्टिकच्या पाण्यामुळे गटारी तुंबतात व प्रचंड नुकसान होते. प्लास्टिकमध्ये टाकून दिलेल्या अन्नामुळे अनेक प्राणी ते खाऊन मरतात. महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे १.५ दशलक्ष टन कचरा तयार होतो. भारतात प्लास्टिक उद्योगाची उलाढाल दरवर्षी ३.९ लाख कोटी रुपये आहे तसेच भारत दरवर्षी एक लाख कोटी रुपयाची प्लास्टिक निर्यात करतो. भारतात दरवर्षी सुमारे ९० लाख ते एक कोटी टन कचरा तयार होतो. प्लास्टिकच्या घातक वापरापासून सुटका करण्यासाठी कापडी पिशव्या. कागदी पिशव्या वापरणे हितकारक होईल. काही दिवसापूर्वी महाराष्ट्र सरकारने प्लास्टिक वापराबाबत कडक निर्बंध घातले होते .आज पुन्हा त्या निर्बंधाची जरुरी आहे. लोकांनी स्वतः हुन निर्बंध लादून घेतल्यास प्लास्टिकचा वापर कमी होईल.

■ शांताराम वाघ

## वाचकांचा पत्रव्यवहार

# शाही खानपानाचा सरकारने फेरविचार करावा

आखाती युद्धामुळे आपल्या देशाचे पंतप्रधान यांनी सर्व देशवासीयांना काटकसरीचे आवाहन केले असताना याउलट दुसरीकडे थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना शासकीय निवासस्थानी भेटायला येणाऱ्या अभ्यागतांचे, अतिथींचे आदरातिथ्य करण्यासाठीं मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वर्षा, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नंदवन तर सुनेत्रा पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी शाही बडजास्त करण्यात आल्याचे वृत्त आहे.



या खानपानाचा ठेका सुखसागर हॉस्पिटॅलिटी सर्विसेस यांना देण्यात आल्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. हा सर्व शाही खानपान सेवा खर्च सरकारच्या तिजोरीतून वार्षिक ९ कोटी ८५ लाख रुपयांतून केला जाणार आहे. सीएम, डीसीएम यांना शासकीय बंगल्यावर भेटायला येणाऱ्यांना बटाटेवडा, पंजाबी समोसा,पट्टी समोसा, कचोरी, कोथिंबीर वडी, मिसळ, पावभाजी, मटण बिर्याणी, चिकन बिर्याणी, ड्रायफ्रुट्स, मोदक, उकडीचे मोदक, काजू मोदक तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी शाही दावत डीनरची मेजवानी असा खास बेत असणार आहे त्यामुळे पुढील चार वर्षांत सरकारी तिजोरीवर ३९ कोटी ४० लाख रुपयांचा बोजा पडणार आहे.

इकडे जनता महागाईने होरपळत असताना असा वारेमाप खर्च करणे योग्य आहे का ? अशी शाही बडजास्त करण्याची काही गरज वाटतं नाही कारण भेटायला येणारी सर्वसामान्य व्यक्तीचअसणारं आहेत. शेवटी काय पंतप्रधानांनी काटकसरीचे आवाहन केले आहे त्याला आपण अधिन राहिले पाहिजे त्यामुळे सरकारने या गोष्टीचा फेरविचार करणे गरजेचे आहे.

■ राजू जाधव,मांगूर

# महाराष्ट्रात शैक्षणिक प्रगतीचा वेग वाढवायला हवा

देशात जास्तीत जास्त रोजगार क्षमता, देशाची आणि नागरिकांची सुरक्षितता केली जात असताना देशातील जनता जास्तीत जास्त तंत्रज्ञानाने आणि कुशलतेने साक्षर झालेली असावी. तंत्रज्ञानाने कुशल म्हणजेच लोकांना संगणक, इंटरनेट आणि डिजिटल व्यवहार यांचा वापर करता येणे शक्य व्हायला पाहिजे. पायाभूत सुविधा, औद्योगिकीकरण, आर्थिक स्वयंपूर्णता याला साक्षरतेची जोड असणे अत्यावश्यक आहे. मात्र विकसित देशांमधील तांत्रिकदृष्ट्या साक्षरता आणि भारतातील तांत्रिकदृष्ट्या साक्षरता यांत फार मोठा फरक आहे. आपल्या देशातील केरळ वगळता इतर राज्यांत शिक्षणाबाबत अंधार असल्याचे दिसून येते. त्यामानाने आकाराने मोठ्या असलेल्या महाराष्ट्रात ३ हजार २०१ शाळांमध्ये वीज पुरवठा होऊ शकलेला नाही. त्यामुळे तिथे संगणक, इंटरनेट आणि डिजिटल लायब्ररीज उपलब्ध होऊ शकलेल्या नाहीत. राज्यातील १०९३८ शाळांमध्ये वीज आहे, पण ती उपयोगात आणली जात नाही. २३८५५ शाळांमध्ये इंटरनेट उपलब्ध झालेले नाही. तंत्रज्ञान युगातील संगणक आणि इंटरनेट उपलब्ध नसल्यामुळे या शाळांमध्ये डिजिटल अंधारच आहे असे नाईलाजास्तव म्हणावे लागेल. यावरून ग्रामीण आणि आदिवासी भागातील परिस्थितीचा अंदाज बांधता येऊ शकतो. शाळेतील शिक्षक आणि शालेय इमारती याबाबत बरेच दुर्लक्ष झालेले दिसत असल्याने राज्यातील साक्षरता फक्त ७३ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकली आहे. राज्यातील सुमारे एक लाखांहून अधिक शाळांमधून ७,५०,२५२ शिक्षक हे २,१६,३२,६६९ विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. या प्रमाणाचा विचार केला असता राज्यातील शिक्षण व्यवस्थेबाबत असलेली उदासीनता दिसून येते.शाळांच्या पायाभूत सुविधांसाठी केलेला खर्च हा शाळांच्या विकासावर, पर्यायाने अधिक साक्षरता निर्माण करण्यावर झाला असता तो खर्च मूलभूत स्वरूपाचा ठरू शकतो. राज्यातील शिक्षण क्षेत्रांत पूर्वी ज्या चळवळी केल्या गेल्या त्यामानाने सध्याच्या तंत्रज्ञान युगातील चळवळींचे प्रमाण फार कमी असल्याचे जाणवते. देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात अजूनही प्रगतीचा वेग वाढविण्याची गरज आहे असे म्हणावे लागेल.

■ स्नेहा राज

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**गुरुवार,ता.२३.७.२०२६,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे दक्षिणायणे,ग्रीष्म ऋतो, आषाढ मासे, शुक्ल पक्षे, नवमी तिथी,७.०४ नंतर दशमी तिथी,विशाखा नक्षत्र, २५.४३ नंतर अनुराधा नक्षत्र,तुला रास १९.०१ नंतर,वृश्चिक रास,शुभ योग १९.२० नंतर, शुक्ल योग,कौलव करण ०७.०४ नंतर,तैतिल करण २०.०६ पर्यंत,दिनमान १२.५१,सुर्योदय ६.१४,सुर्यास्त १९.०५ (कोल्हापूरचे) राहू काळ दुपारी १.३० ते ३, भा.श्रावण आरंभ सकाळी ७.३० नंतर, वस्त्रधारण,मिरची लागवड,स्थावर खरेदी विक्री.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष–** तुमचा प्रतिस्पर्धी तुम्हाला चुकीचे ठरविण्यासाठी सरसावेल. प्रवास करावा लागणार असेल तर सर्व महत्त्वाची कागदपत्रे बरोबर ठेवा. घरी पाहुण्यांचे आगमन होईल. त्यामुळे वातावरण आनंदित राहील. धनलाभ होईल.

**वृषभ–** व्यावसायिकांना बढती आणि आर्थिक फायदा मिळेल. मित्रांचा आधार लाभेल आणि ते तुम्हाला आनंदी ठेवतील. व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.

**मिथून–**अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल. तुमच्या कामाची आज स्तुती होईल. अडचणींवर मात कराल. वादविवाद टाळा.

**कर्क–**खर्चावर नियंत्रण मिळवा, चैनीसाठी पैशांची उधळपट्टी होईल.कुटूंबातील सदस्यांसोबत संमेलन, एकत्रित कार्यक्रम केल्याने प्रत्येकाचा मूड चांगला बनेल.

**सिंह–**आज तुमचे सहकर्मी तुमच्या कामाचे कौतुक करतील आणि तुमचा बॉस ही तुमच्या कामाने आनंदी होईल. ज्यांनी धन गुंतवणूक केली होती त्यांचा त्यांना फायदा मिळेल.

**कन्या–**आपले मत मांडण्यास कचरु नका. तुमचा आत्मविश्वास ढळू देऊ नका, अन्यथा त्यामुळे आपल्या प्रगतीमध्ये अनेक अडचणी निर्माण होतील. आर्थिक लाभ होईल.

**तुळ–**महत्त्वाच्या कामाची फाईल सर्व बाबतीत चोख आणि परिपूर्ण असल्याची तुम्हाला खात्री असल्याशिवाय वरिष्ठांच्या हाती सोपवू नका. धार्मिक स्थळांना भेट द्याल.

**वृश्चिक–**नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल. कुटुंबासमवेत प्रवास घडेल.पण प्रवासामुळे त्रासून जाल.

**धनु–**धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल. प्रलंबित घटना,वादग्रस्त विषय संदेहास्पद होतील आणि खर्चामुळे तुमचे मन काळवंडून जाईल.

**मकर–**इतर लोक त्यांचे प्रश्न घेऊन तुमच्याकडे आले तर त्याकडे दुर्लक्ष करा. जुने मित्र भेटतील. त्यामुळे दिवस आनंदात जाईल. ऑफिसमध्ये समस्या निर्माण होतील.

**कुंभ–** आरोग्याच्या भल्यासाठी उगा त्रागा करु नका. आर्थिक प्रश्न भेडसावतील. तुम्हाला वाटले त्यापेक्षा तुमचा भाऊ तुम्हाला तुमच्या गरजेच्या वेळी उत्तम पाठिंबा देऊ करेल.

**मीन–** तुमची कमकुवत इच्छाशक्ती यामुळे तुम्ही भावनिक व मानसिकदृष्ट्या कमजोर बनू शकाल. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# महामार्गावरच गाव, बसच थांबत नाही राव..

## पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील गावातील एसटी बस सेवेची अवस्था

यमगर्णी,ता.२२(बंडू कुंभार)-

**सध्या राष्ट्रीय महामार्गाचे सहा पदरीकरणाचे काम गतीने सुरु झाले आहे. येत्या काही दिवसात हे काम पूर्ण होणार आहे. महामार्गालगत असलेल्या खेडेगावाजवळ उड्डाणपुलाची निर्मिती केली आहे. त्यामुळे या गावांना बसचा फटका बसत आहे. सेवा रस्त्यावरून बस आल्यास ती महामार्गालगत असलेल्या गावात थांबते.**

मात्र गेल्या काही दिवसापासून अनेक बस थेट महामार्गावरून जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना बसची प्रतिक्षा करावी लागत आहे. महामार्गावरच गाव, बसच थांबत नाही राव, अशी अवस्था येथील विद्यार्थी, नागरिक, नोकरदारांची झाली आहे.

> हुपरी, कुन्नूर, आप्पाचीवाडी, हदनाळ, कागल, कोगनोळी या मार्गावरील बसेस तेथून खचाखच भरून येतात. या बसेस यमगर्णी येथील बसस्थानकावर थांबत नाहीत. गर्दीमुळे या बसेस थेट महामार्गावरून जात आहेत. तासन्तास बसची प्रतिक्षा करावी लागत आहे.
>
> -प्राजक्ता पोवार,विद्यार्थिनी,यमगर्णी



यमगर्णीः सेवा रस्त्यावर बसच्या प्रतिक्षेत असलेली शाळकरी मुली.

### यमगर्णीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

बस थांबत नसल्याने बऱ्याच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पालकांतून नाराजी व्यक्त होत आहे. बस वेळेत मिळत नसल्याने अनेक पालकांना आपल्या पाल्यांना दुचाकीने संबंधित शाळा, महाविद्यालयात पोहचवावे लागत आहे. तर विद्यार्थ्यांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. पालकांसह विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. बस थांबत नसल्याची माहिती अनेकदा आगार प्रशासनाला दिली आहे. मात्र अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही. काही मोजक्याच बसेस सेवा रस्त्यावर येत असल्यामुळे सर्वांचीच गैरसोय झाली आहे. शाळा, महाविद्यालये सुरु होऊन दोन महिने पूर्ण होत आले आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी जादा विषयाची शिकवणी वर्ग लावले आहेत. बससेवा नसल्याने शिकवणी वर्गही बुडवावे लागत आहेत. आगार व्यवस्थापकांनी याकडे तातडीने लक्ष देऊन कागल, कोगनोळी, हुपरीसह या महामार्गावरून खेडेगावात जाणाऱ्या बसेस यमगर्णी सेवा रस्त्यावर थांबवून विद्यार्थ्यांची सोय करावी, अशी मागणी पालक, विद्यार्थ्यांतून होत आहे.

> **पर्यायी बस सेवा हवी**
>
> गेल्या दोन वर्षापासून खेडेगावातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. अपुऱ्या बस धावत असल्यामुळे यमगर्णी, सौंदलगासह विविध गावात जादा बसची सोय करावी.बस खचाखच भरल्याने त्यामध्ये प्रवासी घेतले जात नाहीत. स्थानिक गावासाठी वेगळ्या बस फेऱ्या सुरु केल्यास विद्यार्थी, प्रवाशांची सोय होईल.

निपाणी आगार व्यवस्थापक बी. एम. संगाप्पा म्हणाले, सर्वच चालक-वाहकांना सेवा रस्त्यावरील खेडेगावांचा थांबा घेण्याची सूचना केली आहे. एखादी बस थेट महामार्गावरून गेल्यास किंवा बस थांब्यावर न थांबल्यास बस क्रमांक आगाराला कळवावा. चालक-वाहकांना सूचना देऊन यापुढे सर्व बसेस यमगर्णीसह सेवा रस्त्यावरील बस थांब्यावर थांबविल्या जातील.

# निपाणी-मुदाळ तिट्टा मार्गावर स्पीड ब्रेकर,सीसीटीव्ही बसवावेत

## मंडलिक यांची मंत्री शिवेंद्रसिंहराजेंकडे पत्राद्वारे मागणी

मुरगूड,ता.२२(प्रतिनिधी)-



**निपाणी-मुदाळ तिट्टा मार्गावर वाहनांची नेहमीची मोठी वर्दळ असते. भरधाव धावणाऱ्या वाहनांमुळे या मार्गावर लहान मोठे अपघात ठरलेलेच असतात. आतापर्यंत अनेकांनी या मार्गावरील अपघातात जीव गमावला आहे. अशा संभाव्य अपघाताला नियंत्रित ठेवण्यासाठी मार्गावरील गावाच्या ठिकाणी गतिरोधक (स्पीड ब्रेकर) व सीसीटीव्ही बसवावेत, अशी मागणी माजी खास.संजयदादा मंडलिक यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

निपाणी-मुदाळ तिट्टा मार्गावर आदमापूर बाळूमामा मंदिर, बाळूमामा मंदिर, मेतके, हालसिद्धनाथ आप्पाचीवाडी अशी तीर्थक्षेत्र लागतात. गुरुवार, रविवार व आमावास्या दिवशी व इतरही दिवशी पर्यटनासाठी व दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक ,आंध्र व गोवा राज्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने येत असतात. शिवाय या भागातील वाहनांची संख्या देखील वाढली आहे.त्यामुळे या मार्गावर नेहमी वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून दिवसागणिक अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे जीव मुठीत घेवून या मार्गावरून प्रवास करावा लागतो.

अनेक प्रवाशांना जीव देखील गमवावे लागलेले आहेत.त्यामुळे या मार्गावर गरजेनुसार विशेषतः गावांच्या ठिकाणी आणि वळणावर गतिरोधक सीसीटीव्ही बसवण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. ही गरज माजी खास.संजय मंडलिक यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.त्यावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती समाजिक कार्यकर्ते सातापा कांबळे यांनी दिली आहे.

> **बस्तवडे फाटा अपघाताचा हॉटस्पॉट**
>
> मुरगूड निपाणी मार्गावरील बस्तवडे फाटा हा कागल मार्गाला जोडणारे प्रमुख ठिकाण आहे.या फाट्यावरून कागलकडे जाणारी आणि इकडे मुरगूड निपाणी मार्गावर अनेक वाहने सुसाट धावत असतात. त्यामुळे येथे यापूर्वी अनेक लहान मोठे अपघात घडले आहेत.अनेक मोठी वाहने लहान वाहनांना ठोकरून धूम ठोकतात यामुळे या बस्तवडे फाट्यावर स्पीड ब्रेकर बरोबरच सीसीटीव्हीची नितांत गरज असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते सातापा कांबळे यांनी व्यक्त केले आहे.

# शेतकऱ्यांच्या डोक्यावर खतांच्या दरवाढीचा बोजा

कोगनोळी,ता.२२(प्रतिनिधी)-

**रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. त्यामुळे महागाईच्या कचाट्यात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावर खतांच्या दरवाढीचा बोजा वाढला आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे.**



अनिश्चित पाऊस, वाढती मजुरी, रासायनिक खतांचा वाढता दर यामुळे शेतीचे अर्थकारण बिघडले आहे. त्यातच दरवर्षी रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ होत असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. मागील काही वर्षात अतिवृष्टी, बदलते हवामान यामुळे उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे तर दुसरीकडे खतांच्या किंमती वाढत असल्याने शेतकरी दुहेरी कचाट्यात सापडला आहे.

खत कंपन्यांनी रासायनिक खतांच्या किंमतीत भरमसाठ वाढ केल्याने शेतीतील उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ बसणे अवघड झाले आहे. मात्र रासायनिक खतांच्या किंमती वाढल्याने पीके कशी घ्यावीत आणि उत्पादन कसे काढावे, या विवंचनेत शेतकरी सापडले आहेत. शेतीची मशागत करुन पिकांची व उत्पादनाची वाढ व्हावी यासाठी शेतकरी दिवसरात्र शेतात राबत असतो. पेरणीच्यावेळी खतांची टंचाई निर्माण होईल, असे गृहीत धरुन बँक व सेवा सोसायटी यांच्याकडून कर्ज घेऊन ही रासायनिक खते खरेदी करतात.

यंदाही खतांच्या किंमती वाढल्याने कर्जातही वाढ करावी लागली.म्हणजेच व्याजाचा बोजादेखील शेतकऱ्यांवर जास्तीचा पडणार आहे. शेती व्यवसाय नकोच अशी धारणा शेतकऱ्यांची आहे. शेतकऱ्यांच्या भावना व कष्ट डोळ्यासमोर ठेवून शासनाने निर्णय घ्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ झाली आहे. दरवर्षी खतांच्या किंमती वाढत असल्या तरी शेती मालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेती करणे कठीण झाले आहे. ट्रॅक्टर भाडे, बी-बियाणे, रासायनिक खते, मजुरी यांचा उत्पादनाशी ताळमेळ बसणे कठीण झाले आहे.

# ई-केवायसी संदर्भात सोशल मिडीयावरील अफवांवर विश्वास ठेवू नये-सिंगे

अथणी,ता.२२(प्रतिनिधी)-

**राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी गृहलक्ष्मी योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांचे ई-केवायसी अद्ययावत करणे अनिवार्य आहे, अशा अफवा सोशल मीडियावर पसरत आहेत, परंतु या संदर्भात सरकारकडून कोणताही अधिकृत आदेश आलेला नाही.**

त्यामुळे, ज्या लाभार्थ्यांना यशस्वीरित्या पैसे मिळत आहेत.त्यांना कोणत्याही कारणास्तव सायबर केंद्रांना भेट देऊन नोंदणी करण्याची गरज नाही, असे स्पष्टीकरण अथणी तालुकास्तरीय हमी योजना अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ सिंगे यांनी दिले आहे. अथणी येथील हेस्कॉम कार्यालयाच्या हॉलमध्ये गॅरंटी समिती आणि हेस्कॉम कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना ते म्हणाले की, अथणी तालुक्यात गृहलक्ष्मी या योजनेचे ९६९२५ लाभार्थी आहेत आणि एप्रिल २०२६ पर्यंत डीबीटी द्वारे आधीच नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना पैसे यशस्वीरित्या वितरित करण्यात आले आहेत. परंतु अलीकडे, यूट्यूब आणि इतर सोशल मीडियावरील चुकीच्या माहितीच्या आधारे, अनेक लाभार्थी गृहलक्ष्मी योजनेअंतर्गत आपले ई-केवायसी अद्ययावत करावे या विश्वासाने खाजगी सायबर सेंटर्स, ग्राम वन आणि कर्नाटक वन सेंटर्सचा आधार घेत आहेत. तसेच, काही ग्राम वन आणि कर्नाटक वन सेंटर्स लाभार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे पैसे गोळा करत असल्याचे हमी योजना अंमलबजावणी समितीच्या निदर्शनास आले आहे. अशा सेंटर्सवर कारवाई करण्याची शिफारस वरिष्ठांना केली जाईल.

यावेळी हमी समितीचे सदस्य राहुल माचनूर, बसाप्पा गुम्मती, राजू पाटील, प्रशांत इजारी, गुलाब नलबंदू, सौ.नकुसा गडदे, शिवानंद सौदागर, नारायण कदम, सिद्धप्पा मंगसुली, हेस्कॉमचे अधिकारी शाबीर अहमद पटनाहळ्ळी, मंतेश आंबोली, महावीर तावडे, तावडे आदी उपस्थित होते.



ब्रम्हनाथ सोसायटीच्या नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच माजी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर.

# ब्रम्हनाथ सोसायटीच्या अध्यक्षपदी करव,उपाध्यक्षपदी कठारे यांची निवड

कागवाड,ता.२२(वार्ताहर)-

**येथील श्री ब्रम्हनाथ को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीच्या अध्यक्षपदी जितेंद्र विद्याधर करव तर उपाध्यक्षपदी मामासाब आप्पासाब कठारे यांची मंगळवारी ता.२१ रोजी बिनविरोध निवड करण्यात आली.**

संस्थेच्या सभागृहात झालेल्या निवड बैठकीत नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी एकमताने निवड करण्यात आली. यापूर्वी अध्यक्षपदाची धुरा सुनील मालगांवे यांनी तर उपाध्यक्षपदाची जबाबदारी प्रकाश मालगत्ते यांनी यशस्वीपणे सांभाळल्याबद्दल त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर नूतन अध्यक्ष जितेंद्र करव व उपाध्यक्ष मामासाब कठारे यांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे संचालक विजय करोले, रावसाहेब चौगुले, अशोक कुडचे, राजू मगदूम, आरती चौगुले, भारती किनंगे, राजू अडूरकर, शंकर गस्ते, बाळकृष्ण बंजत्री, सल्लागार समितीचे सदस्य राजेंद्र चिंचवाडे, आप्पासाब नंदरगे, कार्यदर्शी प्रवीण सुगण्णावर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# कोगनोळीत पाळकानिमित्त कडकडीत बंद

कोगनोळी,ता.२२(प्रतिनिधी)-

**सध्या कोगनोळी आणि परिसरात पावसाने ओढ दिली आहे. त्यामुळे मेघराजाच्या आराधनेसाठी कोगनोळी येथे मंगळवार ता.२१ जुलै रोजी गावातील नागरिकांनी आपापली दुकाने व सर्व व्यवहार बंद ठेवून पहिला पाळक कडकडीत पाळण्यात आला.आजपासून पुढील चार मंगळवार पाळक पाळण्यात येणार आहेत.**



ग्रामीण भागातील परंपरा आजही कोगनोळी गावाने अखंडित सुरु ठेवली आहे. पाळकानिमित्त ग्रामदैवत श्री अंबिका देवीसह सर्व देवदेवतांना जलाभिषेक करण्यात आला. यावेळी गावातील अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच व्यवहार बंद ठेवण्यात आले होते. पाळकामुळे अत्यंत भक्तीपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. सर्व स्तरातील लोक मोठ्या एकोप्याने यामध्ये सहभागी झाले होते. कोगनोळी गावाने पाळकाची परंपरा आजही अखंडपणे जपली आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यावर शुकशुकाट दिसून आला.

# करोशीत विद्यार्थ्यांकडून बस थांबवून आंदोलन

चिकोडी,ता.२२(प्रतिनिधी)-

**करोशी (ता.चिकोडी) येथे बस थांबवत नसल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी सुमारे १५ हून अधिक बसेस थांबवून आंदोलन केल्याची घटना घडली आहे.**

करोशी येथून रोज सुमारे शेकडो विद्यार्थी चिकोडीला शाळा व महाविद्यालयाला बस जातात. पण सकाळी या मार्गावरून जाणाऱ्या बंबलवाड बेनीहळी, हुक्केरी व बेळगाव बस अनेककदा थांबवत नसल्याने शाळा महाविद्यालयांना जाण्यासाठी उशिरा होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.त्यामुळे सकाळी साडेआठ वाजता व साडेनऊ वाजता यादरम्यान दोन एक्स्ट्रा बस सोडण्यात यावे तसेच या मार्गावरून वाहणाऱ्या सर्व बस या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या साठी थांबविण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. सुमारे दोन तास झालेल्या या आंदोलनामुळे सुमारे पंधराहून अधिक केएसआरटीसी बस उभ्या होत्या.घटनास्थळी चिकोडी केएसआरटीसीचे सहाय्यक निर्वाहक अधिकारी या ठिकाणी येऊन मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



करोशी : येथे बस थांबवून आंदोलन करताना विद्यार्थी.

यावेळी विजय कोठीवाले, ज्ञानेश्वर खाडे, सोमेश्वर हिरेमठ, महांतेश खोत, अरुण बिद्रे, सुधाकर चाजगौड, महादेव पाटील, महेश कोटगी, सुधाकर मस्ती, पुंडलिक बामणे, रघुनाथ बामणे, सुनील शेंडूरे, जगन्नाथ सुळकुडे, इरशाद मुल्ला, पिंटू हळीजोळे, बाबासाहेब बिद्रे,अनिल हळीजोळे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते

## निपाणीत ३० रोजी गुरुवंदना कार्यक्रमाचे आयोजन

निपाणी,ता.२२(प्रतिनिधी)-

**कर्नाटकातील सहकार क्षेत्रातील अग्रेसर श्री महात्मा बसवेश्वर क्रेडिट सौहार्द सहकारी निपाणी या संस्थेच्यावतीने गुरुवार ता.३०जुलै रोजी सायं.४.०० वाजता गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना हा कार्यक्रम म.बसवेश्वर सभागृहात आयोजीत करण्यात आला आहे.**

या कार्यक्रमास प.पू. श्री ईश्वर उर्फ महेशानंद महास्वामीजी भक्ती योगाश्रम मठ हंचीनाळ यांचे दिव्य सानिध्य लाभणार आहे. सहावी ते दहावी पर्यंतचे विद्यार्थी, विद्यार्थिनी व निपाणीच्या परिसरातील सभासदांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन संस्थेच्या संचालक मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# पार्श्वमती विद्यालयात आरोग्य जनजागृती,मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

निपाणी,ता.२२(प्रतिनिधी)-

**श्री.बाहुबली विद्यापीठ, बाहुबली संचलित श्रीपार्श्वमती विद्यालय, अकोळ येथे डॉ.मंगल शास्त्री शासकीय रुग्णालय चिकोडी यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आरोग्य जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.**

कार्यक्रमात रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य पथकाने विद्यार्थ्यांना आरोग्याची काळजी, वैयक्तिक स्वच्छता, संसर्गजन्य रोगांपासून बचाव,संतुलित आहार, नियमित व्यायाम, निरोगी जीवनशैली, किशोरवयीन आरोग्य तसेच ऋतूनुसार उद्भवणाऱ्या आजारांपासून बचावाचे उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.आरोग्यदायी सवयी अंगीकारणे, स्वच्छतेचे महत्त्व, हात धुण्याची योग्य पद्धत, पौष्टिक आहाराचे महत्त्व आणि संसर्गजन्य रोगांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याविषयी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत माहिती देण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध आरोग्यविषयक प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षकांनी विशेष सहकार्य केले.यावेळी मुख्याध्यापक डॉ.राकेश तावदारे, टी.ए.घोसरवाडे, व्ही.डी. इंदलकर, पी.बी. कळंत्रे, एस.डी.खोत उपस्थित होते.

## कोगनोळीत अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी साजरी

कोगनोळी,ता.२२(प्रतिनिधी)-

**येथील इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.प्रारंभी नितीन पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.**

यावेळी बोलताना मुख्याध्यापिका कोमल पाटील म्हणाल्या, आजच्या विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जीवन प्रवास हा एक प्रेरणादायी दीपस्तंभ असून कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारांच्या बळावर त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे सांगितले.याप्रसंगी रोशनी आवटे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. गायत्री पोतदार यांनी सूत्रसंचालन केले.वर्षा कुलकर्णी यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ आजऱ्यात आंदोलन

## विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांवर निर्णय घेण्याची मागणी

आजरा,ता.२२(प्रतिनिधी)-

**दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी संविधानिक मार्गाने आणि शांततेत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ आजरा शहरात संविधानप्रेमी, लोकशाहीवादी आणि विविध राजकीय व सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध आंदोलन केले.**

आजऱ्यातील शिवतीर्थ येथे मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी, युवक आणि विविध पक्षांचे पदाधिकारी एकत्र आले. यावेळी केंद्र सरकारच्या भूमिकेविरोधात घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसी कारवाईचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविला.



आजरा तहसिलदार यांना निवेदन देताना विद्यार्थी, युवक व विविध पक्षांचे पदाधिकारी.

'विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर लाठीमार नव्हे, न्याय द्या', 'लोकशाही वाचवा', 'संविधानाचा सन्मान करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी उपस्थित वक्त्यांनी सांगितले की, विद्यार्थी आपल्या भवितव्यासाठी आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्थेच्या मागणीसाठी शांततामय मार्गाने आंदोलन करत होते. अशा परिस्थितीत त्यांच्यावर लाठीचार्ज करणे ही लोकशाही मूल्यांवर गदा आणणारी आणि संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी घटना आहे. आंदोलनकर्त्यांनी पेपरफुटीच्या घटनांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर शिवतीर्थ येथून तहसील कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी सरकारच्या कथित दडपशाहीविरोधात संताप व्यक्त केला. तहसील कार्यालयात पोहोचल्यानंतर आजरा तहसीलदार यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान आणि संबंधित केंद्रीय यंत्रणांकडे पाठविण्यासाठी निवेदन देण्यात आले.

निवेदनात विद्यार्थ्यांवरील लाठीमाराची उच्चस्तरीय चौकशी करावी, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, पेपरफुटीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात संपत देसाई, युवराज पोवार, प्रभाकर कोरवी, प्रकाश मोरूस्कर, संजय घाटगे यासह तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, संविधानप्रेमी नागरिक, युवक, विद्यार्थी, महिला तसेच लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारे अनेक नागरिक सहभागी झाले होते. आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला.

# पाटील महाविद्यालयात ओरिएंटेशन कार्यक्रम संपन्न

चिकोडी,ता.२२(प्रतिनिधी)-

**येथील ओरिएंटेशन कार्यक्रमाचा उद्देश केवळ महाविद्यालयातील नियम व सुविधांची माहिती देणे नसून उच्च शिक्षणाचे महत्त्व, विद्यार्थी जीवनातील जबाबदाऱ्या आणि भविष्यातील ध्येयांविषयी विद्यार्थिनींमध्ये स्पष्ट जाणीव निर्माण करणे असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.सी.जकाती यांनी केले.ते सी.टी.ई. संस्थेच्या श्रीमती ए.ए.पाटील कला व वाणिज्य महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित ओरिएंटेशन कार्यक्रमात ते बोलत होते.**

प्रमुख पाहुणे प्रा.व्ही.टी.बिक्कण्णावर म्हणाले, विद्यार्थिनींना ध्येय निश्चित करून नियमितपणे वर्गांना उपस्थित राहण्याचे शिक्षकांचे मार्गदर्शन घेण्याचे व वेळेचा सदुपयोग करून परिश्रमपूर्वक अभ्यास करण्याचे आवाहन केले.यावेळी डॉ.एच.ए.भोगले उपस्थित होते. यावेळी अध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयातील विविध सुविधा, शैक्षणिक उपक्रम व नियमांची माहिती विद्यार्थिनींना दिली. श्रीमती एम.एम.मद्याळी यांनी स्वागत केले. कृष्णावेणी दफ्तरदार यांनी आभार मानले. ए. ए.पाटील व एस.पी.पुजारी यांनी सूत्रसंचालन केले.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**जुने व नवीन पॉवरलूम** देवू व घेवू तसेच फवारा, कांडीमशिन, डक्टींग घेवू व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

**प्लॉट विकणे-** इचलकरंजी, आयजीएम हॉस्पिटल जवळ, १७.५' बाय ४८' फूट, कलेक्टर एनए प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९१४६६५६९००

**घर विकणे** २ बीएचके सर्व सोईनीयुक्त घर, कृष्णानगर,खणीजवळ, इचलकरंजी. मो. ९८९०६१८७५४, ८५३०६४८७५४.

**शिरदवाड पेट्रोल** पंपच्या मागे ३४.२५ बाय ४० (चौरस फुट १३७०) चा बिगरशेती (उत्तरेस ३० फुट रस्ता असलेला) टीपी मंजूर ले आऊट मधील प्लॉट नं. १३ विकणे आहे. मो. ९४२३९८४६१३.

**कबनूर येथे** दिड गुंठा १६ मागाची रिकामी आरसीसी शेड ५८ बाय २६ एनए प्लॉट व १ बीएचके रहाणेस विकणे. मो. ८७८८०३३७९२.

**फेडरल बँक,** गिरनार अपार्टमेंट फ्लॅट विकणे आहे व तसेच हिरा पन्ना लस्सीसमोर (बेसमेंट गाळा) आरसीसी १२५० फुट विकणे आहे. मो. ९०३९६९३९६९.

**सर्व सोईनीयुक्त** प्रशस्त व सुसज्ज ३ बीएचके फ्लॅट विकणे आहे. श्रीकृष्ण रेसिडेन्सी, नवीन बाय शोरूम, सांगली रोड, महासत्ता चौक, इचलकरंजी. मो. ८८७९५०८५७२.

**गाळा विकणे** आहे. बेसमेंट ४०० स्क्वे.फूट, महालक्ष्मी नगर सी विंग, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८२३१८१४४८.

**प्लॉट विकणे** सर्व सोईनी असलेला एनए प्लॉट चौ.फूट १२००/- देणे आहे. पत्ता- डेक्कन मिल, उत्तर बाजू, दत्त मंदिर जवळ, शहापूर हद्द. मो. ९८८१९८२८१०, शहापूरकर.

**दुकान गाळा** विकणे आहे. ४३५ स्क्वे.फुट आरसीसी गाळा, महादेव प्लाझा, जुना चंदूर रोड, मथूर हायस्कूलजवळ, इचलकरंजी. मो. ९५७९३३६६६२.

**महेंद्र जीतो** गुडकंडीशन, २०१९ मॉडेल, व्हाईट ग्रे कलर, विकणे आहे. मो. ७८७५६९९९३९.

## * व्यवसाय विषयक *

**महिलांसाठी सुवर्ण संधी** घरबसल्या अश्वगंधा बिया पॅकींग करा फक्त एकदाच ६००/- रूपये भांडवलात दररोज १०००/- रूपये मिळवा. जांभळी. संपर्क : ९२७०५३१४५२

## * भविष्य विषयक *

**ज्यो. ठिगळे (गुरूजी)** कुंडली, भविष्य, विवाहास विलंब इ.साठी भेटा. पत्ता- राजराजेश्वरी नगर, नव्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. मो. ९९२३५०३४५२.

## * बोअर विषयक *

**राज बोअरवेल** आमचेकडे ४।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. मो. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७.

## * विवाह विषयक *

**वर पाहिजे** सुंदर गरीब वधु वय २८, शिक्षण १२ वी, ब्युटी पार्लर व शिवण काम करते. दरमहा १५०००/- अपेक्षा, निर्व्यसनी, समजदार मुलगा हवा (त्वरीत विवाह) ९५०३२६४५८९.

**मराठा वधुवर** व पालक मेळावा रविवार दि. २६ जुलै २०२६ सकाळी १० ते २. स्थळ-मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, तांबे माळ, इचलकरंजी. मो.९८५०००९०७१.

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## * नोकरी विषयक *

**हॉटेलमध्ये साऊथ इंडियन कुक,** पुरी चपातीसाठी आणि हेल्पर कामासाठी २ जेन्टस् किंवा लेडिज पाहिजेत. संपर्क : ८८८८०८९१२९

**ऑफीस बॉय पाहिजे -** टू व्हिलर आवश्यक वय १८ ते ४५, पगार १० हजार + पेट्रोल भत्ता १५००, जुना बसस्टँड चौक, इचलकरंजी. संपर्क : ९४२२०४३३१३

**इचलकरंजीमधील नामांकीत** टेक्स्टाईल फर्ममध्ये एक्झिक्युटिव्ह असिस्टंट पाहिजे आहे. विवाहीत महिला वय ३५ वर्षे किंवा पुढील, उत्तम संभाषण कौशल्य, बेसिक कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क : ७३८७३७५९७९

**बोलोरो पिकअपवर** ड्रायव्हार कम हमाल पाहिजे. संपर्क : ८८०५५३२२४४

**पैठण येथे** पेशंटबरोबर राहण्यासाठी मदतनीस पाहिजे. योग्य मोबदला देऊ. गरजूंनीच संपर्क साधावा. राजेश जगताप मोबा. ८६०००८५३४३

**अनुभवी व्हीएमसी ऑपरेटर** व सुपरवायझर पाहिजेत, आकर्षक पगार. गणेशनगर, ७ वी गल्ली, इचलकरंजी. मोबा. ९४२३०४१०२०, ९७६३४१४३३८

**स्टेशनरी दुकानात-** टु व्हीलर / फोर व्हीलर चालविणारा कामगार पाहिजे. संपर्क : ९७६२६६६६१०, इचलकरंजी.

**अकौंटींग कामासाठी जेंटस् पाहिजे.** संपर्क : मोबा. ७०६६८५७३४०, ९४२२०४८६९०, इचलकरंजी.

**हॉटेल नंदादीप-** परमीट रूम बिअर बारमध्ये अनुभवी वेटर पाहिजे. पार्टटाईम चालेल. आकर्षक पगार. संपर्क : ९९२१८१४८१४

**दुमजली बंगल्यामध्ये** साफसफाईसाठी लेडीज पाहिजे. गरजुंनी संपर्क साधावा. आकर्षक व योग्य पगार देवू. व्यंकटेश कॉलनी, डेक्कन जवळ, इचलकरंजी. ९९२२४३१२३१, ८७६६६९३९६४

**स्कूलसाठी** शाहू पुतळा परिसरातील मावशी हवी. (गरजूंना प्राधान्य) वेळ- ९ ते ३ मो. ८६२४९४२४२८, ९३७०८३६६७७

**पाहिजे.** ऑफिस कामासाठी शिकाऊ/अनुभवी लेडीज पाहिजे. संपर्क- सुप्रिया मेडिकल, जुना चंदूर रोड, इचलकरंजी. फोन- ७८२०९५६२३४. वेळ- सकाळी १० ते २, संध्या.- ५ ते ८

**वर्कशॉपमध्ये** कामासाठी हेल्पर पाहिजेत. संपर्क- शहापूर. फोन- ९६५७६८४०१४

**बिअर बारमध्ये** अर्जंट वेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क- ९८८१९५७०५५, ९५४५३९०९०८, इचलकरंजी.

**कामगार पाहिजे.** शिकाऊ/ अनुभवी सीएनसी/व्हीएमसी कामगार पाहिजेत. भेटा- इंदू सीएनसी शॉप, सुंदर बागेजवळ, थाळी हाऊस हॉटेलजवळ, मो. ९३७०१४३०३५

**पाहिजेत.** अनुभवी मॅनेजर कम क्लार्क-१ पद, पिग्मी एजंट-२ पद नेमणूक करणे आहे. मयुर नागरी पतसंस्था, धान्य ओळ, इचलकरंजी. मो. ९४२०००८१११, ९८३४५३७१२०

**सेल्समन पाहिजे.** रेडिमेड कापड दुकानासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजेत. आकर्षक पगार व कमिशन. हत्ती चौक, इचलकरंजी. संपर्क-९८५०८५८६०२

**त्वरीत सिक्युरिटी गार्ड** व सिक्युरिटी सुपरवायझर पाहिजेत. हातकणंगले व तारदाळ, आकर्षक पगार/इएसआय सुविधा. संपर्क- ८००७०६९१८०, ८०५५६१३०४०

**स्ट्रीट लाईट रिपेअरीसाठी-** अनुभवी व शिकाऊ वायरमन व हेल्पर पाहिजे. काम सकाळी ९ ते सायं. ६, पगार-९००० ते २०००० अनुभवानुसार ईएसआयसी+पीएफ लागू. संपर्क-९८५०८१६६९८

**प्रोसेसमध्ये** हॅन्ड चेकिंगसाठी अनुभवी चेकर पाहिजेत. संपर्क- ८६६८३४०७९४

**मार्केटिंग व सुपरव्हीजनसाठी**

**STAFF REQUIREMENT**

We are hearing faculty in 18 years old reputed English Medium School for Nursery to 4 th

Qualifcation for teaching staff:-
1. M.A., B.A.
2. D.Ed., B.Ed.

**For class 1st to 4th (English, Hindi, Marathi) (Maths, E.V.S/Science, Computer)**

Contact No.
**9766633501, 9146081102**

बांधकाम क्षेत्रामधील अनुभवी व्यक्ती पाहिजेत. कागल एमआयडीसी येथील आरसीएम प्लॉटकरीता. संपर्क-९५७९५५३२१६

**नामांकीत पिझ्झा आऊटलेटमध्ये** कामासाठी जेंटस/लेडीज पाहिजेत. कामाची वेळ- सकाळी ९ ते सायं. ६ व सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत. संपर्क-८५३०३९५९६०, इचलकरंजी.

**फोर व्हीलर हुशार व** अनुभवी व शिकाऊ मॅकॅनिकल पाहिजे. मो. ९८२२४३३४२६

**व्हीएमसी**/लेथ मशिन ऑपरेटर पाहिजेत. पार्टटाईम, फूलटाईम, अनुभवी/शिकाऊ अपेक्षेनुसार पगार. संपर्क-९७६५४०९३९७

**होलसेल कापड** दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजेत. सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८२३४२५७८५.

**सोशल मिडीया** हॅण्डल करण्यासाठी व्हॉटस्अप, इन्स्टाग्राम, फेसबूक लेडीज व्यक्ती आवश्यकता आहे. इचलकरंजी. मो. ९८२३४२५७८५.

**स्वयंपाकासाठी घरगुती** खानावळीमध्ये अनुभवी लेडीज पाहिजे. मो. ७४९९४५४०४०, पत्ता- पार्वती मेन गेट, यड्राव.

**Requird For** Reputed textile process Grey Dept-2 Vacancy (2-23 Yearx Exp) M/F, Textile Process Lab-2 (1-3 Years Exp) M/F, House Keeping-2 M/F, Share Your resume on. no. 7768008601.

**नोकरीची सुवर्णसंधी.** सेल्स आणि डेटा कलेक्शन एक्झिक्युटिव्ह. लेडीज/जेन्टस्, मासिक फिक्स पगार अथवा कमिशन. दुचाकी, लायसन्स व अँड्राईड मोबाईल आवश्यक. मो. ८८३०३९५८९३, ९१५६१७१२०४.

**अर्जंट सिक्युरिटी** गार्ड भरती. इचलकरंजी, खोतवाडी, चिप्री, उदगांव, नांदणी, यड्राव, हातकणंगले, निमशिरगांव,कोंडिग्रे, आकर्षक पगार. मो. ९०४१५९३४३५, ७०२०१९७९८०.

**त्वरीत पाहिजेत.** पुरूष नर्सिंग स्टाफ, फक्त नाईट ड्युटीसाठी. संपर्क-इचलकरंजी. मो. ८८८८२३२२१४.

**आण्णाज फॅशन** शॉपमध्ये बिलिंगसाठी पाहिजेत. (जेन्टस्/ लेडीज) बेसीक कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. (पगार ८ ते १० हजार) मो. ९५६१७१४२६२.

**लेथ मशिनवर** डेव्हलपमेंट कामासाठी टर्नर पाहिजे. मो. ९६६५९९९८८७, ८७६६७७९११०., कोरोची.

**फर्निशिंग दुकानात** कामासाठी शिकावू हुशार मुलगा पाहिजे. भारत फर्निशिंग, इचलकरंजी. मो. ७६२०८१२४७२.

**पाहिजेत रोटरी** वेल्फेअर ट्रस्ट संचलित रोटरी मॅनमेड स्पिनर्स पॅथॉलॉजी सेंटर येथे जेन्टस् अटेंडंट पाहिजे. पात्रता- डीएमएलटी/ पीजीडीएमएलटी. अर्जासह समक्ष भेटा. पत्ता- रोटरी श्रीमती सोनीदेवी रामविलास बाहेती सेवा केंद्र, दाते मळा, इचलकरंजी.

**नामवंत कंपनीमध्ये** सेल्ससाठी महिला व हेल्परसाठी मुले पाहिजेत. स्टेशन रोड, ओल्ड मुंबई आईस्क्रिमजवळ, इचलकरंजी. मो. ९२७०३३७९५५.

**इचलकरंजी येथील** नामांकित गारमेंट उद्योगासाठी अनुभवी अकौंटट आवश्यक. पद- अकौंटट (२ जागा), शैक्षणिक पात्रता- बी. कॉम./एम.कॉम. अकौंट क्षेत्रातील अनुभव आवश्यक.-पात्रता व अनुभवानुसार आकर्षक वेतन. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्वरीत खालील क्रमांकावर संपर्क साधावा. मो. ९९२१३८९५६७, ७०५७०५३५०५.

**फॅब्रिकेशन व हॉस्पिटल** फर्निचर तयार करणेसाठी हेल्पर, सीओ टू ऑरगन वेल्डर पाहिजेत. मो. ९०२१२०२७३१.

**गारमेंट कामासाठी** महिलांना प्राधान्य. विक्रमनगर, वंदे मातरम् ग्राऊंड जवळ, विक्रमनगर, दत्तनगर, कृष्णानगर, करांडे मळा, शहापूर, विकासनगर. मो. ९९२३०७२१०३, ९९६००४६०६०.

**पाहिजे कापड** पेढीवर कायमस्वरूपी अनुभवी अकौंटट जेन्टस् पाहिजे. कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक. गोडाऊन कामासाठी हेल्पर पाहिजे. मो. ९५६१६१९८३२, इचलकरंजी.

**पार्वती इंडस्ट्रीज,** खंजिरे इंडस्ट्रीज, तारदाळ, कोरोची करीता ८ तास, १२ तास सिक्युरिटी गार्ड भरती सुरू आहे. मो. ९८५०९४५२२६, ९५११७५९६७६.

**हातकणंगले,इचलकरंजी** घरोघरी जाऊन जाहीरात आणि मार्केटिंग करण्यासाठी लेडीज पाहिजे. टाईम ५ तास, पेमेंट ४००+२०० इन्सेटीव्ह. मो. ९५०३११५८७८.

**हॉटेल/फूड कार्टसाठी** अनुभवी व शिकाऊ मुले पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क- ९८६०२६३०९८

**मेडिकल स्टोअरमध्ये** अनुभवी फार्मासिस्ट व नॉनफार्मासिस्ट पाहिजे. मा. ९५७९७८९६९६.

**त्वरीत सिक्युरिटी** गार्ड नेमणे. शहापूर, कोरोची, खंजिरे इंडस्ट्रीयल इस्टेट व इचलकरंजी शहरासाठी. संपर्क- एन.एस.आय सिक्युरिटी. मो. ९८२२२२९९२७, ९८२२३५३८४०.

**८ वी ते १० वी** गणित, विज्ञान, मराठी, इतिहास विषयासाठी पार्टटाईम, फुलटाईम, शिक्षक/ शिक्षिका पाहिजे. ९८८१५२५६४४

**टूडे कुंदा** चहा दुकानामध्ये शिकाऊ (कॉलेज विद्यार्थी) व गरजू कामगार पाहिजे. मो. ९१३०३१३२७९.

**शुध्द शाकाहारी** हॉटेलमध्ये अनुभवी वेटर पाहिजेत.राहणेची, जेवणाची सोय. मो. ८९७५६९८४७४. इचलकरंजी.

**केतन वाईन्स** हुपरी येथे खालील पदासाठी भरती सुरू आहे. कौंटर बॉईज- ३ पदे, गोडाऊन बॉईज ३ पदे. संपर्क- ९८२२२४३२५६. संपर्क साधण्याची वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ७.००

**कामगार पाहिजे** हार व बुकेच्या दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- राहूल माने ८८८८२३१७३५, इचलकरंजी.

**सीएनसी ऑपरेटर** पाहिजेत अनुभवी /शिकाऊ, मणेरे हायस्कूलजळ, इचलकरंजी. मो. ९५२७४९१७००, ९७६६२९३३६२.

**लहान मुलगी** सांभाळण्यासाठी २४ तास महिला पाहिजे. मो. ९३२५९८१२३८.

**जेन्टस् कामगार** पाहिजेत. मो. ९६३१३१६०३०.

**रंगाच्या दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- नवभारत पेंन्टस्, बंगला रोड, इचलकरंजी. मो. ९८२३१८१४४८.

**श्री जिनेंद्र ज्वेलर्स-** भरती/ सुवर्णसंधी. सेल्सपर्सन-५ जागा, महिला/पुरूष कॉम्प्युटर ऑपरेटर- २ जागा. पात्रता- १२ वी पास किंवा बी. कॉम. कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आणि संवाद कौशल्य समक्ष भेटा. श्री जिनेंद्र ज्वेलर्स, रूणवाल टॉवर, इचलकरंजी. ९४२१२०३९५१, ९३२२९११५४६.

**स्वप्नशिल्प कन्सलटंट** इचलकरंजी येथे तात्काळ अनुभवी अकौंटट हवा. किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. मो. ९८२२१८७१९९.

**पतसंस्थेमध्ये ऑफिस** व कोर्ट कामासाठी मुले पाहिजेत. पत्ता- धान्य ओळ, फेडरल बँकेसमोर, इचलकरंजी. मो. ०२३०- २४२९५९५, ७०५८५३१७३१.

**यार्न ऑफिसमध्ये** अकौंटट पाहिजे. अनुभव ४ ते ५ वर्ष. पत्ता- बिरला बिल्डींग, इचलकरंजी. भेटणेची वेळ ५ ते ७, मो. (०२३०) २४३१४५२.

**शिटमेटल व फॅब्रिकेशन** कामासाठी अनुभवी/शिकाऊ वेल्डर, हेल्पर व शिटमेटल वर्कर पाहिजे. कोरोची. मो. ९१३०६५५३५२.

**वसुली क्लार्क** नेमणे आहे. पात्रता- कोर्ट कामाची माहिती, दावेची माहिती, संगणक ज्ञान आवश्यक. कामाच्या अनुभवासहीत पगाराच्या अपेक्षासह अर्ज दि. २७/०७/ २०२६ पर्यंत ऑफिस वेळेस करावेत. संपर्क- श्री चौंडेश्वरी महिला नागरी सह. पतसंस्था मर्यादित, इचलकरंजी. फोन- ०२३०- २४३४४९३, ९५२७७६४४८६.

**नामांकित कंपनीमध्ये** अनुभवी अकौंटट/प्लांट हेड पाहिजे. आकर्षक वेतन. संपर्क ९८५०६३५०९१, शाहूनगर, चंदूर.

**श्री मंगलमूर्ती** प्रोसेसमध्ये ग्रे तागे आवक-जावकसाठी तसेच ऑफिस स्टाफ जेन्टस्/लेडीज आणि बिगारी कामगार पाहिजे. शहापूर-तारदाळ नाका ७०३०८०२४१०.

## * भाड्याने देणे/घेणे *

**ग्राऊंड फ्लोअर** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. फक्त शाकाहारींसाठी भाडे १२ हजार (एजंट क्षमस्व) जमदाडे मळा, नोबल हॉस्पिटल समोर, इचलकरंजी. संपर्क- ८८३०७४१०४३

**१ बीएचके** दुसरा मजला, सेमिफर्निश्ड सर्वसोयीनियुक्त, शाकाहारी कुटुंबासाठी भाड्याने देणे. मथुरानगर, सांगली नाक परिसर, इचलकरंजी. मो. ८२०८७९३९६२

**गाळे रोडटच भाड्याने देणे.** १२ बाय १६, १० बाय २५ पोटमाळा संडास बाथरूम. चौकशी- चैतन्य दवाखाना, थोरात चौकपुढे. ८/ ३२३, शहापूर रस्ता, विक्रमनगर, इचलकरंजी. ९४२००१०१५०, ९१७५१०८६२९

**१३०० स्के. फूटाचा** हॉल भाड्याने देणे. आरसीसी सर्व सोयीनियुक्त कामाक्षी प्लाझा, मन लॉजशेजारी, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. फोन- ९४२०१३२५७७, ९९२१२१४३२६

**सर्व सोयींनी समृध्द,** स्वतंत्र बंगल्यामधील १ ला मजल्यावरील १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. पत्ता- कोरोची, फोन- ९९७५५७५६६५, ९८६०६१५३१३

**गर्ल्स हॉस्टेल करिता** भाड्याने देणे आहे. फक्त मुलींसाठी कॉट बेसिसवर रूम मिळेल. पत्ता- कॉग्रेस कमिटीमागे, इचलकरंजी. संपर्क-९८९०९२३२३६

**सर्व सोयीनियुक्त** प्रशस्त बंगला भाड्याने देणे. ३ मास्टर बेडरूम, २ कारसाठी पार्किंग २४ तास पाणी, स्टार नगर, यड्राव फाटा, शहापूर. ९२८४९८७५७६, ८०५५१६१४९५

**मुलांसाठी कॉट बेसिसवर** प्रशस्त, हवेशीर व सर्व सोयिनीयुक्त रूम्स मिळतील. महासत्ता चौक, हनुमान मंदीर मागे, इचलकरंजी. संपर्क फोन-७०२१९९४९५०, ७०२१७९२४९२ (श्री. हिमांशु मिरगे)

**सर्वसोयीनियुक्त ३ बीएचके** भाड्याने देणे. पत्ता- हुलगेश्वरी रोड, शेळके सायकल दुकानाजवळ, इचलकरंजी. संपर्क : ९१४२३११७११

**सर्व सोईनीयुक्त** १ बीएचके भाड्याने देणे. यशवंत कॉलनी, इचलकरंजी. मो. ९५५२०२०१५५.

**भाड्याने देणे** आहे. २ बीएचके सर्व सोईनीयुक्त, हत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९४२२०७६४६६.

**सर्व सोईनीयुक्त** आरसीसी १ रूम किचन भाड्याने देणे आहे. मो. ९६९९०२६१८१, ९४२१८१६४४५.

**स्टेशन रोड, कॅबसन** हॉटेल शेजारी, १५ बाय १५ रेडी गाळा, खाद्य विक्री व कॉस्मेटिकसाठी उपयुक्त, भाड्याने देणे आहे. मे. ९०३९६९३९६९.

**मेन रोड,हिंदुस्थान** हार्डवेअर समोर ३०० फुट गाळा फर्निचरयुक्त खाद्य विक्री, कापड विक्री व कॉस्मेटिकसाठी उपयुक्त. भाड्याने देणे आहे. मो. ९०३९६९३९६९.

**गोडाऊन भाड्याने** देणे १५७० स्क्वे.फूट पोटमाळासहीत सर्व सोईनीयुक्त तीन बत्ती चौक, इचलकरंजी. मो. ८६६८५१०९९१.

**कमला नेहरू** सोसायटी येथील १ बीएचके सर्व सोईनीयुक्त भाड्याने देणे. (नोकरदारांना प्राधान्य). मो. ८२३७०८९६८४

**४० बाय ४५** शेड भाड्याने देणे आहे. गोडाऊनसाठी पत्ता- गुरू कन्ननगर, भोजे मळा, इचलकरंजी. मो. ८८०६६४२४२०.

**चालू स्थितीतील** फुड कॅफे चालविणेस देणे आहे. पत्ता- जनता बँक, तारा हॉटेलसमोर, इचलकरंजी. मो. ८७८८४१६४७९.

**भाड्याने देणे** आहे. ७०० स्क्वे.फूट व ५२० स्क्वे.फूटाचा गाळा, १ बीएचके, १ आर के, गांधी कॅम्प, इचलकरंजी. मो. ९८२२०२६७८५, ९५९५७९६३३३.

**दुकानगाळा भाड्याने** देणेचा आहे. बेसमेंटमधील १० बाय १६ चा गाळा, अगदी रोडटच. डॉ. साखरपे रोड, डॉ. पठाणजवळ, थोरात मोबाईल शेजारी, भाड्याने देणेचा आहे. मो. ९९२१२९९३२३.

**दुकानगाळा भाड्याने** देणे. ५०० स्क्वे.फूट आरसीसी, डॉ. साखरपे दवाखान्याजवळ, १२/३९७, इचलकरंजी. मो. ९४२०३५२४१९.

## * इतर *

**शेअर सर्टिफिकेटची** कामे करून मिळतील. मो. ९७३०३६०८२०.

## * आरोग्य विषयक *

**मानसिक आजार** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा इ. मानसिक आजारासाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुर्नवसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) मो. ९९२२६४६५६६.

# आंबेडकरवादी संविधान कृती समितीचे लाक्षणिक उपोषण

हातकणंगले ता. २२ (प्रतिनिधी)-

**दिल्ली येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी हातकणंगले येथे आंबेडकरवादी संविधान कृती समितीतर्फे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.**

लोकशाही व्यवस्थेत शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. आंदोलन करणाऱ्यांशी संघर्षाचा मार्ग न स्विकारता संवादातून प्रश्न सोडवणे ही सरकारची जबाबदारी आहे. केंद्र सरकारने संबंधित प्रश्नावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधावा आणि लोकशाही मुल्यांचा आदर राखावा अशी मागणी आंबेडकरवादी संविधान कृती समितीच्यावतीने करण्यात आली. या संपूर्ण प्रकरणात नैतिक जबाबदारी स्विकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.यावेळी प्रविण जनगोंडा, शिरीष थोरात, अँड. सुरेश पाटील,सुरेश आळतेकर, मार्तंड वाघमारे, मनोज कांबळे, सुहास कांबळे, डॉ.विशाल साजणीकर, राम कांबळे, जावेद मुजावर, सद्दाम मुजावर, संताजी खाबडे यांच्यासह आंबेडकरवादी संविधान कृती समितीचे सदस्य उपस्थित होते.



सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेत अजितदादा पवार यांना अभिवादन करताना चेअरमन, व्हा. चेअरमन, सर्व संचालक व अधिकारी.

# जिल्हा बँकेत अजितदादा पवार यांना अभिवादन

सांगली, ता.२२(प्रतिनिधी)-

**माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत साजरी करण्यात आली. बँकेचे चेअरमन माजी आम.मानसिंगराव नाईक यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.**

कार्यक्रमास व्हा. चेअरमन जयश्री पाटील, संचालक तानाजी पाटील, राहुल महाडिक, मन्सुर खतीब, बी.एस. पाटील, प्रकाश जमदाडे, वैभव शिंदे, बाळासाहेब होनमोरे, मुख्यकार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ यांच्यासह बँकेचे संचालक, सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कराड तालुक्यात संततधार; कृष्णा-कोयनेच्या पाणीपातळीत वाढ

कराड,ता.२२(प्रतिनिधी)-

**कराड तालुक्यात पावसाने बुधवारी पुन्हा जोरदार पुनरागमन केले. गेल्या तीन दिवसांपासून अधूनमधून येणाऱ्या पावसाच्या सरींनी शेतकऱ्यांना काहीसा दिलासा दिला होता. मात्र, बुधवारी दिवसभर पावसाची संततधार कायम होती. सकाळपासून सुरू झालेल्या पावसाने तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून, शहर व ग्रामीण भागातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले. दरम्यान, सततच्या पावसामुळे कृष्णा व कोयना नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होऊ लागली असून, लहान-मोठ्या तलावांमध्येही पाणीसाठा वाढत आहे.**

गेल्या दहा दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने खरीप हंगामातील भुईमूग, सोयाबीन आणि भात पिकांबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. सोमवारी दुपारनंतर व मंगळवारी झालेल्या हलक्या सरींनंतर बुधवारी पावसाने जोर धरला. दिवसभर अधूनमधून अल्पकाळाची विश्रांती वगळता पावसाची संततधार सुरू राहिल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. कराड-मलकापूर शहर परिसरातील अनेक सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचले. महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागली. महामार्ग आणि सेवा रस्त्यांवर अनेक ठिकाणी साचणाऱ्या पाण्यातून वाहनधारकांना वाट काढावी लागली. पाचवड फाटा ते नांदलापूरदरम्यान पुणे-बंगळूर महामार्गाच्या पश्चिम बाजूला पुन्हा मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

शहरातील भाजी मंडईतही पावसाचा परिणाम जाणवला. शेतकरी व व्यापाऱ्यांची गैरसोय झाली, तर बाजारपेठेतील ग्राहकांची वर्दळ कमी झाली. शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत पाऊस सुरू असल्याने विद्यार्थी व पालकांची तारांबळ उडाली. शाळांच्या परिसरात काही काळ वाहतूक कोंडीही झाली. सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील टोकणी, खतांची मात्रा देणे आणि इतर मशागतीची कामे काही प्रमाणात विस्कळीत झाली आहेत. दरम्यान, सततच्या ढगाळ वातावरणामुळे दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. तापमानात घट होऊन वातावरणात गारवा निर्माण झाला. पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.



**मलकापूर, नांदलापूर, गोळेश्वर, कापील, पाचवडेश्वर, गोंदी, रेठरे, कार्वे, कोडोली, तसेच कराड दक्षिणच्या पश्चिम भागात भात रोपांच्या लागवडीला वेग आला आहे. संततधार पावसातही शेतकरी व मजूर भाताची रोपे काढून मुख्य शेतात लागवड करताना दिसत आहेत.**

**महामार्गाचे काम सुरू असल्याने कराड-मलकापूर-नांदापूर या पर्यायी मार्गावर सध्या वाहनांची मोठी वर्दळ आहे. भाजीपाला मार्केटच्या गेटसमोर गॅस पाइपलाइनसाठी रस्त्याची खुदाई करण्यात आली आहे. त्यातच दिवसभराच्या पावसामुळे चिखल व राडारोडा पसरल्याने रस्ता धोकादायक बनला आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांसह इतर वाहनधारकांना या मार्गावरून जाताना कसरत करावी लागत आहे.**

# मलकापूरात जनआरोग्य शिबिरात ९५ रुग्णांची मोफत तपासणी

मलकापूर ता.२२ (प्रतिनिधी)-

**कोल्हापूरातील जानकी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने मलकापूर ग्रामीण रुग्णालय येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष मोफत जनआरोग्य शिबिरात ९५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.**

शिबिरात सर्दी, खोकला, ताप, पोटदुखी, मूळव्याध, स्त्रीरोग, अस्थिरोग (ऑर्थो) तसेच इतर विविध आजारांवरील रुग्णांची तपासणी करण्यात आली. रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी, उपचार, सल्ला, मार्गदर्शन तसेच आवश्यक औषधांचेही विनामूल्य वाटप करण्यात आले. डॉ. गीता पिल्लाई तसेच मलकापूर ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. अभिषेक चावरे यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

# लाठीचार्जच्या निषेधार्थ आज भिलवडी बंद

भिलवडी,ता.२२( प्रतिनिधी )-

**नीट पेपर फुटी प्रकरणी विद्यार्थांनी सुरु केलेले दिल्ली येथील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ गुरुवारी २३ रोजी भिलवडी बंदचे आवाहन करण्यात आले आहे.**

व्यापारी बंधू-भगिनींनी आपली सर्व व्यावसायिक आस्थापने सकाळी १० वाजेपर्यंत स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राहुल गांधींचे आंदोलन बेजबाबदार पणाचे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सातारा, ता.२२(प्रतिनिधी) -

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घराबाहेर विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केलेले आंदोलन बेजबाबदारपणाचे असल्याचा घणाघात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.**

दरे गावी खाजगी दौऱ्यावर आले असता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पत्रकार परिषदेत म्हणाले, दिल्लीतील जंतर मंतरवर सुरू झालेले आंदोलन हे नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे सुरू झाले. यामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. त्याबद्दल आम्हालाही सहानुभूती आहे. विद्यार्थी आपल्या देशाचे भविष्य आहेत. मात्र जे काल विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जंतर मंतरवर आंदोलनस्थळी न जाता पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर स्वतःचे आंदोलन सुरू केले.

विरोधी पक्षनेते असूनही ते अत्यंत बेजबाबदारपणे येथे आले. हे खूप निष्काळजीपणाचे आहे. या ठिकाणी अपघात घडवायचा होता का, राहुल गांधी यांची भूमिका काय होती?

आम्हाला सीजेपीच्या विद्यार्थी आंदोलनाबद्दल सहानुभूती आहे. परंतु विरोधक या आंदोलनाचा आधार घेऊन राजकीय फायदा उचलण्याचा प्रयत्न करत आहेत, ते विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून गोळी झाडण्याचा प्रयत्न करत आहेत. जे बांगलादेशात घडले, नेपाळमध्ये घडले, श्रीलंकेत घडले. त्याच प्रमाणे आपल्या देशात अराजकता पसरवण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. आंदोलक विद्यार्थ्यांना भडकवून त्यांचे आंदोलन हातात घेऊन स्वतःचा फायदा उचलण्याचा प्रयत्न करत आहेत.

# अजितदादांचे नसणे हा आयुष्यभराचा पोरकेपणा

## मंत्री हसन मुश्रीफ : राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात जनसेवा सप्ताहाचा प्रारंभ



कोल्हापूर, ता.२२ (प्रतिनिधी)–

**महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आम्हा सर्वांसाठीच एक नेते आणि कुटुंबप्रमुख होते. त्यांचे नसणे हा आयुष्यभराचा पोरकेपणा आहे, असे भावनिक उद्गार वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी काढले. त्यांच्या जाण्याने आम्हा सर्व कार्यकर्त्यांचे आणि एकूणच महाराष्ट्राचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे, असेही ते म्हणाले.**

दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जनसेवा सप्ताहाचा प्रारंभ मंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाला. यावेळी जिल्ह्यातील प्रमुख नेतेमंडळी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मंत्री मुश्रीफ पुढे म्हणाले, अजितदादा म्हणजे एक हाडाचा कार्यकर्ता, सच्चा मित्र, स्वच्छतेची आवड असणारे, वृक्षावर प्रेम असणारे, प्रशासनावर पकड असणारे नेतृत्व होते. आजची ही जयंती आपल्याला साजरी करावी लागेल असे कुणाच्या स्वप्नातही वाटले नव्हते. जेष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांचे "महाराष्ट्राच्या जडणघडणीत अजितदादांचे योगदान" या विषयावर व्याख्यान झाले. अजितदादा हे कार्यकर्त्यांना बळ देणारे नेते होते, असेही ते म्हणाले.

यावेळी जि. प.अध्यक्षा शिल्पाताई खोत, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील – आसुर्लेकर, कार्याध्यक्ष अनिलराव साळोखे, राहुल पी. एन. पाटील, केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने, सुधीर देसाई, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आदिल फरास, किसन चौगुले, बाळासाहेब खाडे, जि. प. सदस्या पूनम पाटील,जि. प. सदस्य संग्रामसिंह कुपेकर, डॉ. जयंत पाटील, क्रांतिसिंह पवार-पाटील, अमरसिंह माने – पाटील, इचलकरंजी शहर व जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुहास जांभळे, धैर्यशील पाटील कौलवकर उपस्थित होते.

## भाजयुमोकडून निषेध

कोल्हापूर,ता. २२ (प्रतिनिधी)–

भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर करण्यात आलेल्या आंदोलनाचा निषेध केला आहे.

महाडिक म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांशी संबंधित असलेल्या नीट परीक्षेच्या विषयाला राजकीय स्वरूप देऊन आंदोलनाची दिशा बदलण्याचा प्रयत्न होत असून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपेक्षा सरकारविरोधी घोषणाबाजी आणि राजकीय वातावरण निर्माण करण्यावर अधिक भर दिला जात आहे. भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थ्यांच्या न्याय्य प्रश्नांबाबत संवेदनशील असून, त्यांचे प्रश्न शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहील.

# मलकापुरात भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण

## सात दिवस मोहीम सुरू राहणार

मलकापूर, ता. २२ (प्रतिनिधी)–

**मलकापूर नगर परिषद व आसरा ॲनिमल वेल्फेअर ऑर्गनायझेशन (बेंगलोर) यांच्या संयुक्त विद्यमाने भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण व अँटी रेबीज लसीकरण मोहिमेचा शुभारंभ झाला. न्यायालयाच्या २०२३ मधील निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात येत असून ती सात दिवस सुरू राहणार आहे.**



**भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण व रेबीज लसीकरण मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी नगराध्यक्षा कोठावळे, डॉ.तन्वी महाजन,डॉ. व्ही. एन. सरवदे आदी.**

मोहिमेअंतर्गत शहरातील भटके श्वान पकडून तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या उपस्थितीत त्यांचे निर्बीजीकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण केले जाणार आहे. शस्त्रक्रियेनंतर श्वानांची तीन दिवस विशेष काळजी घेऊन त्यांच्यावर उपचार केले जातील आणि त्यानंतर त्यांना पुन्हा त्यांच्या मूळ परिसरात सोडण्यात येणार आहे.मलकापूर नगर परिषदेच्या कचरा डेपो परिसरात या मोहिमेसाठी विशेष उपचार केंद्र उभारण्यात आले आहे. नगराध्यक्षा रश्मी कोठावळे म्हणाल्या, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रेबीज लसीकरणाबरोबरच श्वानांची वाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी दरवर्षी अशी मोहीम राबविण्यात येईल.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.तन्वी महाजन यांनी सांगितले की, निर्बीजीकरणामुळे भटक्या श्वानांची संख्या नियंत्रित राहण्यास मदत होईल.

तसेच रेबीज लसीकरणामुळे भविष्यात श्वान चावल्यास रेबीजचा धोका कमी करण्यासाठी ही महत्त्वाची प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे.तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. एन. सरवदे यांनी न्यायालयाच्या प्राणी संरक्षणसंदर्भातील निर्देशांची माहिती देत, श्वानांवर करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया व त्यामागील उद्देश समजावून सांगितला.

यावेळी नगरसेवक रमेश चांदणे, विरोधी पक्षनेते संजय मोरे, नगरसेवक महेंद्र कोठावळे, रविराज कोकरे-देसाई, अभिजीत गुरव, ओंकार भोपळे, पल्लवी पवार, नेहा बेर्डे, तसेच अधिकारी रोहित पाटील, महेश गावखंडकर, प्रकाश कांबळे, अनिल पडळकर, अमित चौगुले, अर्पण, अक्षय, अभय कुसुम, मोरेश्वर, विकास तसेच गणेश लागरे, रविंद्र पंडित, ओंकार भोसले, साहील कांबळे उपस्थित होते.आभार महेश गावखंडकर यांनी मानले.

# जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजू शेट्टी, महादेव जानकर यांचा पाठींबा

नवी दिल्ली,ता.२२–

**शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या अनियमिततेविरोधात नवी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे युवक आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. या आंदोलनाच्या ठिकाणी राजू शेट्टी व रासपचे नेते महादेव जानकर यांनी अभिजीत दिपके यांची भेट घेऊन लढ्याला पाठिंबा दिला.**



यावेळी राजू शेट्टी म्हणाले, केंद्र सरकारने आपला घमंड आणि अहंकार बाजूला ठेवावा. देशाच्या भवितव्याशी, म्हणजेच या निरपराध विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळण्याचा अधिकार सरकारला नाही. सरकारच्या इशाऱ्यावर ज्यापद्धतीने पोलिसांनी अमानुषपणे विद्यार्थ्यांना व नागरिकांना मारहाण केली आहे हे हृदय पिळवटून टाकणारे आहे. या परीक्षा घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. देशातील बळीराजा आणि संपूर्ण जनता या विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी, विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी २८ जूनपासून जंतर-मंतर येथे आमरण उपोषण सुरू केले होते. सततच्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना दिल्लीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, प्रकृती चिंताजनक असतानाही वांगचुक यांनी रुग्णालयातूनच आपले उपोषण पुढे सुरू ठेवले असून, विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत मागे न हटण्याचा निर्धार केला आहे. जनसामान्यांचा आंदोलनाला वाढता पाठिंबा जंतर-मंतर येथील आंदोलनस्थळी देशभरातून हजारो विद्यार्थी एकत्र आले आहेत. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारा विरोधात पेटून उठलेल्या या युवकांना दिल्लीतील नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांकडून उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

## माजी सरपंच बाबासाहेब मुजावर यांचे निधन

हातकणंगले ता.२२ (प्रतिनिधी)



आळते (ता. हातकणंगले) गावचे माजी सरपंच व दिवंगत दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे विश्वासू सहकारी बाबासाहेब मुजावर यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या अंत्ययात्रेत विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना, नातवंडे, भाऊ असा परिवार आहे.

❋ मलकापूर, ता. २२ –रयत शिक्षण संस्थेच्या इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स, मलकापूर येथील स्थानिक स्कूल कमिटीवर राजेंद्र गोविंद देशमाने यांची तीन वर्ष कालावधीसाठी सदस्य म्हणून निवड झाली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभाग, (सांगली)ने नियुक्तिपत्र दिले आहे.

# सांगावचे आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय देशात अव्वल ठरेल

## मंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर,ता. २२ (प्रतिनिधी)–

**सांगाव येथील आयुर्वेदिक महाविद्यालय व त्याच्याशी संलग्नित रुग्णालय हे उपचारा संदर्भात संपूर्ण देशात अव्वल ठरेल, असा विश्वास वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला. मौजे सांगाव येथे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय संलग्नित रुग्णालयाचे लोकार्पण झाले.**



मुश्रीफ पुढे म्हणाले, सीपीआरचे नूतनीकरण त्याचबरोबर शेंडा पार्क येथे सुरू असलेल्या विविध रुग्णालये तसेच कागल येथील आयुर्वेदिक महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयामुळे कोल्हापूर हे मेडिकल हब म्हणून उदयास येईल.कर्नाटकातील बेंगलुरुऐवजी रुग्ण या ठिकाणी उपचारासाठी येतील.या विविध रुग्णालयामुळे पश्चिम महाराष्ट्रासह कर्नाटक व गोवा सीमा भागातील लोकांची मोठी सोय होणार आहे.तसेच ९ ऑगस्ट रोजीच्या मुख्यमंत्री यांच्या संभाव्य दौऱ्याची तयारी कागल नगरपालिकेने आत्तापासूनच करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.यानिमित्त मुश्रीफ यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीला उजाळा दिला तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन केले. सुमारे २४० कोटी रुपये खर्च करून १२ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या रुग्णालयाचा सातबारा उतारा तहसीलदार अमरदीप वाकडे यांनी मुश्रीफ यांच्याकडे सुपूर्द केला .तो त्यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ.अभिजीत अहिरे यांना दिला.

यावेळी जि.प. अध्यक्षा शिल्पा खोत, नगराध्यक्षा सविता माने, पंचायत समिती सभापती सुवर्णा पाटील, उप सभापती डॉ. इंद्रजीत पाटील, मुख्याधिकारी डॉ.अजय पाटणकर, युवराज पाटील, केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने,गोकुळचे माजी अध्यक्ष नविद मुश्रीफ,डॉ.अजय चंदनवाले,राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सदानंद भिसे, शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.अभिजीत अहिरे,प्रकाशराव गाडेकर, नवल बोते, चंद्रकांत गवळी,अस्लम मुजावर, प्रवीण काळबर, अर्जुन नाईक, संजय चितारी, विवेक लोटे,नवाज मुश्रीफ, महेश चौगुले यांच्यासह महाविद्यालयाचे विभाग प्रमुख, डॉक्टर्स, नर्सेस, ग्रामस्थ उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. ९३ मधील प्लॉट नं. ३, ४ या भूखंडाची मे. उपविभागीय अधिकारी कार्यालय इचलकरंजी विभाग यांच्या कडील क्र. गुंठेवारी अ.आ.आ./ एस आर / १७११/०७ ने निवासी कारणाकरिता भूखंडाचा वापर करणेचा अधिकार प्राप्त झाला आहे. येथील श्री. चंद्रकांत कांबळे यांच्या प्लॉटिंग मधील प्लॉट नं. ४ ए चे क्षेत्र १०५० चौ. फुट यासी चतुःसीमा : पूर्वेस – प्लॉट नं.३ बी ची मिळकत, पश्चिमेस– प्लॉट नं. ४, दक्षिणेस – २० फुट रस्ता, उत्तरेस श्री.महादेव पवार यांची मिळकत. सदरची मिळकत श्री. चंद्रकांत मारुती कांबळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री सागर चांगदेव पाटील रा.इचलकरंजी यांना व त्यांनी अशीलांचेकडून संचकार रक्कम स्विकारून संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकतीसंदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इ. असलेस सदर नोटीस प्रसिद्धी पासून ७ दिवसाचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. २१/०७/२०२६

**ॲड. स्वाती आप्पासाहेब जामदार**
८/१३९२, मथुरानगर, सांगली रोड, इचलकरंजी.
मो.नं. ९९२१०३६३१७

## खरेदी करार नोटीस

मिळकतीचे वर्णनः–मौजे आळते येथील गट नंबर ४१५ मधील क्षेत्र हे. आर.०–४४ ची संपूर्ण शेत जमीन मिळकत यासी चतुःसिमा पूर्व – ओढा, पश्चिम– गट नंबर ४२४ ची मिळकत, दक्षिण– गट नंबर ४१६ ची मिळकत, उत्तर– गट नंबर ४१४ ची मिळकत यांची मिळकत असून या मिळकतीस समाईक वहिवाटी करिता गट नंबर ४२४ मधून येणे जाणे करिता रस्ता व त्यामध्ये विहीर असून त्यामधील हिस्सा असे एकुण क्षेत्र हे. आर. ०–०५ ची जमीन मिळकत सदरची मिळकत ही अनुराधा प्रकाश पाटील, अंजली राजेंद्र पाटील व प्रदीप प्रकाश पाटील यांच्या स्वमालकीची असून ती त्यांनी आमच्या पार्टीस तोंडी करारपत्राने देवू केलेली आहे व त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचा बोजा, कांहीही हक्क, हित संबंध, दावा, तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी तक्रारी नोंदवावी. म्हणून दिली नोटीस दि.२२/०७/२०२६

**विश्वनाथ कृष्णा घाटगे (स्टॅम्प रायटर)**
१०/५६३, विक्रम नगर इचलकरंजी
फोन नंबर. ९८२३४५८५८५

## जाहीर नोटीस

ता.हातकणंगले पैकी मौजे कबनूर ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर ४७८, ४७९ व ४८० पैकी बिगरशेती प्लॉट नंबर ४२ पैकी उत्तरबाजूचे क्षेत्र १०३–२० चौरस मिटर म्हणजेच क्षेत्र १११०–४३ चौरस फुट ची खुली जागा मिळकत सर्व. यासि चतुः सिमा– पुर्वेस – प्लॉट नंबर ४१, पश्चिमेस – ९.०० मिटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस– प्लॉट नंबर ४२ पैकी शिल्लक मिळकत, उत्तरेस – प्लॉट नंबर १०० ची मिळकत. सदरची मिळकत ही सुशांत व प्रशांत दिलीप पोवार रा. इचलकरंजी यांचे स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदर मिळकतीची संचकार पावती आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.२२/०७/२०२६

**ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे**
पत्ताः– ३/१५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी
९८८१०१४७२५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ५६१ / क पैकी बिगरशेती प्लॉट नं ६ चे क्षेत्र १३२५–०० चौरस फुट ची खुली जागा मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस – प्लॉट नं १०, पश्चिमेस – २० फुट रस्ता, दक्षिणेस – राजेंद्र कुंभार व दिपक कांबळे यांची मिळकत, उत्तरेस – प्लॉट नं ७ व ८ सदरची मिळकत ही रमेश तुकाराम खारगे रा शहापुर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीचा तोंडी करार करून दिलेला आहे . सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही ता . २३/०७/२०२६

**ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे**
पत्ताः– ३/१५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी
९८८१०१४७२५

## जाहीर नोटीस

इचलकरंजी मनपा हद्दितील मौजे शहापूर येथील गट नंबर २३४ (सि.स.नंबर १६८८०) पैकी बिगरशेती प्लॉट नंबर ९ व १० चे एकत्रित क्षेत्र १०३४–८५ चौरस मिटर जागेवरील एस. बी. हाईटस या नावाच्या नियोजीत अपार्टमेंट मधील फर्स्ट फ्लोअर वरील फ्लॅट नंबर सी–५ चे कारपेट क्षेत्र ५२१–० चौरस फुट (सेलेबल क्षेत्र १०६५–० चौरस फुट ) ची मिळकत सर्व . यासी चतुःसिमा – पुर्वेस – साईड मार्जिन, पश्चिमेस – सदनिका क्रमांक सी– ०४,दक्षिणेस– सदनिका क्रमांक सी – ०६, उत्तरेस – साईड मार्जिन, उर्ध्व (वर) – सदनिका क्रमांक इ–०५, अर्ध्व (खाली) – दुकानगाळे. सदर फ्लॅट रिझर्व्ह पार्किंगचे सोईसह आहे. सदरची मिळकत ही सिद्रा डेव्हलपर्स, इचलकरंजी तर्फे भागीदार १) फिरोज बादशहा शिकलगार व २) समीर शब्बीर शेख रा. इचलकरंजी यांचे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचा खरेदीपुर्व करार आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. २२/०७/२०२६

**ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे**
रा.३/१५३,देवमोरे वाडा, राणा प्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी
मो.क्रं.९८८१०१४७२५

## जाहीर नोटीस

सर्वांचे माहीती करीता या नोटीसीने कळवण्यात येते की मौजे तारदाळ येथील क. ग. नंबर ७३८ पैकी भुखंड क्रमांक १५ क्षेत्र १६२.६३.० चौरस मीटर चे सातबारा प्रमाणे क्षेत्र हे . ०. ०१६३ आर. म्हणजेच १७५०.० चौरस फुटची खुली मिळकत, याचा ग्रामपंचायत मिळकत नंबर १६९८ असा नमुद आहे. यासी चतुः सिमा पुर्वेस– भुखंड क्रमांक १४ ची मिळकत, पश्चिमेस – भुखंड क्रमांक १६ ची मिळकत, दक्षिणेस – दत्तू विभुते यांची मिळकत, उत्तरेस– २० फुट रुंदीचा अंतर्गत रस्ता, सदरची मिळकत रामचंद्र नाथा वाळकुंजे, रा. दानोळी, यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची असुन ती त्यांनी आमचे स्नेही यांचेकडून संचकार रक्कम स्विकारून खरेदी देण्याचे करारपत्राने खरेदी देण्याचे कबुल केले आहे सदर मिळकत ही पूर्णतः निर्वेध व निष्कर्जी आहे. सबब वर नमुद केलेल्या मिळकतीवर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क दावा हितसंबंध, बोजा, लागलिगाड असलेस संबंधितांनी आजपासून ७ सात दिवसाचे आत आमची योग्य त्या लेखी कागदोपत्रा निशी समक्ष खात्री करून घ्यावी, अन्यथा मुदतीनंतर माझे स्नेही सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी समजून व्यवहार पुरा करतील व तदनंतर कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक २१/०७/२०२६ इसवी.

**प्र.कृ. देशपांडे**
स्टॅम्प व्हेंडर, ४/४१, इचलकरंजी.
मो. ९८२२८०१११३

## जाहीर नोटीस

सर्वांचे माहीती करीता या नोटीसीने कळवण्यात येते की मौजे तारदाळ येथील क. ग. नंबर ७३८ पैकी भुखंड क्रमांक १४ क्षेत्र १६२. ६३.० चौरस मीटर चे सातबारा प्रमाणे क्षेत्र हे. ०.०१६३ आर. म्हणजेच १७५०.० चौरस फुटची खुली मिळकत, याचा ग्रामपंचायत मिळकत नंबर १६२९ असा नमुद आहे. यासी चतुःसिमा– पुर्वेस – भुखंड क्रमांक १३ ची मिळकत, पश्चिमेस – भुखंड क्रमांक १५ ची मिळकत, दक्षिणेस– दत्तू विभुते यांची मिळकत, उत्तरेस– २० फुट रुंदीचा अंतर्गत रस्ता, सदरची मिळकत कुबिर उर्फ कुबेर नाथा वाळकुंजे, रा. दानोळी, यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची असुन ती त्यांनी आमचे स्नेही यांचेकडून संचकार रक्कम स्विकारून खरेदी देण्याचे करारपत्राने खरेदी देण्याचे कबुल केले आहे सदर मिळकत ही पूर्णतः निर्वेध व निष्कर्जी आहे. सबब वर नमुद केलेल्या मिळकतीवर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क दावा हितसंबंध,बोजा, लागलिगाड असलेस संबंधितांनी आजपासून ७ सात दिवसाचे आत आमची योग्य त्या लेखी कागदोपत्रा निशी समक्ष खात्री करून घ्यावी, अन्यथा मुदतीनंतर माझे स्नेही सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी समजून व्यवहार पुरा करतील व तदनंतर कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही . म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक २१/०७/२०२६ इसवी.

**प्र.कृ. देशपांडे**
स्टॅम्प व्हेंडर, ४/४१, इचलकरंजी.
मो. ९८२२८०१११३

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णनः – जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी क.॥ इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील व श्री आदिनाथ को.ऑप. हौसिंग सोसायटी लि. इचलकरंजी या गृहनिर्माण संस्थेच्या मालकीचे मिळकतीचा रि.स.नं. ६४४ पैकी सभासद नात्याने अलॉट केलेला बिगरशेती प्लॉट नं. २४ क्षेत्र २२३.१४ चौ.मी याचे २४०० चौ.फुटाची खुली जागा यांसी चतुःसिमा–पुर्वेस–सदर रि.स.नं. पैकी प्लॉट नं. २५/अ ची मिळकत, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस– सदर रि.स.नं.पैकी बिगरशेती प्लॉट नं.२७ ची मिळकत, उत्तरेस – सदर रि.स.नं. पैकी बिगरशेती प्लॉट नं.२३ ची मिळकत.

२)वर नमुद केलेली मिळकत ही सौ. राजश्री देशभुषण रुगे, रा. इचलकरंजी यांची सभासद नात्याने मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. श्री आदिनाथ को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. इचलकरंजी या गृहनिर्माण संस्थेने सौ. राजश्री देशभुषण रुगे यांना संस्थेच्या संचालक मंडळ ठराव नं. ४, दि. २३/०५/१९९८ इ. रोजी वरील प्लॉट अलॉट केलेला आहे.सौ.राजश्री रुगे यांचेकडून गृहनिर्माण संस्थेने अलॉट केलेला असल अलॉटमेंट लेटर गहाळ झालेले असून अलॉटमेंट लेटर सापलेस ते गृहनिर्माण संस्थेकडे हजर करीत आहेत. म्हणून दिली नोटीस. ता. २२/०७/२०२६ इ. रोजी

**ॲड. सुनिल सु. धुपदाळे,**
रा.१७/२९४ पुजारी मळा, राजमातानगर इचलकरंजी
मो.नं.९३२६०२२३८५

## जाहीर नोटीस

जिल्हा – कोल्हापूर, ता–हातकणंगले, इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील टि.पी. स्किम नं. १, रि.स.नं.५६५/८ चे क्षेत्र ० हे. १५.७० आर ची आकार ०९०४ पै. ची मिळकत, यापैकी १० फूट बाय २० फुट, चौरस फूट २००, चौरस मिटर १८.५८ ची खुली जागा व यावर वॉ.नं.१६, घर नंबर ९३१ ची दगड, वीट, मातीचे बांधलेली कौलारू इमारत यासी चतुः सिमा पुर्वेस – ५ फूट रुंदिचा रस्ता व पलिकडे बाबासो बंडगर यांची मिळकत, पश्चिमेस– श्री. महादेव आवबा बंडगर यांची मिळकत, दक्षिणेस– याच नंबर पैकी श्री. अमर लक्ष्मण कदम यांची मिळकत, उत्तरेस – श्री. विनोद स्वामी यांची मिळकत.

येणेप्रमाणे मिळकत ही श्री. सदाशिव आवबा बंडगर, रा. बंडगर मळा, इचलकरंजी यांच्या मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांना कायम व खुश खरेदी देणेचे ठरवून तोंडी कराराने संचकार रक्कम स्विकारली आहे. तसेच श्री. सदाशिव आवबा बंडगर व श्री. अमर मोटे यांनी वरील मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलांना दिलेला आहे. सदर वरील मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, करार, लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलीही हक्क, अधिकार वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर असस्ल कागदपत्रासह समक्ष भेटून खात्री करून घ्यावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे अशिल वरील मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण करून घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस.ता.२२/०७/२०२६

**ॲड. एम. के. मुथा**
रा. १९/६१४, यशवंत कॉलनी, इचलकरंजी
मो.नं. ९५५२७४५१५.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधित नागरिक, संस्था, बँका, वित्तीय संस्था, विकासक व प्लॉट खरेदीदार यांना जाहीर सूचनाद्वारे कळविण्यात येते की, श्री. माणिक अण्णा उपाध्ये व सौ. पद्मजा माणिक उपाध्ये, रा. कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर हे कोरोची येथील क.ग.नं. ३७४ मधील जमीन क्षेत्र ०.४७.५० हेक्टर आर (मोजणीप्रमाणे ०.३३ आर) चे कायदेशीर मालक आहेत.

सदर जमिनीसंदर्भात श्री. शशिकांत सदाशिव ताटे व सौ. द्राक्षायनी सुनील भोसले यांच्याशी अनुक्रमे दि. ३१/१२/२०२० व दि. १८/०६/२०२४ रोजी नोटरीकृत करार करण्यात आले होते. तथापि, सदर करारांतील अटी व शर्तींचे पालन करण्यात संबंधित व्यक्ती वारंवार अपयशी ठरल्या असून कराराणुसार व्यवहार पूर्ण करण्यात त्यांनी कसूर केली आहे. त्याबाबत त्यांना कायदेशीर नोटीसही देण्यात आलेली आहे.

याशिवाय, सदर जमिनीच्या विकास व प्लॉट विक्रीच्या व्यवहारासंदर्भात काही गंभीर अनियमितता व फसवणुकीचे प्रकार झाल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले असून, त्याबाबत आवश्यक दिवाणी व फौजदारी कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

म्हणून या जाहीर सूचनेद्वारे सर्व संबंधितांना सावध करण्यात येते की, श्री. शशिकांत सदाशिव ताटे, सौ. द्राक्षायनी सुनील भोसले किंवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी सदर जमिनीबाबत कोणताही खरेदी–विक्री व्यवहार, विकास करार, हस्तांतरण, गहाण, प्लॉट खरेदी, आर्थिक व्यवहार किंवा कोणताही तृतीय पक्ष व्यवहार करू नये.

कोणीही व्यक्ती सदर जाहीर सूचनेकडे दुर्लक्ष करून व्यवहार केल्यास तो व्यवहार स्वतःच्या जोखमीवर केलेला समजला जाईल. त्याबाबत उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर परिणामास आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत.

ही जाहीर सूचना तथा नोटीस केवळ सर्व संबंधितांना वस्तुस्थितीची माहिती व सावधानतेचा इशारा देण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत असून, आमच्या अशिलांचे सर्व कायदेशीर हक्क व उपाय स्पष्टपणे अबाधित राखून ठेवण्यात आलेले आहेत.

स्थळ– इचलकरंजी.

**ॲड. जगदीश व्ही. गरुड**
मुंबई उच्च न्यायालय, १०३, शांती अपार्टमेंट, मंडलिक पार्क, कोल्हापूर. मो. ९८३४६६५५३६

# पूराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-कर्नाटक आंतरराज्य समन्वयावर भर

## जिल्हाधिकारी राठोड;हिप्परगी व अलमट्टी धरणासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती

कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)-

**संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांतील प्रशासनामध्ये आंतरराज्य समन्वय यंत्रणा अधिक सजग केली असून पूर व्यवस्थापनासाठी परस्पर समन्वय ठेऊन दोन्ही राज्यातील यंत्रणा सज्ज केली आहे.**



आंतरराज्य समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी हिप्परगी आणि अलमट्टी धरण परिसरासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांनी दिली.

कोल्हापूर जिल्ह्यातील धरणप्रकल्प व नद्यांमधून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा प्रवाह कृष्णा नदीत एकवटून पुढे शिरोळ तालुक्यातील राजापूर बंधाऱ्यानंतर कृष्णा नदी कर्नाटक राज्यात प्रवेश करते. त्यामुळे कर्नाटकातील हिप्परगी बंधारा आणि अलमट्टी धरणातील पाणीसाठा, पाणी व्यवस्थापन व विसर्ग यांचा कोल्हापूर जिल्ह्यातील पूरस्थितीवर थेट परिणाम होतो. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने सांगली जिल्ह्यासह कर्नाटकातील बेळगाव, बागलकोट आणि विजापूर जिल्हा प्रशासनाशी अधिक समन्वय ठेवला आहे. पूरस्थितीच्या काळात दोन्ही राज्यांतील जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभागामार्फत दैनंदिन पर्जन्यमान, धरणांतील पाणीसाठा, विसर्ग, नदीपात्रातील प्रवाह आदींची नियमित माहिती एकमेकांना पाठविली जाते.

जिल्ह्यातील पर्जन्यमान, धरणांतील पाणीसाठा आणि नदीतून सोडण्यात आलेल्या पाण्याची माहिती कर्नाटक प्रशासनाला नियमितपणे पाठविली जाते. त्याचप्रमाणे हिप्परगी बंधारा आणि अलमट्टी धरणात प्राप्त झालेल्या पाण्याचे प्रमाण, उपलब्ध साठा आणि करण्यात आलेला विसर्ग याबाबतचा दैनंदिन अहवाल कर्नाटक प्रशासनाकडून कोल्हापूर जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून दिला जातो.सांगली पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता यांच्या माध्यमातून कर्नाटक प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून पाणीपातळी, पाणीसाठा आणि विसर्गाबाबतचे अहवाल नियमितपणे देवाण-घेवाण केले जात आहेत. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पर्जन्यमान, नद्यांतील वाढती पाणीपातळी, धरणांतील साठा आणि कृष्णा नदीमार्गे कर्नाटकात जाणारा पाण्याचा प्रवाह याबाबतची माहिती कर्नाटकातील बेळगाव, बागलकोट आणि विजापूर या जिल्ह्यांसाठीही अत्यंत महत्त्वाची असल्याने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फतही सातत्यपूर्ण समन्वय राखला जात आहे.

याशिवाय, राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील वरिष्ठ सनदी अधिकारी आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची आंतरराज्य समन्वयासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली. तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने करवीर, हातकणंगले आणि शिरोळ या पूरप्रवण तालुक्यांना क्षेत्रभेटी देऊन स्थानिक प्रशासनासोबत पूरपूर्व तयारीचा आढावा घेण्यात आला असून सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# शाहूवाडीत विशेष मतदार यादी पुनरीक्षणबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण

सरूड,ता.२२(प्रतिनिधी)-

**जिल्हाभरात सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर शाहूवाडी तालुक्यातही मतदार नोंदणी, नावांची पडताळणी आणि आवश्यक कागदपत्रांबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

विशेषतः डोंगराळ व दुर्गम भागातील तसेच रोजगारानिमित्त मुंबईसह इतर ठिकाणी वास्तव्यास असलेल्या चाकरमानी नागरिकांना जुन्या मतदारांची नावे कायम राहतील का, याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.तालुक्यातील बीएलओ, तलाठी आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर चौकशी होत असून, नवीन मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती, पत्त्यातील बदल तसेच अर्जांची पडताळणी करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

मात्र, प्रक्रियेविषयी स्पष्ट माहिती नसल्यामुळे अनेक नागरिक गोंधळलेल्या अवस्थेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.१८ वर्षे पूर्ण झालेल्या युवक-युवतींनी मतदार म्हणून नाव नोंदविणे तसेच नाव किंवा पत्त्यात बदल आवश्यक असलेल्या मतदारांनी विहित मुदतीत अर्जासह आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### प्रशासनाचे पडताळणीचे नागरिकांना आवाहन

मतदार यादीतील अचूकता ही लोकशाही प्रक्रियेचा महत्त्वाचा आधार असल्याने प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या नावाची खात्री करून घ्यावी तसेच कोणतीही शंका असल्यास संबंधित बीएलओ, तलाठी किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक माहिती घ्यावी, असे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.शाहूवाडीच्या तहसीलदार शुभांगी जाधव यांनी तालुक्यातील सर्व पात्र मतदारांना विशेष पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. 'मतदार यादीत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी नागरिकांनी वेळेत पडताळणी करून आवश्यक दुरुस्त्या करून घ्याव्यात,' असे त्यांनी सांगितले.

# युवा पिढीने आत्मचरित्र पुस्तकातून बोध घ्यावा-आम.आवाडे

इचलकरंजी,ता.२२-

**संघर्षातून ध्येयाकडे नेणारा हा एक थक्क करणारा प्रवास या आत्मचरित्र पुस्तकात असून समाजातील युवा पिढीने नक्कीच यातून बोध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन आम.राहूल आवाडे यांनी व्यक्त केले.**

येथील निवृत्त शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते सुकुमार आप्पाजी नरंदेकर यांच्या चंद्रमौळी जीवन संघर्ष या आत्मचरित्र पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून आम.डॉ.राहुल आवाडे बोलत होते.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आम.सुरेश हाळवणकर, पंचगंगा सहकारी कारखान्याचे चेअरमन पी.एम.पाटील, जयकुमार कोले, बी.जे.पाटील उपस्थित होते.यावेळी माजी आम.सुरेश हाळवणकर, पी.एम.पाटील, जयकुमार कोले यांनी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना लेखक सुकुमार नरंदेकर यांनी, समाजामध्ये आदर्श पिढी घडविताना आलेले अनुभव तसेच आजतागायत केलेले सामाजिक कार्याच्या जोरावरच मला आत्मचरित्र लिहिण्यास बळ मिळाले असे सांगितले.यावेळी सदर आत्मचरित्राचे उत्तम मुखपृष्ठ केल्याबद्दल सारंग दास यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सौ.अनुराधा मांढरे व ॲड.वृषाली नरंदेकर यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक ॲड.संग्राम नरेंद्र यांनी केले.आभार प्रा. अशोक कांबळे यांनी मानले.कार्यक्रमास अशोक पोतणीस, मिलिंद कोले, मधुकर मणेरे, सुधीर पाटील, सतीश केटकाळे, कोमल अहिवळे, अपेक्षा कांबळे, गजानन कोले, युवराज कांबळे, दिलीप शिंगे, नेताजी कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# गोविंदराव हायस्कूलमध्ये आषाढी एकादशी सोहळा उत्साहात

इचलकरंजी,ता.२२-

**आषाढी एकादशीच्या निमित्ताने गोविंदराव हायस्कूलच्या प्रांगणात सेवानिवृत्त ना. बा परिवारा मार्फत दिंडी सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त कर्मचारी व शिक्षक उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि 'विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल' या नामघोषात उत्साहपूर्ण दिंडी काढण्यात आली. दिंडीदरम्यान रिंगण सोहळा पार पडला. महिला भगिनींनी पारंपारिक फुगड्या खेळून आषाढी एकादशीचा आनंद द्विगुणित केला. यानंतर आयोजित अभंग गायनाच्या कार्यक्रमात उपस्थितांनी संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आदी संतांच्या रचना सादर करून भक्तीचा संदेश दिला. प्रकाश कुलकर्णी, सुरेंद्र दास, श्री.कोडलकरी, श्री.चोरगे यांनी आपल्या सुरेल आवाजात अभंग सादर केले.यावेळी प्रमुख वक्ते एच.ए.पाटील यांनी आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व विषद केले. भीमराव सावंत यांनी आभार मानले.

# प्रतिक साळुंखे यांची निवड

कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)-

**राजे साळुंखे चालुक्य राजवंश प्रतिष्ठानच्या महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्षपदी प्रतिक साळुंखे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.शिवाजी साळुंखे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.**



सामाजिक क्षेत्रातील सक्रिय कार्य, युवकांमधील लोकसंग्रह आणि संघटन कौशल्याची दखल घेऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. महाराष्ट्रभर युवकांचे संघटन मजबूत करणे,सामाजिक उपक्रमांना गती देणे आणि चालुक्य राजवंशाचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी ते कार्य करतील, असा विश्वास प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# शासनाच्या विरोधात कागल तालुका इंडिया आघाडीची निदर्शने

मुरगूड,ता.२२(प्रतिनिधी)-

**नीट परीक्षा पेपर फुटी, गैरव्यवहार बाबतची जबाबदारी घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा तसेच संसदेवर काढलेला विद्यार्थी मोर्चा शासनाने बळाचा वापर करून विद्यार्थ्यांना रक्तबंबाळ करून जखमी केल्याच्या निषेधार्थ कागल तालुका इंडिया आघाडीच्यावतीने मुरगूड पोलीस ठाण्यासमोर निदर्शने करण्यात आली.**



कागल तालुका इंडिया आघाडीच्यावतीने मुरगूड पोलीस ठाण्यासमोर निदर्शने करताना आंदोलक.

कागल तालुका इंडिया आघाडी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी, विद्यार्थी संघटना, युवक कार्यकर्ते यांच्यावतीने मुरगूड पोलीस स्टेशन ते शिवतीर्थ दरम्यान धिक्कार व निषेधाच्या घोषणा देत निषेध रॅली काढून मुरगूड पोलीस ठाण्यासमोर घोषणाबाजी करीत जोरदार निदर्शने करण्यात आली.

विद्यार्थी नेते अभिजीत दिपके व सामाजिक कार्यकर्ते व नेते सोनम वांगचूक यांचे गेले २३ दिवस सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यात आला. दरम्यान येत्या दोन ते तीन दिवसात शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास कागल तालुका इंडिया आघाडीच्यावतीने शुक्रवार ता.२४ जुलै सकाळी ११ वाजता कागल तहसील कार्यालयासमोर इंडिया आघाडीच्या वतीने तीन दिवसाचे साखळी उपोषण करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

इंडिया आघाडीच्यावतीने काँग्रेस तालुकाध्यक्ष ॲड.दयानंद नानासाहेब पाटील-नंद्याळकर, स्वाभिमानी संघटना अध्यक्ष नामदेव भराडे, शिवसेना तालुका संघटक मारुती पुरीबुवा, बांधकाम कामगार तालुका संघटक कॉ.दिनकर जाधव, राष्ट्रवादी (श.प.)तालुका संघटक प्रकाश तिराळे, कॉ.बबन बारदेस्कर, सामाजिक कार्यकर्ते कृष्णात सोनाळे, सचिन हंचनाळे आदि प्रमुखांसह अन्य कार्यकर्ते हजर होते.दरम्यान इंडिया आघाडीच्या वतीने मुरगूड पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक क्रांती पाटील यांना निवेदन देण्यात आले.



# कोरे पॉलिटेक्निकला डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांची पसंती

वारणानगर,ता.२२(प्रतिनिधी)-

**राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत (डीटीई) राबविण्यात येणाऱ्या डिप्लोमा अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या कॅप फेरीत तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिप्लोमा), वारणानगर यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.**

महाविद्यालयातील मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या शाखांना विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रथम पसंती दिली असून, पहिल्याच फेरीत लक्षणीय जागा भरल्या आहेत. या यशाबद्दल श्री वारणा शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.आ.विनय कोरे, डॉ.व्ही.व्ही.कारजिन्नी यांनी संस्थेचे प्राचार्य व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

# पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपणाची गरज-तोरस्कर

कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)-

**पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन काळाची गरज बनली असून प्रत्येक नागरिकांनी वृक्षलागवडीमध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ कवी बाळासाहेब तोरस्कर यांनी केले.**



वृक्षारोपण करताना ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे पदाधिकारी.

येथील हनुमान नगरातील ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्यावतीने तसेच जायंट्स ग्रुप ऑफ मेट्रो कोल्हापूरच्या वतीने सहकार्याने विविध फळझाडांच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वृक्षारोपण व स्वच्छता उपक्रमात मेट्रोचे पदाधिकारी तसेच शिवाजीराव यादव, सचिव हलाल कुरेशी, मोहन गावडे, मुजावर शेख तसेच सेवा संघाचे कार्याध्यक्ष शामराव पाटील, प्रकाश देसाई, श्रीपाल देसाई व दिलीप शिंदे उपस्थित होते. यावेळी पर्यावरण संवर्धनासाठी झाडाभोवती वाढलेली व सुकलेली वेलींची जळमटे स्वच्छ करण्यात आली.स्वच्छता उपक्रम मोहन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.या वृक्षारोपण केलेल्या रोपांची चांगल्या प्रकारे देखभाल केली जाईल अशी ग्वाही संघाचे अध्यक्ष नामदेव पाटील यांनी दिली.

# हर्षाली मोरेने पटकाविले कांस्यपदक

कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र राज्य ४२ वी सब-ज्युनिअर व ५२ वी ज्युनिअर जलक्रीडा अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच नाशिक येथे पार पडली. या स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात कोल्हापूरची हर्षाली रमेश मोरे हिने उत्कृष्ट कामगिरी करत २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक या वैयक्तिक प्रकारात कांस्यपदक पटकावले.**



महाराष्ट्र जलतरण संघटना (स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न) यांच्यावतीने आयोजित महाराष्ट्र राज्य ४२ वी सब-ज्युनिअर व ५२ वी ज्युनिअर जलक्रीडा अजिंक्यपद २०२६ या स्पर्धा १८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत राजमाता जिजाऊ आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव, नाशिक रोड, नाशिक येथे उत्साहात पार पडल्या.या स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात कोल्हापूरची हर्षाली रमेश मोरे हिने उत्कृष्ट कामगिरी करत २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक या वैयक्तिक प्रकारात कांस्यपदक पटकावले.

तसेच ४१०० मीटर मिक्स्ड मेडले रिले स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून खेळताना रौप्यपदक मिळवून कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला. हर्षाली सध्या स्वामी विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे इयत्ता बारावी (विज्ञान शाखा) मध्ये शिक्षण घेत असून तिला प्रशिक्षक जॉन क्रिस्टोफर, प्रभाकर डांगे, मानसिंग पाटील, महेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १७/०७/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
मजबूर लडकी
सायं. ७ वा.
A प्यार की मस्ती प्रौढांसाठी


श्रीदत्त
शुक्रवार, ता. १७ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लिगल सिडक्शन
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी.
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
गुरूवार ता.२३ पासून रोज ४ खेळ
शो 1 ११.४५ | शो 2 ३.०० | शो 3 ६.१५ | शो 4 ९.३०
सुपरस्टार-थलपती विजय यांची प्रमुख भुमिका




ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
DOLBY DIGITAL PLUS 7.1
मनोरंजनाचा धमाका अनुभवा आपल्या आवडत्या पंचवटी चित्रमंदिरात
ऑनलाईन पेमेंट स्विकारले जाईल G Pay PhonePe
ऑनलाईन बुकिंग साठी bookmyshow

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गुरूवार ता.२३ पासून
रोज ४ खेळ ११.४५-३-६-९.१५
थलपती विजय यांची प्रमुख भुमिका असलेला हिंदी चित्रपट




कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत गुरुवार ता.२३ पा.
११.३० * ३ * ६.३० * ९.३०
सुपरहिट फुल्ल ॲक्शन चित्रपट




गुरु
गुरूवार,ता. २३ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२ * ३.१५ * ६.३० * ९.४५ वा.
तामिळनाडूचे मुख्यमंत्री आदरणीय
श्री. थलापती विजय यांचा बहुप्रतिक्षित चित्रपट




RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow




"जन नेता" (हिंदी)
11:30 AM, 03:00 PM
06:30 PM, 10:00 PM
"धमाल 4" (हिंदी)
10:30 AM, 01:30 PM
04:30 PM, 07:30 PM
10:30 PM
"वेलकम टू द जंगल" (हिंदी)
12:30 PM
"द ओडिसी" (हिंदी)
06:15 PM, 09:30 PM
"अल्फा" (हिंदी)
03:30 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11




जन नेता (HIN) (A)
12.00, 03.30, 07.00, 10.30pm
धमाल 4 (HIN) (U/A)
10.30am, 02.00, 04.30, 07.30, 10.15pm
द ओडिसी (HIN) (A)
10.45am, 01.15, 07.00, 10.30pm
बोल बोल राणी (HIN) (U/A)
04.45pm
गुरुवार धमाका पेप्सी व पॉपकॉर्नवर मिळवा 50% सूट

# सातारा एमआयडीसीच्या विकासकामांना मिळणार गती

## उच्चस्तरीय बैठकीत अनेक महत्वपूर्ण निर्णय

सातारा,ता.२२(प्रतिनिधी)–

**सातारा औद्योगिक वसाहतीच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत विविध विकासकामांना गती देणारे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पाणीपुरवठा,एमआयडीसी विस्तार,आयटी पार्क,ट्रक टर्मिनल, कन्व्हेन्शन सेंटर, पर्यावरण संवर्धन आणि उद्योगांसमोरील प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेण्यात आली.**



मंत्रालयात आयोजित बैठकीप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत,सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व अधिकारी वर्ग.

बैठकीत सातारा एमआयडीसीच्या जुन्या व नव्या औद्योगिक क्षेत्रासाठी सुमारे १३.६९ कोटी रुपयांच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्यात आली. या योजनेमुळे औद्योगिक क्षेत्राला नियमित व पुरेशा दाबाने पाणी उपलब्ध होणार असून, भविष्यातील औद्योगिक विस्तारालाही आवश्यक आधार मिळणार आहे.एमआयडीसीच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश देण्यात आले. महसूल व उद्योग विभागाने संयुक्त पाहणी करून प्रकरणांचा लवकर निपटारा करावा, अशा सूचना जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या.

औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांवर होत असलेल्या दुहेरी ग्रामपंचायत कर आकारणीचा मुद्दाही बैठकीत चर्चिला गेला. मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ सातारा यांनी मांडलेल्या मागणीची दखल घेत संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक निर्णय घेण्याचे निश्चित करण्यात आले.

सातारा आयटी पार्क प्रकल्पालाही बैठकीत गती मिळाली.प्रकल्पासाठी आवश्यक निधी महसूल विभागाकडे जमा करण्यात आला असून,जागेचा ताबा मिळताच विकासकामांना प्रारंभ करण्यात येणार आहे.साताऱ्यात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यासाठी पुढील महिन्यात पुण्यात आयटी कंपन्यांची विशेष परिषद आयोजित करून साताऱ्यातील गुंतवणुकीच्या संधी सादर केल्या जाणार आहेत.

याशिवाय साताऱ्यात आधुनिक सुविधांनी सुसज्ज कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यास तत्त्वतः मंजुरी देण्यात आली असून, त्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जुन्या एमआयडीसीतील ट्रक टर्मिनलचे काम लवकर पूर्ण करण्याबरोबरच औद्योगिक क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी स्वतंत्र पोलिस ठाणे उभारण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडण्यात येणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत व मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

या बैठकीस उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी देवेंद्रसिंह कुशवाह, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे,सातारा जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

# वाडीभागाई फाटा ते सागावकडे जाणाऱ्या रस्त्याची दूरावस्था

शिराळा,ता.२२(प्रतिनिधी)–

**शिराळा कोकरुड मुख्य रस्त्यावरुन वाडीभागाई फाटा ते सागावकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली असून गेली चार पाच वर्षापासून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. वाहतुकीची मोठी वर्दळ असल्याने मोठा अनर्थ होण्याची शक्यता असून दुर्घटना होण्याअगोदर प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करुन तातडीने खड्डे बुजवावेत,अशी मागणी नागरिकांच्यातून व वाहनधारकांच्यातून जोर धरत आहे.**



वाडीभागाई फाटा ते सागावकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुर्दशा.

वाडीभागाई गावापासून सागावकडे जाणाऱ्या रस्त्यावर ओढ्यावर पूल आहे तोही अंतिम घटका मोजत आहे. त्यातच रस्ता अरुंद व खड्डामय झाल्याने मोठा अनर्थ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरी प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करुन तातडीने रस्त्यावरील खड्डे बुजवावेत,अशी

### खड्डे बुजवण्याची नागरिकांची मागणी

मागणी नागरिकांच्यातून वाहन धारकांकडून होत आहे. बिळाशी, मांगरुळ, मोरेवाडी, बेलेवाडी, शिंदेवाडी, रीळे, पावलेवाडी, शांतीनगर, बिऊर, तडवळे, उपवळे या गावातील लोकांना वाडीभागाई मार्गे कोल्हापूरला जाण्यासाठी व वाडीभागाई, सागाव, कणदूर, ढोलेवाडी या गावाबरोबरच शाहुवाडी तालुक्यातील सरुड, पाटणे या गावातील लोकांना कोकरुडला जाण्यासाठी दळणवळणासाठी हा रस्ता सोयीचा असल्यामुळे नेहमी या रस्त्यावरुन दुचाकीपासून ते अवजड वाहनांची रात्रंदिवस मोठी वर्दळ असते.परिणामी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

### मलकापूर शहर वीजबीलमुक्त अभियानाचा आज शुभारंभ

कराड,ता.२२(प्रतिनिधी)–

**मलकापूर नगरपरिषदेच्या वतीने सहकारमहर्षी स्व.जयवंतराव भोसले (आप्पा) सौरऊर्जा अभियानांतर्गत मलकापूर शहर वीजबीलमुक्त अभियान तसेच सौरऊर्जा वापरणाऱ्या मिळकत धारकांना संकलित करामध्ये १० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा शुभारंभ आज ता.२३ रोजी सकाळी ११.३० वाजता मलकापूर नगरपरिषदेच्या बहुउद्देशीय इमारतीत, लक्ष्मी मंदिर, लक्ष्मीनगर येथे होणार असल्याची माहिती मलकापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कपिल जगताप यांनी दिली.**

अभियानाचा शुभारंभ आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते होणार आहे.सर्व नगरसेवक, तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नगरपरिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'त्या' महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ द्यावा

## मागणीसाठी महिला काँग्रेसचा साताऱ्यात मोर्चा; जिल्हाधिकाऱ्यांतर्फे राज्य सरकारला निवेदन

सातारा,ता.२२(प्रतिनिधी)–

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जिल्ह्यातील मोठ्या संख्येने महिलांचा लाभ कोणतीही स्पष्ट कारणे न देता बंद करण्यात आल्याचा आरोप करत सातारा जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.**



लाडकी बहीण योजनेचा लाभ पुन्हा सुरू करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महिला काँग्रेसने काढलेला मोर्चा.

मोर्चानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शिल्पा पाटील यांच्यामार्फत राज्य सरकारला निवेदन देऊन लाभ बंद झालेल्या सर्व महिलांना पुन्हा योजनेत समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सुषमा राजेघोरपडेयांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. राज्यभरातील सुमारे ९२ लाख महिलांचा लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद करण्यात आल्याची आकडेवारी समोर आली असून, त्यामध्ये सातारा जिल्ह्यातीलही मोठ्या संख्येने महिलांचा समावेश असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

योजनेला २८ जून २०२४ रोजी सुरुवात झाल्यापासून आजपर्यंत लाभार्थी संख्येत झालेल्या बदलांची सविस्तर माहिती जाहीर करावी, प्रारंभी किती महिला लाभार्थी होत्या, सध्या किती आहेत, कोणत्या कारणांमुळे किती महिलांचा लाभ बंद करण्यात आला तसेच योजने संदर्भातील सर्व शासन निर्णय उपलब्ध करून द्यावेत,अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.लाभ बंद होण्यामागे ई-केवायसी हे प्रमुख कारण असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याचे सांगत, सरकारने ई-केवायसीची प्रक्रिया पुन्हा सुरू करून लाभ बंद झालेल्या महिलांना तातडीने योजनेचा लाभ पूर्ववत करावा, अशी मागणी महिला काँग्रेसने केली. याशिवाय लाभ बंद करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या १२ निकषांचा फेरविचार करून सुरुवातीला ज्या सर्व महिलांना योजना मंजूर करण्यात आली होती, त्या सर्वांना पुन्हा सरसकट लाभ द्यावा, अशीही मागणी करण्यात आली.

मोर्चानंतर देण्यात आलेल्या निवेदनावेळी मनीषा साळुंखे, अनिता जाधव, मालन परळकर, उज्वला सुतार, धनश्री मालुसरे, शोभा गोळे, नाझनीन फकीर, माधवी वर्पे, अंजली कांबळे, हजरा शिकलगार, लीना सातपुते, नाजिम इनामदार, श्रीकांत कांबळे, विनय मोरे, अमोल शिंदे, ऋषिराज मोहिते, अविनाश खापे, सतीश सुतार, संतोष डांगे यांच्यासह लाभ बंद झालेल्या शेकडो महिला उपस्थित होत्या.



पी.एम.सूर्यघर योजनेचा शुभारंभ प्रसंगी आम.सत्यजित देशमुख,सुखदेव पाटील, के.डी.पाटील,सत्यजित पाटील आदी.

### शिराळा येथे पी.एम. सूर्यघर योजनेचा उत्साहात शुभारंभ

शिराळा,ता.२२(प्रतिनिधी)–

**केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या पी.एम. सूर्य घर योजनेचा शुभारंभ आमदार सत्यजित देशमुख यांच्या उपस्थितीत शिराळा येथे करण्यात आला.**

या उपक्रमांतर्गत शिराळा विधानसभा मतदारसंघात ३ किलोवॅट क्षमतेच्या १०० सोलर सिस्टीम लाभार्थ्यांच्या घरांवर बसविण्यात आल्या असून, त्याची सुरुवात शिराळा येथील महादेव शेणेकर व सदाशिव शेणेकर यांच्या निवासस्थानी करण्यात आली. यावेळी नागरिकांनी केंद्र व राज्य शासनाच्या पी.एम. सूर्य घर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या योजनेअंतर्गत घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यामुळे घरगुती वीज बिलात मोठी बचत होण्याबरोबरच पर्यावरणपूरक ऊर्जेच्या वापरालाही चालना मिळणार आहे. यावेळी सुखदेव पाटील, के. डी. पाटील, सत्यजित पाटील, कुलदीप निकम, सर्जेराव गायकवाड, अभिजीत यादव, राजसिंह पाटील, रमेश कांबळे, सचिन डांगे, विद्याधर कुलकर्णी, अभिजीत शेणेकर,धनाजी बांदिवडेकर, संतोष इंगवले,सचिन नलवडे,विनोद कदम,उत्तम गायकवाड, जावेद काझी, मोहन जिरंगे, भैरव राशिवडेकर तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### पावसामुळे ढेबेवाडी विभागात भात लागवडीची लगबग

सणबूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**पाटण तालुक्यातील ढेबेवाडी सह परिसर आणि डोंगरपठारावर गेल्या काही दिवसांपासून समाधानकारक पाऊस पडत आहे.या सततच्या आणि पोषक पावसामुळे येथील शेतकरी वर्ग सध्या भात लागवडीच्या कामांमध्ये अत्यंत व्यस्त असून, डोंगरपठारावर सध्या भात लावणीची लगबग पाहायला मिळत आहे.**

पाटण तालुका हा प्रामुख्याने डोंगराळ भाग आणि पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारा म्हणून ओळखला जातो. या भागात खरीप हंगामात भात हे प्रमुख पीक घेतले जाते.यंदाच्या मोसमात सुरूवातीला काही काळ पावसाने विश्रांती घेतली होती; मात्र गेल्या काही दिवसांपासून ढेबेवाडी परिसरातील डोंगरपठारावर पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. या सततच्या पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचले असून जमीन भात लावणीसाठी योग्य आणि भुसभुशीत झाली आहे.

डोंगरपठारावरील पाण्याचे स्त्रोत आणि पाटपाटांमध्ये पाणी खळाळल्याने रोपांची आवणी वेगाने सुरू आहे.सकाळी लवकर शेतकऱ्यांची पावले पाणंद रस्त्यांवरून शेताच्या दिशेने पडताना दिसत आहेत. महिला वर्गाकडून पारंपारिक गाणी म्हणत चिखलात रोपे लावण्याचे काम सुरू असून, पाऊस असाच कायम राहिल्यास यंदा भाताचे विक्रमी उत्पादन हाती येईल, असा आशावाद शेतकऱ्यांतून व्यक्त केला जात आहे.

# दुग्ध प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न व्हावेत

## अजितराव घोरपडे; जत येथे बियाणांचे वाटप

जत,ता.२२(प्रतिनिधी)–

**जत तालुक्यात पशुधन वाढीस मोठा वाव असून आगामी काळ हा पशुधन विकासासाठी सुवर्णकाळ ठरणार आहे. शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी पशुपालन व दुग्ध व्यवसायाकडे वळण्याची गरज आहे. जत तालुक्यात दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढत असून येथे दुग्ध प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत,असे प्रतिपादन माजी मंत्री अजितराव घोरपडे यांनी केले.**




जत येथे शेतकऱ्यांना बियाणांचे वाटप करताना अजितराव घोरपडे सोबत सावित्रीताई पाटील,विलासराव जगताप आदी.

सांगली जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या वतीने स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जत येथे शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर १७ टन वैरण बियाण्यांचे वाटप, तांत्रिक मार्गदर्शन तसेच वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्षा संगीता पाटील या होत्या.यावेळी कृषी सभापती सावित्रीताई रवी पाटील, माजी सभापती तम्मणगौडा पाटील, माजी आमदार विलासराव जगताप यांचे मनोगत झाले.

जिल्हा परिषद अध्यक्षा संगीता पाटील यांनी उपक्रमाचे कौतुक करून शेतकरी विकासासाठी जिल्हा परिषद पुढाकार घेऊन काम करेल, अशी ग्वाही दिली.यावेळी डॉ. गवळी यांनी शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. यावेळी सभापती अर्चना पाटील,आटपाडी नगरपंचायत सभापती संध्या पाटील, जिल्हा परिषद सदस्या डॉ. शिल्पा जीवन्नवर, सुनील भैय्या पवार, प्रमोद सावंत, रमेश बिराजदार, उपायुक्त श्रीकांत सुर्वे, गटविकास अधिकारी अविनाश पाटील,वन परीक्षेत्र अधिकारी निखिल पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक श्रीकांत सुर्वे यांनी केले तर आभार डॉ. सोनार यांनी मानले.

### कुसुमताई पाटील आरोग्य केंद्रातर्फे शस्त्रक्रिया शिबीर

ईश्वरपूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**उरुण ईश्वरपूर (कापुसखेड नाका) येथील कासेगाव एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील आरोग्य केंद्राच्या वतीने कराड येथील कृष्णा विश्व विद्यापीठ,कृष्णा हॉस्पीटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष,प्रतिक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. प्रतिक पाटील यांच्या संकल्पनेतून आणि आ.जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आलेले श्रीमती कुसुमताई पाटील आरोग्य केंद्रात रुग्णांची सर्वरोग तपासणी करून उपचार केले जातात. पुढील शस्त्रक्रिया कृष्णा हॉस्पिटल येथे करण्यात येत आहेत. मोफत मोती बिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी नेत्र ज्योती- एका नव्या प्रकाशाची सुरुवात या नावाने ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अनुभवी नेत्र तज्ञांची सेवा,मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया आदी सेवा या विशेष मोहिमेत दिल्या जाणार आहेत. ज्यांना या मोहिमेत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करावयाच्या आहेत, त्यांनी कापुसखेड नाका येथील इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन येथील श्रीमती कुसुमताई पाटील आरोग्य केंद्रात सकाळी १० ते ५ या वेळेत भेटावे, असे संयोजकांनी आवाहन केले आहे.

# जिल्ह्यातील ३८ हजार शेतकऱ्यांची कर्ज खाती पोर्टलवर अपलोड

## कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी अॅग्रीस्टॅक नोंदणी करण्याचे आवाहन

सातारा,ता.२२(प्रतिनिधी)–

**शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ योजनेंतर्गत सातारा जिल्ह्यात ३८ हजार ३९० शेतकऱ्यांची ४१ हजार ४२१ कर्ज खाती पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली आहेत.या योजनेच्या लाभासाठी ज्या शेतकऱ्यांची अॅग्रीस्टॅक नोंदणी झालेली नसेल त्यांनी अॅग्रीस्टॅक नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहन सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबधंक संजयकुमार सुद्रीक यांनी केले आहे.**

शासनाने दिनांक २ जून २०२६ रोजीच्या सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या शासन निर्णयाद्वारे,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली असून दिनांक १५ जुलै २०२६ रोजीच्या शासन पूरकपत्राद्वारे सदर योजनेच्या निकषात बदल केला असून काही अटी वगळल्या आहेत. त्यानुसार या योजनेत कर्जमुक्ती, एक वेळ समझोता,व प्रोत्साहन पर लाभ अशा स्वरूपात कर्जमाफी योजनेचा लाभ देणार असून कर्जमुक्तीमध्ये दिनांक १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची तसेच सदर कालावधीतील पुनर्गठन/फेर पुनर्गठन करून मध्यम मुदत कर्जात रूपांतर केलेल्या पीक कर्जाची दिनांक ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली व ता.३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यावरील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह अधिकतम रक्कम रुपये २ लाखापर्यंत आहे. अशा शेतकऱ्यांची त्यांच्या कर्ज खात्यात रुपये दोन लाखापर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळालेल्या वरील निकषानुसार पात्र असलेल्या शेतकऱ्यांनाही रू.२ लाखापर्यंत लाभ मिळणार आहे.

एक वेळ समझोता स्वरूपात लाभ देताना दिनांक १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची तसेच सदर कालावधीतील पुनर्गठन/फेर पुनर्गठन करून मध्यम मुदत कर्जात रूपांतर केलेल्या पीक कर्जाची




दिनांक ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली व दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर परत फेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम रू.२ लाखापेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्याने प्रथम रू. २ लाखापेक्षा जास्त असलेली थकीत रकमेची परतफेड केल्यास एकवेळ समझोता अंतर्गत रू. २ लाख रकमेचा लाभ देण्यात येईल. प्रोत्साहनपर लाभ योजने अंतर्गत सन २०२२-२३, सन २०२३ -२४ व सन २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करून आर्थिक वर्ष संपल्यानंतर विहित मुदतीत कर्जाची परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना प्रती शेतकरी रू. ५० हजार इतक्या अधिकतम रकमेपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येईल.मात्र अशा शेतकऱ्याने सन २०२५-२६ मध्ये पीक कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची देखील विहित मुदतीत परतफेड करणे आवश्यक असेल.सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाची अट वगळण्यात आलेली आहे.

सातारा जिल्ह्यात सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. सातारा बँक विकास संस्थामार्फत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पीक कर्ज देत असून जिल्ह्यातील विकास संस्थांचे सदर योजनेअंतर्गत एकूण ३८८१२ सभासदांची एकूण ४१८८१ कर्ज खाती आहेत. सदर कर्ज खात्यांपैकी मयत ४१६ सभासदांची ४५१ कर्ज खाते व आधार क्रमांक नसलेली ९ सभासदांची ९ कर्ज खाते वगळता उर्वरित ३८३९० शेतकऱ्यांची ४१ हजार ४२१ कर्ज खाती पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली आहेत.

या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात कर्जमुक्ती लाभ देण्यात येणार असून कर्जमुक्तीसाठी पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिध्द होणार आहे.पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्राप्त होताच गावातील तलाठी, ग्रामसेवक व संस्थेच्या सचिवा मार्फत गावामध्ये प्रसिध्द करण्यात येतील. तसेच बँकांच्या शाखेमध्ये सुध्दा यादी प्रसिध्द केली जाईल.पात्र लाभार्थ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र, लोकसेवा केंद्र किंवा बँक शाखेमध्ये अॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक सह आधार प्रमाणिकरण केल्यानंतर त्यांना योजनेच्या लाभाची रक्कम त्यांच्या सदर बँक खाती जमा होणार आहे. शेतकऱ्यांच्या माहितीमध्ये विसंगती असल्यास पडताळणी केंद्रावरच तशी पोर्टलवर विसंगतीबाबत नोंद करणे आवश्यक आहे. सदर विसंगती दुरुस्ती करुन झाल्यानंतरच कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्याच्या कर्ज खात्यामध्ये जमा होणार आहे, अशी माहितीही जिल्हा उपनिबंधक श्री. सुद्रीक यांनी दिली.

### डॉ.विश्वास हासे यांना पीएच.डी

ईश्वरपूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (आरआयटी), राजारामनगर येथील सेंट्रल लायब्ररीचे प्रमुख डॉ.विश्वास लहाणू हासे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडून ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.**



डॉ. हासे यांनी 'मॅपिंग ऑफ रिसर्च प्रोडक्टिव्हिटी ऑफ सायंटिस्ट इन इंडियन इन्स्टिटयूट्स ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च: ए साइन्ट्रोमॅट्रिक अनेलयसिस'या विषयावर संशोधन करून ही पदवी संपादन केली.या संशोधनामध्ये भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थांतील शास्त्रज्ञांच्या संशोधन उत्पादकतेचे सायंटोमेट्रिक विश्लेषण करण्यात आले आहे. या संशोधनासाठी त्यांना डॉ. मंजुषा अहिराव (शिरपूर) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. डॉ. विश्वास हासे यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे सचिव प्रा.आर.डी.सावंत, संचालक डॉ.पी.व्ही.कडोले, तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# कोट्यावधींचे नाट्यगृह खासगी हातात?

कोल्हापूर,ता.२२(पांडुरंग दळवी)-

“ कोल्हापूरच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असलेल्या संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाच्या व्यवस्थापनाचे खाजगीकरण करण्याच्या ठरावाला महापालिकेच्या सभागृहाने मंजुरी दिली. मात्र, नाट्यगृह चालविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याची कबुली स्वतः प्रशासनानेच दिल्याने या निर्णयाच्या व्यवहार्यतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, तिकीट दर निश्चित करण्याचा अधिकार महापालिकेकडेच राहणार असल्याने तोट्यातील हे व्यवस्थापन स्वीकारण्यासाठी खासगी संस्था किंवा उद्योजक पुढे येतील का, याबाबतही साशंकता व्यक्त केली जात आहे. ”




- पुनर्बांधणीनंतर महापालिकेचा निर्णय
- दरवर्षी सुमारे ६२ लाखांचा तोटा
- व्यवस्थापनाची जबाबदारी कोणाकडे?

महापालिकेने सभागृहात मांडलेल्या माहितीनुसार, वर्षभरात केशवराव भोसले नाट्यगृहात सुमारे ४०० सांस्कृतिक कार्यक्रम होतात. त्यातून केवळ ३८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते, तर देखभाल, वीज, कर्मचारी आणि इतर खर्च मिळून जवळपास एक कोटी रुपयांचा खर्च होतो. परिणामी दरवर्षी सुमारे ६२ लाख रुपयांचा आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

राजर्षी शाहू महाराजांनी उभारलेले हे नाट्यगृह सुरुवातीला पॅलेस थिएटर म्हणून ओळखले जात होते. पुढे त्याला संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे नाव देण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीतील हे नाट्यगृह, रंकाळा तलाव आणि शाहू खासबाग मैदान महापालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी तत्कालीन महापौर बळीराम पवार यांच्या कार्यकाळात विशेष ठराव करण्यात आला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी ही मागणी मान्य करून शासनाने या मालमत्ता महापालिकेकडे वर्ग केल्या.

नाट्यगृहाचे पहिले मोठे नूतनीकरण तत्कालीन स्थायी समिती सभापती सुभाष वोरा यांच्या काळात करण्यात आले. त्यावेळी पोर्चच्या खोदकामादरम्यान ऐतिहासिक शिलालेख सापडल्याची नोंद आहे. त्यानंतर पुन्हा एकदा कोट्यवधी रुपये खर्च करून नाट्यगृह वातानुकूलित करण्यात आले. मात्र, विविध तांत्रिक त्रुटी कायम राहिल्या.दोन वर्षांपूर्वी लागलेल्या भीषण आगीत केशवराव भोसले नाट्यगृह या ऐतिहासिक वास्तूचे मोठे नुकसान झाले. त्याआधीही नूतनीकरणासाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यानंतर तब्बल ३५ कोटी रुपये खर्च करून नाट्यगृहाची पुनर्बांधणी करण्यात आली. विशेष म्हणजे, नव्याने उभारलेल्या नाट्यगृहाचे लोकार्पणही झालेले नसताना त्याच्या व्यवस्थापनाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयामुळे शहरातील सांस्कृतिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. एका बाजूला कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी खर्च करून नाट्यगृह नव्याने उभारण्यात आले, तर दुसऱ्या बाजूला ते चालविणे परवडत नसल्याचे कारण देत खाजगीकरणाचा मार्ग स्वीकारण्यात आला. त्यामुळे हा निर्णय आर्थिक गरजेतून घेतला गेला की व्यवस्थापनावरील ताण कमी करण्यासाठी, याबाबतही आता चर्चा सुरू झाली आहे.



फये प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे सांडव्यावरून १०० क्युसेक पाण्याचा विसर्ग होत आहे.

# फये प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला

## सांडव्यावरून १०० क्युसेक पाण्याचा विसर्ग

कुर,ता.२२(वार्ताहर)-

**भुदरगड तालुक्यातील फये लघू पाटबंधारे प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असून सांडव्यावरून १०० क्युसेस पाण्याचा विसर्ग होत आहे.प्रकल्प क्षेत्रात पाऊस झाल्याने ३३.४२ मीटर उंची व ३५५.६५ मीटर लांबीचा हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. या प्रकल्पाची १३८.८८ दशलक्ष घनफूट पाणी साठवणूक क्षमता आहे.**

प्रकल्पात पूर्ण पाणीसाठा झाला असून सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. प्रकल्पांतर्गत ९७२ हेक्टर लाभक्षेत्र असून सिंचन क्षेत्र ७०० हेक्टर आहे. शेतीच्या पाण्यासाठी मोर ओहोळेवर बारा बंधारे बांधण्यात आलेले आहेत. प्रत्येक वर्षी हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरतो.

यावर्षी प्रकल्पात उशीरा पाणीसाठा करण्यात आला तसेच शेतीसाठी आवर्तने जादा देण्यात आली होती त्यामुळे पाणीटंचाई भासली नव्हती. सध्या हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे लाभ क्षेत्रातील बळीराजा सुखावला आहे. यामुळे शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

# रोटरी क्लब,रोटरी अॅन्सचा पदग्रहण सोहळा उत्साहात

इचलकरंजी,ता.२२-

**येथील रोटरी क्लब व रोटरी अॅन्सच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा जवाहरनगर येथील राधे बँक्वेट हॉलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याप्रसंगी प्रताप पुराणिक, असि.गव्हर्नर यास्मिन मणेर यांच्यासह रोटरी क्लबचे गतवर्षीचे सेक्रेटरी तसेच अॅन्स प्रमुख सदस्य व ज्येष्ठ मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.**




रोटरी क्लब व रोटरी अॅन्सच्या पदग्रहण समारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर.

सदर पदग्रहण सोहळ्यात प्रताप पुराणिक यांनी नूतन प्रेसिडेंट पंकज कोठारी यांच्याकडे पदभार सुपूर्द केला. असि. गव्हर्नर यास्मिन मणेर व मान्यवरांच्या हस्ते इतर विभागातील नूतन संचालक तसेच उल्लेखनीय सत्कारमूर्तींचा सत्कार करण्यात आला. यावेळी असि. गव्हर्नर यास्मिन मणेर,प्रताप पुराणिक यांनी मार्गदर्शन केले.

नूतन प्रेसिडेंट पंकज कोठारी यांनी आपल्याला मिळालेले प्रेसिडेंटपद हे एक प्रामाणिक कार्य जबाबदारीने करण्याची सुवर्ण संधी आहे, आणि आपण तितक्याच नेटक्या नियोजनाने उत्तमरितीने राबवू,अशी ग्वाही दिली. रोटरी अॅन्सच्या अध्यक्षा सौ. वैशाली कोठारी यांनी ही आपल्यावर दाखविलेल्या विश्वासास आपण पात्र आहोत हे सिद्ध करण्याची प्रामाणिक जबाबदारी आपण सर्वांचे सहकार्याने पार पाडू,अशी ग्वाही दिली.

सदर कार्यक्रमात विद्यार्थी व विद्यार्थिनींना सायकल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी माजी सेक्रेटरी श्री.कदम यांनी मनोगत व्यक्त केले. मनिष मुनोत यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचलन केले. नूतन सेक्रेटरी सुनील यळरुटे यांनी आभार मानले.या कार्यक्रमास रोटरी हितचिंतक, रोटरीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, विविध एनजी ओ, ८९ ऋणानुबंध मित्रपरिवार व मान्यवर उपस्थित होते.

# सरपिराजीराव तलावाजवळील उड्डाणपुलाचा प्रस्ताव रेंगाळला

मुरगूड,ता.२२(प्रतिनिधी)-

**मुरगूड-कापशी मार्गावर मुरगूडच्या सरपिराजीराव तलावाचा सांडवा आहे. पावसाळ्यात याठिकाणी पाच ते सहा फूट पाणी येत असल्याने याकाळात तेथील वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो. त्यामुळे येथे रस्ता कामाबरोबरच उड्डाणपूलाची गरज आहे. पण त्यासंबंधीचा प्रस्तावच रेंगाळल्याने पूल होण्याची शक्यता धूसर झाली आहे. परिणामी आणखी किती वर्षे या पुलाची वाटच पाहायची असा सवाल नागरिक विचारत असून याबद्दल नागरिकांतून संतापाची लाट उसळली आहे.**



मुरगूडच्या सरपिराजीराव तलावाच्या सांडव्याजवळील प्रस्तावित पुलाची जागा.

या पुलाच्या मागणीची तीव्रता व वस्तुस्थितीचा आढावा घेवून चारशे कोटी कामाच्या गडहिंग्लज-कागल रस्ता ठेकेदार कंपनीने ११ कोटींचा प्रस्ताव महाराष्ट्र पायाभूत विकास महामंडळाकडे सादर केल्याचे सांगितले जाते.पण या प्रस्तावाचे पुढे काय झाले? याचे काहीच उत्तर मिळत नाही.अगोदरच रस्ता काँक्रीटीकरणाचे काम रेंगाळले आहे. त्यामुळे या पुलाचे काम होणे अशक्यच आहे.

**नागरिकांतून नाराजी**

तलाव सांडव्यावरील पूल रखडल्यास संपूर्ण महामार्गाचे काम अपूर्ण राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून आंदोलने, निवेदने आणि पाठपुरावा करूनही पुलाचा प्रश्न जैसे थे राहाणार आहे. प्रस्तावाच्या नावावर वेळ मारून नेण्याचा प्रकार तर नाही ना?अशी शंका उपस्थित होत आहे.पाचवीलाच पुजल्याप्रमाणे या सांडव्याच्या ठिकाणी पाणी येवून वाहतुकीला अडथळा येणारच आहे. शिवाय अपघाताने जीवीतहानी झाल्यास जबाबदार कोण ? येथे सलग तीन ते चार महिने पाणी वाहत असते हे पाणी ओसरल्यानंतर सांडव्यावर मोठ्या प्रमाणात चिखल व शेवाळल्याने जागा निसरट होते. त्यावर इलाज केव्हा होणार याची आता नागरिकांना प्रतिक्षाच करत बसावे लागणार आहे.

# स्मार्ट मीटरबद्दल वीज ग्राहकांच्या वाढत्या तक्रारी

गारगोटी,ता.२२(आनंद चव्हाण)

**भुदरगड तालुक्यात अलीकडे मोठ्या प्रमाणावर बसविण्यात आलेल्या स्मार्ट वीज मीटरमुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून, या 'स्मार्ट' मीटरने आता ग्राहकांच्या जीवनात अक्षरशः अंधार निर्माण केला आहे. वीज बिल वेळेत न भरल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा आपोआप खंडित होत असल्याने ग्राहकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

**स्मार्ट मीटरचा लाभ की त्रास?**

स्मार्ट मीटरमुळे पारदर्शकता आणि नियंत्रण वाढेल,असा दावा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात ग्राहकांना भेडसावणाऱ्या अडचणी पाहता, हा प्रकल्प सर्वसामान्यांसाठी लाभदायक ठरतोय की त्रासदायक?, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.



**भुदरगड तालुक्यातील नागरिकांतून संताप**

भुदरगड तालुका हा वाडीवस्तींचा तालुका आहे. या गाव गाड्यावरील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने कधी पैशाअभावी, तर कधी नजरचुकीमुळे वीजबिल वेळेत भरणे शक्य होत नाही. मात्र, पूर्वीप्रमाणे थोडा अवधी किंवा सूचना न देता थेट वीजपुरवठा बंद होत असल्याने नागरिकांना अक्षरशः अंधारात चाचपडत बसावे लागत आहे. रात्र अंधारात काढण्याची वेळ आली आहे. विशेषतः विद्यार्थ्यांचे शिक्षण, लहान मुलांचे आरोग्य आणि दैनंदिन जीवन विस्कळीत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, अनेक गावांमध्ये ग्राहकांची पूर्ण माहिती न देता किंवा सक्तीचा अवलंब करून स्मार्ट मीटर बसविल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. याशिवाय, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर मासिक वीज बिलात तब्बल दोनशे ते अडीचशे रुपयांची वाढ झाल्याचा अनुभव अनेक ग्राहकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे 'स्मार्ट' मीटरमुळे वीजबचत होईल, या दाव्यालाच आता प्रश्नचिन्ह लागले आहे. या सर्व प्रकारामुळे संतप्त ग्राहकांनी वीज वितरण कंपनीकडे स्मार्ट वीज मीटर बदलण्याची जोरदार मागणी केली असून, बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर तात्काळ काढून पूर्वीचे पारंपरिक वीज मीटर पुन्हा बसवावेत, अशी भूमिका घेतली आहे.अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही पूर्ण गावांनी दिला आहे.

**प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज**

**ग्राहकांच्या वाढत्या तक्रारी आणि संताप लक्षात घेता, संबंधित वीज वितरण कंपनीने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन ग्राहकांना दिलासा देणे गरजेचे झाले आहे. अन्यथा 'स्मार्ट' मीटरचा वाद आणखी चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही.या विरोधात तालुक्यात जनआंदोलन उभारले जाईल.**

**-कॉ.सम्राट मोरे, गारगोटी**

# नंदवाळात भाविकांना सोयी-सुविधा पुरवा

## आढावा बैठकीत डॉ.जास्मिन यांचे प्रशासनाला निर्देश

हळदी,ता.२२(प्रतिनिधी)-

**आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नंदवाळ येथे भाविकांना विविध सोयी-सुविधा प्राधान्याने उपलब्ध करुन द्या, अशा सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर नंदवाळ येथे विविध सोयी-सुविधांचा आढावा घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा सभा पार पडली.या सभेत भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या सुविधा तात्काळ व योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामध्ये जनरेटर बॅकअप, स्पीकर सिस्टीम, लाईट व्यवस्था, २४ तास आरोग्य सेवा व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध ठेवणे, पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करणे, ओला व सुका कचरा वेगळा करण्याची व्यवस्था करणे, स्क्रीन लावणे तसेच फिरते शौचालयांची संख्या वाढवणे यांचा समावेश होता.या सभेसाठी सरपंच अमर कुंभार, गटविकास अधिकारी संदीप भंडारी,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.उत्तम मदने, ग्रामविकास अधिकारी प्रियांका पाटील, ग्रामपंचायत सदस्य तानाजी कांबळे, समुदाय आरोग्य अधिकारी अनिल गंबरे, देवस्थान कमिटीचे भीमराव पाटील, आशा सेविका राजश्री कोंडेकर तसेच आशा प्रकाश कांबळे आदी उपस्थित होते.

आषाढी एकादशी निमित्त नंदवाळ येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी अपेक्षित असल्याने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहनही डॉ. जास्मिन यांनी केले.

# कोल्हापुरात आज प्लेसमेंट ड्राइव्ह

कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)-

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत गुरुवार, ता.२३ जुलै रोजी सकाळी १० ते दु. २ या वेळेत कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कोल्हापूर, विचारेमाळ येथे नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन केले आहे.**

या रोजगार मेळाव्यात २ खासगी उद्योजकांकडून ५० पेक्षा जास्त रिक्तपदे भरली जाणार आहेत. या पदांकरिता किमान १२ वी तसेच कोणत्याही शाखेतील पदवीधर पात्रता असणारे उमेदवार पात्र राहतील.तरी जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

# ज्युनिअर वर्ल्ड कुस्ती चॅम्पियनशिपसाठी आमशीच्या आदर्श पाटीलची निवड

सांगरुळ,ता.२२(प्रतिनिधी)-



**लखनऊ येथे नुकत्याच पार पडलेल्या २० वर्षाखालील ज्युनिअर वर्ल्ड चॅम्पियनशिप कुस्ती निवड चाचणीत करवीर तालुक्यातील आमशी येथील आदर्श युवराज पाटील याने ७४ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे त्याची ब्रातिस्लावा (स्लोव्हाकिया) येथे होणाऱ्या जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.**

पैलवान आदर्श युवराज पाटील हा भारतीय सैन्य दलात हवालदार पदावर कार्यरत असून सध्या तो आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट, पुणे येथे जागतिक स्पर्धेच्या तयारीसाठी कठोर सराव करत आहे.ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी पदक जिंकण्याचे स्वप्न उराशी बाळगून तो सातत्याने मेहनत घेत आहे.आर्मीमध्ये भरती होण्यापूर्वी आदर्श याने मांजरी खुर्द येथील शिवछत्रपती कुस्ती संकुल येथे आपल्या कुस्ती कारकिर्दीची सुरूवात केली. या निवडीसाठी त्याला प्रकाश सावंत, सत्यवान सावंत, शिवकुमार बावले, प्रशिक्षक विकास पाटील तसेच वडील युवराज पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आदर्श पाटील यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पोलिसांच्या रडारवर फार्म 'हाऊस'मधील 'हौस'

बोरपाडळे,ता.२२(श्रीकांत कुंभार)-

**कुणी हौस म्हणून, कुणी गुंतवणूक म्हणून तर कोणी सेकंड होम म्हणून बांधलेले फार्म हाऊस सध्या भाडेतत्वावर देवून पैसा मिळविला जात आहे. पैशाच्या या मोहापायी पन्हाळा तालुक्यात थंड हवेच्या झुळूकेला वासनेचे गरम गरम चटके बसत आहेत. 'हाऊस' आता 'हौस' झाल्याने तीन गुंठ्यापासून पाच गुंठ्यापर्यंत जागा घेऊन शेड वजा फार्महाऊसची संस्कृती झपाट्याने वाढली आहे.**




“ पन्हाळगड ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे मात्र सध्या मावळे नसले तरी प्रेमी युगलांच्या रुपात डोमकावळे बनून येऊन त्यांच्या अश्लील चाळ्याने गडाचे पावित्र्यच नष्ट होत चाललेले आहे .वाटेवरती असणारे लॉजिंग्ज ,पैसे नसल्यास तलावाचे ठिकाण, माळरान या ठिकाणी पर्यटकांपेक्षा कॉलेज चुकवून तोंडाला फडकी बांधून येणाऱ्या हक्काच्या ग्राहकाचे आश्रयस्थान बनले आहे .या भुलभुलैय्याला अल्पवयीन मुली बळी पडत चालल्या आहेत. धाड पडल्यास अंगलट नको म्हणून लॉजवाल्यांकडून फक्त पुरुषांचेच ओळखपत्र घेतले जाते.सिंगल रूम बुक करून डबल बेडला तसेच अनेक ठिकाणी सिंगल पर्यटक दाखवून सिंगल बेडला पसंती दिली जाते. चहा,नाष्टा,जागेवरच पोहोचवले जात असलेने आत युगुलाने प्रवेश केल्यानंतरच तोंडाला बांधलेले रुमाल काढले जातात. ”

वाघबीळ ते पन्हाळगड तसेच पूर्व-पश्चिम तालुक्यातील नैसर्गिक ठिकाणी तसेच तलावांच्या परिसरातील अनेक ठिकाणी बाहेरील गुंतवणूकदारांनी जमिनी खरेदी करून आलिशान फार्महाऊस उभारली आहेत. यापैकी अनेक फार्महाऊस भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती समोर येत असून, काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन आणि अवैध प्रकार घडत असल्याच्या तक्रारींमुळे पन्हाळा पोलिसांनी विशेष पडताळणी मोहीम सुरू केली आहे.

स्थानिक नागरिकांकडून काही फार्महाऊसवर मद्यपानाच्या पार्ट्या, जुगार, सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रकार तसेच इतर बेकायदेशीर कृत्ये होत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी पुढे येत आहेत. अनेक फार्महाऊस निर्जन भागात असल्याने अशा प्रकारांना चालना मिळत असल्याची चर्चा आहे. मात्र, सर्वच फार्महाऊसवर असे प्रकार घडतात असे नाही; त्यामुळे पोलिसांकडून वस्तुस्थितीची पडताळणी करण्यावर भर दिला जात आहे.

या मोहिमेंतर्गत संबंधित फार्महाऊसचा वापर मालक स्वतः करतात की ती व्यावसायिक स्वरूपात भाड्याने दिली जातात, याची माहिती घेतली जाणार आहे. भाडेतत्त्वावर फार्महाऊस चालविणाऱ्यांनी आवश्यक शासकीय परवानग्या घेतल्या आहेत का, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे व्यवसायाशी संबंधित कर भरला जातो का, पर्यटकांची नोंद ठेवण्यासाठी ओळखपत्रांची नोंदवही आहे का, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित आहे का, तसेच कोणतेही बेकायदेशीर किंवा संशयास्पद प्रकार सुरू नाहीत ना, याचीही तपासणी केली जाणार आहे. पन्हाळा पोलिसांच्या या मोहिमेमुळे नियमांचे पालन करणाऱ्या फार्महाऊस चालकांना दिलासा मिळणार असून, बेकायदेशीर कृत्यांना आळा बसण्यास मदत होईल.

- पन्हाळा तालुक्यात अलिशान फार्म हाऊसचा बाजार
- मद्यपान, जुगारासोबत अश्लिल प्रकारांना ऊत

सद्यस्थितीत येथील प्रत्येक पॉईंटला अश्लीलतेचा रंग चढत आहे.एकीकडे पन्हाळा पोलीस आणि पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे या मोहिमेसाठी सक्रिय झाले असून दुसरीकडे कोडोली पोलिसांची सावध भूमिका असल्याचे चित्र आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मसुगटे हे परिस्थितीचा अंदाज घेऊन सक्रिय झाले आहेत.

श्री क्षेत्र ज्योतिबा अर्थात वाडी रत्नागिरी या मार्गावर असणाऱ्या घाट रस्त्यावर देखील आता लॉजिंग आणि फार्म हाऊसचा सुळसुळाट झाला आहे तसेच गिरोली घाट आणि वाघबीळ ते माले फाटा तसेच कोडोली ते शहापूर रस्त्यावर देखील छुपी केंद्रे सावजाला आपल्या एरियाची भूल पाडत आहेत. पोलिसांनी फोफावलेले काळे धंदे, जुगाराची बजबजपूरी आणि वासनेच्या बाजारांना अटकाव घालण्याची गरज असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

# एनसीयूआय संचालक अण्णासाहेब जोल्ले यांचे निपाणीत जल्लोषी स्वागत

## भाजप कार्यकर्त्यांकडून सत्कार

निपाणी,ता.२२(प्रतिनिधी)–

**माजी खासदार व बेळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब शंकर जोल्ले यांची नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघा (एनसीयूआय) च्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल निपाणी मतदारसंघातील भाजप कार्यकर्त्यांच्यावतीने कित्तूर चन्नम्मा सर्कल येथील बिरेश्वर संस्थेच्या कार्यालयात भव्य सत्कार सोहळा झाला.**

दरम्यान, निवड झाल्यानंतर प्रथमच अण्णासाहेब जोल्ले यांचे सायंकाळी चार वाजता निपाणी शहरात आगमन झाले.यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून त्यांचे जल्लोषात स्वागत केले.त्यानंतर कित्तूर चन्नम्मा सर्कल येथील बिरेश्वर संस्थेत त्यांनी कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा स्वीकारल्या.शुभेच्छा देण्यासाठी भरपावसातही मतदारसंघातील भाजप कार्यकर्त्यांची रिंघ लागली होती.



एनसीयूआयच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल अण्णासाहेब जोल्ले आम.शशिकला जोल्ले यांच्या सत्कारप्रसंगी जयवंत भाटले, राजू गुंदेशा,बंडा घोरपडे व इतर.

अण्णासाहेब जोल्ले म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, सहकार मंत्री अमित शहा याच्या मार्गदर्शनाखाली सर्वांच्या आशीर्वादाने माझी नवी दिल्ली येथील एनसीयूआयच्या संचालकपदी कर्नाटकातून निवड झाली आहे.या निवडीमुळे मला राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली आहे.या संधीचे सोने आपण निश्चितच करू.

याप्रसंगी आम.शशिकला जोल्ले, हालशुगरचे अध्यक्ष जयकुमार खोत, उपाध्यक्षा गीता पाटील, संचालक जयवंत भाटले, भाजप शहराध्यक्ष राजू गुंदेशा, महालिंग कोठीवाले, माजी उपनगराध्यक्ष सुनील पाटील, बंडा घोरपडे, पीएलडी बँकेचे अध्यक्ष एस.एस. ढवणे, माजी जि.पं.सदस्य सिद्धू नराटे यांच्यासह हालशुगरचे सर्व संचालक, निपाणी मतदारसंघातील भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# गडहिंग्लजला भर पावसात आंदोलन; जतरमंतरवरील लाठीहल्ल्याचा निषेध

■ समविचारी पक्षातर्फे निदर्शने; प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन ■

गडहिंग्लज,ता.२२(प्रतिनिधी)–

**दिल्ली येथील जंतर–मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनातील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ समविचारी पक्ष–संघटनांतर्फे निदर्शने करण्यात आली. लाठीहल्ल्याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रपतींना पाठविलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. भर पावसात आंदोलन झाले. आंदोलनात शिक्षकांसह विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होती.**

येथील दसरा चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या–समोर पक्ष–संघटनांचे कार्यकर्ते जमले. घोषणाबाजीने लाठीहल्ल्याचा निषेध केला व नीट परीक्षेतील पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. त्यानंतर मोर्चाने जावून प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले.

आंदोलनात प्रा.सुनील शिंत्रे, राजेंद्र गड्यान्नावर, बाळेश नाईक, दत्ता मगदूम, आशपाक मकानदार, कल्याणराव पुजारी, दिग्विजय कुराडे, अरूणा शिंदे, उज्वला दळवी, दशरथ दळवी, प्रकाश भोईटे, प्रकाश करवालो, अजित बंदी, प्रकाश कांबळे आदी सहभागी झाले होते.



आंदोलनात सहभागी झालेले समविचारी संघटनेचे सदस्य.

**विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी प्राणाची बाजी लावलेले सोनम वांगचुक यांच्याशी सरकारने संवाद साधायला हवा होता. त्यांच्याशी केलेली वर्तणूक व आंदोलकांवर झालेला लाठीहल्ला निषेधार्ह आहे. असे समविचारी आघाडीतर्फे जाहीर करण्यात आले.**

# निपाणी तालुक्यात ३ बंधारे पाण्याखाली



वेदगंगा नदीची पाणीपातळी वाढल्याने जत्राट बंधारा पाण्याखाली जाण्याच्या स्थितीत आहे.

निपाणी,ता.२२(प्रतिनिधी)–

**गेल्या ४ दिवसांपासून सुरू असलेल्या उघडझाप पावसामुळे वेदगंगा व दूधगंगा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली असून, निपाणी तालुक्यातील तीन बंधारे पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन तहसीलदार सुरेश मुंजे यांनी केले आहे.**

तालुक्यातील कारदगा-भोज,कुन्नूर-बारवाड,खडकोळ हे बंधारे पाण्याखाली आहेत.तसेच पावसाचा जोर आणखी वाढत राहील्यास जत्राट बंधाराही पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. तळकोकण परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा परिणाम नदीपात्रातील पाणीवाढीवर होत असल्याने महसूल, ग्रामपंचायत, तलाठी, ग्राम प्रशासन अधिकारी आणि संबंधित विभागांना परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.पाण्याखाली गेलेल्या बंधाऱ्यांवरून किंवा वेगाने वाहणाऱ्या पाण्यातून प्रवास करू नये, तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

# निपाणीत आज काँग्रेसचा निषेध मोर्चा

निपाणी,ता.२२ (प्रतिनिधी)–

दिल्ली पोलीसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज व अश्रुधुर सोडून मारहाण केली.त्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात पंतप्रधान यांच्या निवासस्थानासमोर विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनाला हे हुकूमशाही सरकार घाबरले आहे. पोलीस बळाचा गैरवापर करून विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांना अटक केली. हेच या सरकारच्या अपयशाचे लक्षण आहे. राहुल गांधी यांच्या अटकेच्या निषेधार्थ निपाणी विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस कमिटी यांच्या वतीने गुरूवारी २३ रोजी सकाळी १० वाजता छ.धर्मवीर संभाजी सर्कल बस स्टँड येथे मानवी साखळी आंदोलन करण्यात येणार आहे.

# मुंबई -मिरज दरम्यान आणखी दोन आषाढी विशेष एकमार्गी रेल्वेगाड्या

मिरज,ता.२२ (प्रतिनिधी)–

**पंढरपूर येथे होणाऱ्या आषाढी यात्रेसाठी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते मिरज दरम्यान आणखी दोन विशेष एकमार्गी रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मध्य रेल्वे क्षेत्रीय सल्लागार समितीचे सदस्य किशोर भोरावत यांनी दिली.**

गाडी क्रमांक ०११८३ ही विशेष रेल्वेगाडी २५ जुलै २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून दुपारी ३.२० वाजता सुटून २६ जुलै रोजी पहाटे ३.३० वाजता मिरज येथे पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०११८१ ही विशेष रेल्वेगाडी २६ जुलै २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री १२.२५ वाजता सुटून त्याच दिवशी सकाळी ११.२५ वाजता मिरज येथे दाखल होईल.

या दोन्ही विशेष रेल्वेगाड्यांना दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुर्डुवाडी आणि पंढरपूर येथे थांबे देण्यात आले आहेत. या रेल्वेगाड्यांमध्ये एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, तीन वातानुकूलित तृतीय श्रेणी, आठ शयनयान, चार सर्वसाधारण द्वितीय श्रेणी तसेच दोन सर्वसाधारण आसन व्यवस्था व रक्षक डबा अशी रचना असेल. या विशेष रेल्वेगाड्यांसाठी २३ जुलै २०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाच्या संकेतस्थळावर आरक्षण सुरू होणार आहे.

# धारवाडला बसचा टायर फुटून अपघातात महिला ठार

धारवाड,ता.२२ –

**धारवाड तालुक्यात अम्मीनभावी गावाजवळ धावत्या बसचा पुढचा टायर अचानक फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस खड्ड्यात कोसळली. या दुर्घटनेत एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून, बसमधील ८ हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले.मृत महिला बेळगाव जिल्ह्यातील सौंदत्ती तालुक्यातील मुनवळ्ळी येथील असून हुसैनबी केंगानूर असे नाव आहे.**



धारवाडहून महाराष्ट्रातील मिरजकडे जाणारी नॉर्थ वेस्ट कर्नाटक रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनची बस अम्मीनभावी गावाजवळ पोहोचताच बसचा पुढचा टायर फुटला. यामुळे बस चालकाच्या नियंत्रणाबाहेर जाऊन खड्ड्यात कोसळून उलटली.यात बसच्या पुढच्या भागाचे पूर्णपणे नुकसान झाले आणि खिडक्यांचे तुकडे झाले. बसमधील प्रवाशांच्या किंकाळ्या ऐकून स्थानिक आणि रस्त्यावरुन जाणाऱ्या इतर वाहनचालकांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली.वृद्ध व्यक्ती आणि महिलांसह एकूण ८ प्रवासी गंभीर जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने धारवाड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

# ८४ हजारांचे साहित्य चोरीला

सांगली, ता.२२( प्रतिनिधी)

**सांगली – धामणी रस्ता परिसरातील एका इमारतीतून इंटेरिअर आणि ॲल्युमिनिअमच्या कपाटासाठी लागणारे सुमारे ८४ हजार रुपयांचे साहित्य चार महिलांनी चोरून नेले.**

याप्रकरणी राहुल शिवसहाय शर्मा (रा. प्लॉट क्र.५१, पद्मावती नगरी, लिमये मळा, धामणी रस्ता, सांगली) यांनी विश्रामबाग पोलीसात फिर्याद दिली आहे. राहुल शर्मा यांनी दुकानामधील फर्निचरकरिता, ॲल्युमिनिअमच्या कपाटासाठी तसेच घराच्या इंटेरिअरसाठी लागणारे साहित्य नेस्ट इन या इमारतीत ठेवले होते. अनोळखी चार महिलांनी तोंडाला रुमाल बांधून सर्व साहित्य लंपास केले.

# हुपरीत कंत्राटी सफाई कामगारांचे आमरण उपोषण

हुपरी, ता. २२(वार्ताहर)–

**येथील नगर परिषद कार्यालयासमोर विविध न्याय्य मागण्यांसाठी गेल्या आठ दिवसांपासून ठिय्या आंदोलन करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांनी बुधवारी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले. शासनाच्या किमान वेतनानुसार पगार मिळावा आणि स्थानिक कामगारांना कामात प्राधान्य देण्यात यावे, या प्रमुख मागण्या आहेत. दरम्यान, या आंदोलनाला अखिल भारत हिंदू महासभा यांच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.**

## हिंदू महासभेचा मुंडन आंदोलनाचा इशारा



मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देताना हिंदू महासभेचे पदाधिकारी.

महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजय नरळे यांना मागण्यांचे निवेदन दिले. हुपरी शहरातील अनेक सफाई कामगार गेल्या अनेक वर्षांपासून कंत्राटी पद्धतीने प्रामाणिकपणे सेवा देत आहेत. असे असतानाही, या स्थानिक कामगारांना डावलून ठेकेदाराकडून बाहेरील कामगारांची भरती केली जात असल्याबद्दल महासभेने नाराजी व्यक्त केली. तसेच ठेकेदाराने कामगारांना किमान वेतन आयोगाच्या नियमानुसारच वेतन दिले पाहिजे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. प्रशासनाने तातडीने सकारात्मक तोडगा काढला नाही किंवा ठोस निर्णय घेतला नाही, तर शुक्रवारी नगर परिषद कार्यालयासमोर हलगीच्या गजरात सामूहिक मुंडन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.याप्रसंगी रमेश भोरे,संजय पाटील, सुहास माने, दादासो कामते, भरत देसाई, संदीप भंडारे, सचिन सादळे, सूर्यकांत रावण,नितीन काकडे, उमेश लोंढे, राजेंद्र उगळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# मशीनचे पार्ट लंपास

सांगली, ता.२२( प्रतिनिधी)–

**कॉंक्रिटचा रस्ता करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मशीनचे ३ लाख ६० हजार रुपये किंमतीचे काही पार्ट चोरट्याने लंपास केले. याप्रकरणी मदन रेबा कांता हाजारीका (सध्या रा. रुक्मिणीनगर, माधवनगर, मूळ रा. बाराहुला छोबा, कथिआतोली, जि. नागाव,आसाम) यांनी सांगली शहर पोलीसात फिर्याद नोंदविली आहे.**

माधवनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण सुरू आहे. याकरिता टीव्हीएस शोरुमच्या समोर सिमेंट कॉंक्रिट रस्ता करण्याकरिता असलेले मशीन ठेवलेले होते. चोरट्याने सदर मशीनमधील ३ लाख ६० हजारचे साहित्य चोरले. ही बाब दुसऱ्या दिवशी सकाळी लक्षात आल्यावर हाजारीका यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

# ई–ऑफिस प्रणालीच्या प्रभावी वापरात सांगली जिल्हाधिकारी कार्यालय अग्रेसर

सांगली, ता.२२ (प्रतिनिधी )–

**राज्यातील मंत्रालय सर्व्हर प्रणालीशी संलग्न असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांच्या १ एप्रिल ते २२ जुलै या कालावधीतील ई–ऑफिस वापराच्या अहवालात सांगलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने उल्लेखनीय आणि कौतुकास्पद कामगिरी नोंदवली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आली.**

सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाने १ एप्रिल ते २२ जुलै २०२६ या कालावधीत ई–ऑफिस प्रणालीद्वारे एकूण ३७ हजार २२२ ई–पावत्या स्वीकारल्या व नोंदविल्या असून, मंत्रालय स्तर वगळता राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ई–पावती निर्मितीच्या बाबतीत सांगली जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. त्याचबरोबर ई–फाईल निर्मितीमध्ये १७ हजार ५६२ फाईल्स ई–ऑफिस प्रणालीवर तयार केल्या असून, या बाबतीत राज्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसील कार्यालये व सर्व मंडळ अधिकारी (सर्कल) कार्यालये पूर्णपणे ई–ऑफिस प्रणालीशी संलग्न असून, जिल्ह्यातील जवळपास सर्व गाव महसूल अधिकारी (तलाठी) कार्यालयेही या प्रणालीशी जोडली गेली आहेत. यामुळे गाव पातळीपासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत संपूर्ण महसूल यंत्रणा एकाच डिजिटल साखळीत आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे सद्यस्थितीत ८९८ अधिकारी, कर्मचारी ई–ऑफिस प्रणालीचे नोंदणीकृत वापरकर्ते असून, कार्यालयांतर्गत होणारा पत्रव्यवहार व फाईल्सची हालचाल मोठ्या प्रमाणात ई–ऑफिस प्रणालीमार्फतच केली जात आहे. जिल्ह्यातील सर्व स्तरांवरील कार्यालयांनी ई–ऑफिस प्रणालीचा अधिकाधिक व नियमित वापर करावा, असे जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सांगितले.

# सिंधुदुर्गातून 'गोकुळ'चे एक लाख लिटर दूध संकलनाचे लक्ष्य

## गोकुळ व सिंधुदुर्ग जिल्हा बँकेची संयुक्त नियोजन बैठक

कोल्हापूर, ता.२२ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) आणि सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दूध संकलन वाढविण्यासाठी ओरस येथे प्राथमिक नियोजन बैठक झाली. सध्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातून गोकुळकडे दररोज २० ते २५ हजार लिटर दूध संकलित होत असून, ते टप्प्याटप्प्याने वाढवून प्रतिदिन एक लाख लिटरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट बैठकीत निश्चित करण्यात आले.**



यावेळी नवीन दूध संस्थांची स्थापना, विद्यमान संस्थांचे सक्षमीकरण, सेवा सहकारी संस्थांमार्फत दूध संकलन वाढविणे, शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. दुभती जनावरे खरेदीसाठी सिंधुदुर्ग जिल्हा बँकेमार्फत सुलभ कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली.गोकुळचे प्रशासक मंडळाचे अध्यक्ष तथा सिंधुदुर्गचे जिल्हा उपनिबंधक प्रदीप मालगावे म्हणाले, दूध उत्पादकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत गोकुळने स्पर्धात्मक दूध दर, तांत्रिक मार्गदर्शन आणि विविध योजनांच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायाला चालना दिली आहे. सिंधुदुर्गमध्ये दूध उत्पादन वाढीस मोठी क्षमता असून, नियोजनबद्ध प्रयत्नांतून प्रतिदिन एक लाख लिटर दूध संकलनाचे उद्दिष्ट निश्चितपणे गाठता येईल.सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी यांनी, दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी शेतकऱ्यांना जातिवंत गायी–म्हशी खरेदीसाठी आवश्यक कर्जसुविधा आणि आर्थिक पाठबळ देण्यास जिल्हा बँक पूर्ण सहकार्य करेल, असे सांगितले. बैठकीस सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, गोकुळचे अधिकारी डॉ. दयावर्धन कामत, धनाजी पाटील, भरत मोळे, सर्जेराव मानकर, डॉ. प्रकाश दळवी, डॉ. नितीन रेडकर, विलास पाटील, शंकर जोंदळेकर, जिल्हा बँकेचे अधिकारी तसेच दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिनी व्हनाळीत रक्तदान शिबिर



रक्तदात्यांना प्रमाणपत्राचे वाटप करताना संजयबाबा घाटगे,सुयशा घाटगे,विरेन घाटगे आदी. (छाया : सागर लोहार)

साके,ता.२२(वार्ताहर)–

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपतर्फे व्हनाळी (ता. कागल) येथे रक्तदान शिबिर आयोजिले होते. शिबिराचे उद्घाटन माजी आम. संजयबाबा घाटगे, जि. प.सदस्या सुयशा घाटगे,काकासो सावडकर यांच्या हस्ते झाले.**

माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन झाले. कोल्हापूर येथील वैभवीलक्ष्मी ब्लड बँक यांच्यामार्फत ६१ रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्यात आले.यावेळी मार्केट कमिटीचे सभापती नानासो कांबळे, विलास पाटील, दत्तात्रय दंडवते,ए.वाय.पाटील, रणजित मुडुकशिवाले, विरेन घाटगे,एकनाथ पाटील,तानाजी कुरणे, सुरेश मर्दाने, शरद पाटील यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# भरधाव दुचाकीची बालकाला धडक ; चालकावर गुन्हा

मिरज,ता.२२( प्रतिनिधी)–

**मद्यधुंद दुचाकी चालकाने धडक दिल्याने बालक जखमी झाल्याची घटना टाकळी ते मल्लेवाडी रोडवर घडली.याबाबत मिरज ग्रामीण पोलिसांत दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.**

अंकुश नाथाजी वाघमारे (वय ४२, रा. आंबेडकर नगर, टाकळी) यांनी पोलिसात फिर्याद दिली. त्यांचा मुलगा अंकुश वाघमारे (वय १५) हा जखमी झाला. सुदेशा मारुती शिंदे (रा. मदभावी ता. अथणी) या दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनास्थळी वाघमारे हे शेतात बंद पडलेला ट्रॅक्टर जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत होते. यावेळी सदरच्या दुचाकी चालकाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने दुचाकी चालवून या ठिकाणी उभ्या असलेल्या अंकुश वाघमारे यास धडक दिली. दुचाकीचे नुकसान झाले आहे.

# जिल्हा बँकेत स्व.अजितदादा पवार यांची जयंती साजरी




कोल्हापूर, ता. २२ (प्रतिनिधी)

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या केंद्र कार्यालयात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांची जयंती ज्येष्ठ संचालिका निवेदिता माने, संचालक संतोष पाटील, सुधीर देसाई तसेच कर्मचारी प्रतिनिधी दिलीप लोखंडे यांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करून साजरी करण्यात आली.**

यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. एम. शिंदे, सर्व व्यवस्थापक, उपव्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# टीम इंडियाला सूर गवसणार ?



## झिम्बाब्वे विरुध्दची टी-२० मालिका आजपासून

हरारे,ता.२२ –

**सलग दोन टी-२० मालिकांमधील निराशाजनक कामगिरीनंतर, भारतीय संघ गुरुवारपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत झिम्बाब्वे विरुध्द विजयाच्या मार्गावर परतण्याचा प्रयत्न करेल. कर्णधार श्रेयस अय्यर आपल्या कर्णधारपदाखालील पहिला मालिका विजय मिळवण्यासाठी प्रयत्नशील असेल, तर युवा भारतीय संघासमोर अलीकडील पराभव मागे टाकण्याचे आव्हान असेल.**

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्या सात टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी सहा सामने गमावले आहेत. आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकांमधील पराभवानंतर, झिम्बाब्वे दौरा संघासाठी आत्मविश्वास पुन्हा मिळवण्याची एक सुवर्णसंधी आहे. या मालिकेत भारताला एक प्रबळ दावेदार मानले जात असले तरी, पराभवाचा संघाच्या ड्रेसिंग रूमवर मोठा परिणाम होऊ शकतो. या दौऱ्यावर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या जागी व्हीव्हीएस लक्ष्मण संघाचे नेतृत्व करत आहे. त्यामुळे, संघाची रचना आणि रणनीती यावर सर्वांच्या नजरा असतील.

युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशी पुन्हा एकदा आकर्षणाचे केंद्र असेल. अभिषेक शर्मा त्याच्यासोबत डावाची सुरुवात करेल, तर संजू सॅमसनचा या दौऱ्यासाठी संघात समावेश नाही.

**संघ व्यवस्थापनाला अष्टपैलू संघात हर्ष दुबे, शिवम दुबे आणि सूर्यांश शेडगे यांच्यापैकी दोन क्रिकेटपटू निवडणे अवघड जाईल. वेगवान गोलंदाजीतील मयंक यादव, प्रिन्स यादव, अशोक शर्मा आणि यश ठाकूर यांच्यापैकी कुणाला संधी मिळते ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.**

हरारे स्पोर्ट्स क्लबचे मैदान अभिषेक आणि वैभव या दोघांसाठीही खास राहिले आहे. अभिषेकने येथेच टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि आपल्या दुसऱ्याच सामन्यात शतक झळकावले. वैभवनेही याच मैदानावर यावर्षी १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्ध शानदार शतक झळकावले होते. गोलंदाजी आणि मधली फळी ही सर्वात मोठी आव्हाने आहेत. हरारेच्या खेळपट्टीवर वेगवान गोलंदाजांना अतिरिक्त उसळी आणि मदत मिळण्याची शक्यता आहे. परिणामी, झिम्बाब्वेचे वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानी आणि रिचर्ड नगारवा भारतीय फलंदाजांसमोर मोठे आव्हान उभे करू शकतात.उपकर्णधार तिलक वर्माच्या मधल्या फळीतील फलंदाजीच्या स्थानावरही चर्चा सुरू आहे. पाचव्या क्रमांकावर त्याला यश मिळालेले नाही, तर इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर खेळत आहे. मधल्या फळीत रिंकू सिंगलाही एक चांगला पर्याय मानले जाते.

# ग्लासगोत रंगणार आजपासून राष्ट्रकुल स्पर्धा

ग्लासगो,ता.२२ –

**राष्ट्रकुल खेळ २०२६ ची २३ वी आवृत्ती स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे २३ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ दरम्यान आयोजिली आहे. ग्लासगो जवळपास १२ वर्षांत दुसऱ्यांदा या खेळांचे आयोजन करणार आहे.बर्मिंगहॅम २०२२ मध्ये २० खेळांचा समावेश होता, तर यावेळी पदकांसाठी केवळ १० खेळांमध्ये स्पर्धा होईल.**

२०२६ चे राष्ट्रकुल खेळ सुरुवातीला ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्यात आयोजित करण्याचे ठरले होते.२०२२ च्या अखेरीस व्हिक्टोरियाला यजमान म्हणून निश्चित करण्यात आले, पण खर्च वाढल्यामुळे केवळ नऊ महिन्यांनंतर त्यांनी माघार घेतली. राष्ट्रकुल खेळ महासंघाने घाईघाईने नवीन यजमानाचा शोध घेतला आणि अखेरीस स्कॉटलंडमधील ग्लासगोला यजमान म्हणून निश्चित केले. ऑक्टोबर २०२४ मध्ये ग्लासगोला नवीन यजमान म्हणून घोषित करण्यात आले. खर्च कमी ठेवण्यासाठी, हे खेळ सध्याच्या क्रीडास्थळांच्या लहान परिसरात आयोजित केले जातील. खेळाडू व कर्मचारी नवीन व्हिलेजऐवजी सध्याच्या हॉटेल्समध्ये राहतील. परिणामी, केवळ चारच क्रीडास्थळे उपलब्ध असल्याने, सुविधांच्या अभावामुळे अनेक खेळ वगळण्यात आले.

### केवळ १० खेळांमध्ये पदकांसाठी होणार चुरस

commonwealth games GLASGOW 2026

ॲथलेटिक्स आणि पॅरा-ॲथलेटिक्स,जलतरण आणि पॅरा-जलतरण,आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स,ट्रॅक सायकलिंग आणि पॅरा-ट्रॅक सायकलिंग,नेटबॉल,वेटलिफ्टिंग आणि पॅरा-वेटलिफ्टिंग,बॉक्सिंग,जुडा, बाउल्स आणि पॅरा-बाउल्स, ३३ बास्केटबॉल आणि ३३ व्हीलचेअर बास्केटबॉल हे लोकप्रिय खेळ राष्ट्रकुल खेळ २०२६ च्या कार्यक्रमातून वगळले असून क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, स्क्वॅश, टेबल टेनिस, रिदमिक जिम्नॅस्टिक्स, डायव्हिंग, रग्बी सेव्हन्स,बीच व्हॉलीबॉल, माउंटन बाइकिंग या सर्व स्पर्धा चार ठिकाणी आयोजित करण्यात येतील.

ग्लासगोने यापूर्वी २०१४ मध्ये राष्ट्रकुल खेळांचे आयोजन केले होते. त्यावेळी, १४ ठिकाणी १७ खेळांचे आयोजन करण्यात आले होते. पण, यावेळी स्पर्धा केवळ चार प्रमुख ठिकाणी आयोजित केल्या जातील.या ठिकाणी एकूण ६० पदकांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातील. कलात्मक जिम्नॅस्टिक्स स्पर्धा २४ ते २८ जुलै दरम्यान आयोजित केल्या जातील. ट्रॅक सायकलिंग आणि पॅरा-ट्रॅक सायकलिंग स्पर्धा ३० जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान सर ख्रिस हॉय वेलोड्रोम येथे आयोजित केल्या जातील.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टप्पा येथे ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील रथाचे सारथ्य केले.तसेच काही अंतर वारकऱ्यांसहसमवेत चालत वारीचा आनंद घेतला. (छाया: सूर्यकांत आसबे)

# ज्ञानेश्वर माऊली-सोपान काका यांच्या बंधू भेटीचा टप्पा येथे अनुपम्य सोहळा


## मुख्यमंत्री फडणवीस भारावले ; वारीचा लुटला आनंद

सोलापूर,ता.२२ (सूर्यकांत आसबे ) –

**आषाढी एकादशीच्या ओढीने पंढरीच्या दिशेने निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने पंढरीच्या समीप येण्यास सुरुवात केली आहे.लाखो वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दुपारी पंढरपूर तालुक्यातील दसुर पाटी येथील टप्पा येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज,संत सोपान काका यांच्या बंधू भेटीचा सोहळा पाहिला. बंधू भेटीचा हा नयनरम्य सोहळा पाहून मुख्यमंत्री फडणवीस भारावून गेले.**

टाळ मृदंगाचा गजर विठ्ठल नामाचा जयघोष करत पाणावलेले वैष्णवांचे डोळे अशा उत्कंठावर्धक वातावरणात आकाशात दाटलेल्या ढगाळ वातावरणामुळे वैष्णवांच्या उत्साहाला उधाण आले होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.फडणवीस यांनी रथाचे सारथ्य केले तसेच काही अंतर वारकऱ्यांसह समवेत चालून वारीचा आनंद लुटला तसेच मजल दरमजल करत पंढरपूरच्या विठुरायाच्या भेटीसाठी निघालेल्या वारकऱ्यांसोबतही संवाद साधला. पालकमंत्री जयकुमार गोर, माजी आम. राम सातपुते यांच्यासह जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.तसेच पालखी सोहळ्याचे प्रमुख आणि जिल्हा प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,संत ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पादुकांचे जन्मदिनी दर्शन मिळणे आपले भाग्य समजतो. वारकरी हे माऊलीचे जिवंत स्वरूप आहे. सर्व वारकरी मिळून आपल्याला माऊलींच्या स्वरूपातच पाहायला मिळतात. माऊलींकडे आपल्याला काहीही मागावे लागत नाही. आपल्या मनातले त्यांना माहिती आहे.पण दरवेळेस माऊलीला एकच मागणे असते,चांगला पाऊस पडू दे, शेतकरी सुखी होऊ दे. यंदा एआयच्या माध्यमातून वारकऱ्यांचा अंदाज घेत आहोत. खूप मोठ्या संख्येने वारकरी आलेले आहेत. जुने वारकऱ्यांच्या संख्येचे सर्व रेकॉर्ड यंदा मोडले जाणार आहेत. जर्मन हँगर पद्धतीचे मंडप, स्वच्छतेच्या वेगवेगळ्या व्यवस्था आदींमुळे वारीमध्ये एक वेगळ्या प्रकारचे वातावरण आहे.



गजेंद्र शेरखाने, अथर्व टकले, पार्थ पाटील, क्षितीज वरपे, श्रृती ढेरे, संस्कार आगटे, तलाह मुल्ला

ऋग्वेदा शेळके, अनस होंबळ, सिद्धांत सरनोबत, अथर्व गवळी, इशान मगदूम, आराधना कालिया, संकेत विभूते

प्रणव मोहिते, ग्रीष्मा वणकुद्रे, आदित्य दसरे, सिध्दी खाडे, सुदर्शन पाटील, अदिती पाटील

# केसीपीची नीट परीक्षेत उत्तुंग भरारी

इचलकरंजी,ता.२२–

**येथील विशाल पागडे यांच्या किशोर करियर पॉईंटच्या विद्यार्थ्यांनी एनटीए आयोजित - २०२६ परीक्षेत उज्वल यश मिळवले. जेईई व सीईटी बरोबरच नीट परीक्षेत मिळवलेल्या यशामुळे केसीपीवरील पालकांचा विश्वास सार्थ ठरला असल्याची भावना पालकांनी बोलून दाखवली.**

ॲकॅडमीच्या गजेंद्र शेखरखाने याला ६३१ गुण मिळाले असून, तो अव्वल आला आहे. २० विद्यार्थ्यांना ५५० पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत तर ५०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे तब्बल ६० विद्यार्थी आहेत. गेली दहा वर्ष सातत्याने जेईई,नीट व सीईटी या प्रवेश परीक्षांमध्ये विशाल पागडे यांच्या केसीपीने आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीवर नेहमीच महाराष्ट्रात अग्रभागी असणारी ॲकॅडमी म्हणून केसीपीकडे पाहिले जाते.

अथर्व टकले (६२७), पार्थ पाटील (६११), क्षितिज वरपे (६००), श्रृती ढेरे (६००), संस्कार आगटे (५९५), तलाह मुल्ला (५९२), ऋग्वेदा शेळके (५७७), अनस होंबळ (५७६), सिध्दांत सरनोबत (५७४), अथर्व गवळी (५७४), इशान मगदुम (५७१), आराधना कालीया (५६९), संकेत विभुते (५६९), प्रणव मोहिते (५६५), ग्रीष्मा वणकुद्रे (५६३), आदित्य दसरे (५६१), सिध्दी खाडे (५५७), सुदर्शन पाटील (५५७), अदिती पाटील (५५०) या विद्यार्थ्यांनी धवल यश संपादन केले आहे.

संस्थेचे अध्यक्ष विशाल पागडे यांनी या यशाबद्दल सांगितले की, ३ मे ची नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर री-नीट होणार अशी सूचना आली. त्यानंतर टीम केसीपीने मुलांना मानसिक आधार देत ॲकॅडमी मध्ये सराव परीक्षा, ऍनालिसिस व डिस्कशन नव्याने सुरु केले.

आपण कधीही आणि केव्हाही परीक्षा देण्यासाठी सक्षम आहोत हे विद्यार्थ्यांच्यावर बिंबवले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. जे ॲकॅडमी कडे नव्हते पण ज्यांना सराव परीक्षांची मदत हवी होती, अशा अनेक विद्यार्थ्यांना केसीपीने मार्गदर्शन देऊन त्यांच्या मनातील दडपण दूर केले. या यशामुळे पुन्हा एकदा निकालाच्या सरासरीमध्ये केसीपी अव्वल असल्याचे सिध्द झाले आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना अध्यक्ष विशाल पागडे, डायरेक्टर ज्योती पागडे, को-ऑर्डीनेटर पुजा रुईकर, एच.आर. रोशन बाबू, सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.

# खाशाबांचा ७४ वा पदकदिन प्रथमच कोल्हापुरात साजरा होणार

कोल्हापूर,ता.२२–



**राजे साळुंखे चालुक्य राजवंश प्रतिष्ठान व कोल्हापूर जिल्हा व शहर रेसलिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा ७४ वा पदकदिन कोल्हापुरात प्रथमच साजरा करण्यात येणार आहे.**

स्वतंत्र भारतासाठी २३ जुलै १९५२ रोजी खाशाबा जाधव यांनी कुस्तीत पहिले ऑलिम्पिक पदक जिंकण्याचा पराक्रम केला होता. यानिमित्त कश्री दत्त स्पोर्ट्स संकुलामध्ये क्रीडा चर्चासत्र व ऑलिम्पिकवीर खाशाबा पोस्टरचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

जागतिक विजेती, ऑलिम्पिकपटू नेमबाज श्रीमती तेजस्वीनी सावंत,क्रीडा अभ्यासक प्रा. संजय दुधाणे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी साळुंखे व कोल्हापूर जिल्हा व शहर रेसलिंग असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या उपस्थितीत समारंभ होईल.

फिनलंड देशातील हेलसिंकी शहरात झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत कराडच्या खाशाबा जाधव यांनी ४ लढती जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली होती.

**आज पद्मविभूषणची सुनावणी**

२३ जुलै १९५२ रोजी खाशाबांनी देशासाठी पहिले पदक जिंकले होते. याच दिवशी कोल्हापूर खंडपीठात खाशाबांच्या पद्मविभूषणची सुनावणी होणार आहे. खाशाबांनंतर पदक जिंकलेल्या सर्व ऑलिम्पिक विजेत्यांना पद्म पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. एकमेव खाशाबा या यादीत नाहीत. यामुळे २३ जुलै रोजीच्या सुनावणीत पद्मविभूषणवर शिक्कामार्तब झाला तर तो दुर्मीळ योगायोग असेल असे संजय दुधाणे यांनी सांगितले.

# कुलदीपचा यॉर्कशायर काउंटी क्लबसोबत करार

नवी दिल्ली,ता.२२ –

**भारतीय फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने यॉर्कशायर काउंटी क्लबसोबत करार केला. तो या हंगामात संघासाठी आठ सामने खेळणार आहे. कुलदीप काही काळापासून भारतीय प्लेइंग इलेव्हनचा भाग नव्हता, पण आता तो काउंटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. तो पाच एकदिवसीय कप सामने आणि तीन रेड-बॉल सामने खेळेल.**

कुलदीप पाच एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी उपलब्ध असेल आणि त्यानंतर सप्टेंबरमध्ये होणाऱ्या चार काउंटी चॅम्पियनशिप सामन्यांपैकी शेवटच्या तीन सामन्यांसाठी हेडिंग्ले येथे परत येईल.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी कुलदीप याच्या क्षमतेवर फारसा विश्वास दाखवला नाही. पण यॉर्कशायर व्यवस्थापनाचा विश्वास आहे की, इंग्लंडमधील परिस्थितीत कुलदीप संघासाठी एक महत्त्वपूर्ण क्रिकेटपटू ठरेल. यॉर्कशायरचे क्रिकेट महाव्यवस्थापक, गॅविन हॅमिल्टन म्हणाले, कुलदीप एक उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आहे.

# भारताचे तीन फलंदाज टॉप ५ मध्ये

## आयसीसी वनडे क्रमवारी ; गिल,कोहली, शर्मा यांचा समावेश

नवी दिल्ली,ता.२२–

**आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल पाचमध्ये तीन भारतीय फलंदाजांचा समावेश झाला आहे. कर्णधार शुभमन गिल दुसऱ्या स्थानावर पोहोचल्याने तो अव्वल स्थानाच्या जवळ आहे. अव्वलस्थानी असलेला डॅरिल मिचेल व गिल यांच्यात केवळ एका रेटिंग पॉईंटचा फरक आहे. विराट कोहली तिसऱ्या स्थानावर आहे, तर रोहित शर्मा चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. इंग्लंडविरुध्दच्या एकदिवसीय मालिकेतील चांगल्या कामगिरीचा फायदा या तिन्ही भारतीय फलंदाजांना झाला आहे.**

शुभमनने इंग्लंडविरुध्दच्या मालिकेत दोन अर्धशतकांसह (नाबाद ८० आणि ७७) १८८ धावा केल्या. कोहलीनेही ६५ आणि ७४ धावा करून दोन अर्धशतके झळकावली. रोहितने आपल्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यात १३८ धावा करून शतक झळकावले. शुभमनचे ८०१ रेटिंग पॉईंट्स झाले आहेत. न्यूझीलंडचा मिचेल ८०२ पॉईंट्ससह यादीत अव्वल स्थानी आहे. कोहलीचे ७६७ रेटिंग गुण आहेत, तर रोहितचे ७५८ आहेत. अफगाणिस्तानचा इब्राहिम झद्रान पाचव्या स्थानावर आहे.



श्रेयस अय्यर दोन स्थानांनी वर चढून १३ व्या स्थानावर पोहोचला आहे. केएल राहुल सहा स्थानांनी घसरून १८ व्या स्थानावर आला आहे. भारतीय गोलंदाजांमध्ये, कुलदीप यादव आणि मोहम्मद सिराज यांना नुकसान झाले आहे.जसप्रीत बुमराहने एक स्थान वर झेप घेतली असून तो आता २३ व्या स्थानावर आहे. अक्षर पटेलने १० स्थानांची झेप घेत ३२ वे स्थान पटकावले आहे.इंग्लंडचा फलंदाज जो रूटने पुन्हा एकदा अव्वल १० क्रिकेटपटूंमध्ये स्थान मिळवले आहे.